श्रीयुत लक्ष्मण विनायक परळकर, बी. ए., एल्एल्. बी., कृत

संशयनिरसन नाटक.

प्रकाशक:

मेसर्स पाटील आणि वर्दे.

यथा मधुलिट् पुष्पं योजयेत् पुस्तकं तथा ।

संशयनिरसन नाटक.

नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्नचरणैरवताडनानि !

भवभूति.

लेखकः

श्रीयुत लक्ष्मण विनायक परळकर,
बी. ए., एल्एल्. बी.

प्रकाशकः

मेसर्स पाटील आणि वर्दे.

कि. ८ आणे.] [सन १९१२.

Printed by G. N. Kulkarni at the Karnatak Press,
No. 7, Girgaum Back Road, Bombay,

AND

Published by Messrs S. D Patil and S. M. Varde
at the "Udyan "Office, Grant Road, Bombay.

३५/३/१९४२

प्रस्तावना.

पाश्चिमात्य शिक्षणाच्या प्रसारानें आपल्या समाजांत एका प्रकारची जागृति दिसूं लागली. विचारक्रान्तीस आरंभ होऊन हाडींमासीं खिळलेल्या मतांचा पाया डळमळूं लागला. सामाजिक व धार्मिक वातावरणांत घोर आंदोलन दिसून येऊं लागलें. हिंदु समाज पर्वताप्रमाणें अचल भासत होता; परंतु हा हिमालय पर्वत ज्ञानरवीच्या किरणांनीं वितळून जाऊन त्याचा महासागर झाला व त्या सागरावर निरनिराळ्या मतांच्या [illegible]ा, कल्पनांच्या, लहरी उपलहरी दिसूं लागल्या. ह्यापैकीं एका उपलहरी[illegible]जूनें दृष्टिगोचर होणारें छायाचित्र काढण्याचा ह्या नाटकांत प्रयत्न केला [illegible]

समाजांतील अगदीं वरचा थर ह्मणजे सुशिक्षित वर्ग. ह्याची मजल विचार आणि उच्चार ह्याच्या पलीकडे जाऊन कृतीपर्यंत पोंहचली होती तो काळ ह्या नाटकाचा आहे. कितीही भयंकर वादळ होत असलें तथापि सागराचा पृष्ठभागच संक्षुब्ध झालेला असतो. खालच्या भागावर त्याचा तितका परिणाम होत नाहीं. तीच गोष्ट समाजाची आहे. सुधारणेचा प्रसार कितीहि झाला तरी शास्त्रीबुवांसारखी मंडळी समाजांत असणार ह्याचा वाचकांस अनुभव असेलच.

ह्या नाटकांत सुलोचना व दुर्गा ह्या वयानें प्रौढ असून सुशिक्षित आहेत असें दाखविलें आहे. मुंबईतील कित्येक ज्ञातींत मुलींचीं लग्नें प्रौढावस्थेंत होतात व एकंदर शिकलेल्या घराण्यांत आज लग्नाची मर्यादा बरीच वाढलेली आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसारहि झपाट्यानें होत आहे. हें नाटक लिहिल्याला पांच सहा वर्षे झालीं; इतक्या अवधींत आपल्या हिंदुसमाजांत अनेक सुशिक्षित स्त्रिया चमकूं लागल्या आहेत, व मनोरंजनांत प्रसिद्ध होणाऱ्या एका अभिनवप्रतिभासंपन्न लेखकानें लिहिलेल्या कादंबरींत नायिका अंडरग्रॅजुएट असून टेनिस खेळतांना दृष्टीस पडते; ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर वारा कोणत्या दिशेस वाहत आहे त्याची सहज अटकळ करितां येईल. आपली समाजिक स्थिति जातिपरत्वें, स्थानपरत्वें स्थितिपरत्वें वेगळाली असलेली दृष्टीस पडते. देशस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, मराठे ह्यांच्या चालीरीतींत पुष्कळ अंतर आहे. मुंबईत ज्या गोष्टी

सर्व साधारण असतात त्या पाहून नगरांतील लोकांस भांबावल्यासारखें होत
ह्याशिवाय श्रीमंत आणि गरीब हा भेदही चालीरीतींत भिन्नभाव उत्पन्न करते
तेव्हां आपल्या अवलोकनांत असलेल्या सृष्टींत निराळी वस्तुस्थिति दृष्टीस पड
इतक्यावरूनच ह्या नाटकांत रेखाटलेलें चित्र वस्तुस्थितीस धरून नाहीं अ
ह्मणतां येणार नाहीं.

ह्या नाटकाच्या वाचनानें घटकाभर करमणूक होईल, वाचकांस विशुद्ध विनो
दाचे दोन घुटके चाखावयास मिळतील व थोडासा सात्विक आनंदाचा ला
घडेल अशी आशा आहे.

गिरगांव,
मुंबई, फेब्रुवारी १९१२.

लक्ष्मण विनायक परळकर.

संशयनिरसन नाटक.

नान्दी.

पद

(दादरा. चाल-मित्रा मम जन्मकथा.)

प्रणति असो प्रथम तया जगच्चालका ।
श्रेष्ठ नीच सकलांच्या सदय पालका ॥
अगाध ज्याची न कळे कवणा लीला ।
जेणें चिखलांहि जनि दे रुचिरा कमला ॥
दुःखांतुन निपजवी अतुल जी सुखा ।
भक्तिभरें नमन करी सौख्यदायका ॥

श्लोक.

सामर्थ्यें अपुल्या विशाल जग जो पाळी दयासागर ।
नाना थोर उपाय योजुनि जनां ने सत्पथीं सत्वर ॥
गाती यद्यश संतसाधु अवघे ज्ञानी सुधी सादर ।
सर्वांलागुनि शांति सौख्य वितरो तो देव देवेश्वर ॥

अंक १.

प्रवेश १.

स्थलः-बॅक्बेवरील रेतीचें पटांगण.

(श्रीधरपंत, गोपाळराव, शंकर आणि मोरेश्वर.)

श्रीधर—मला जर विचाराल तर गोपाळरावांनीं आतां वकिलीचाच अभ्यास केला पाहिजे, असें माझें मत आहे. इतकी विद्या संपादन करून, इतक्या

परीक्षा देऊन, आतां एखादा हलका धंदा करण्यास प्रवृत्त होणें, हें मला कसें-सेंच दिसतें.

गोपाळराव—हलका धंदा तुह्मी कशास ह्मणतां, तें मला कळत नाहीं. भिक्षा मागण्याचा धंदा हलका आहे; दुसऱ्याची खुशामत करून पोट भरण्याचा धंदा हलका आहे; चोरी करण्याचा धंदा हलका आहे; परंतु मी जो धंदा करणार तो हलका कां, हें मला समजत नाहीं.

मोरेश्वर—चामडें कमविण्याचा धंदा ब्राह्मण लोक करीत नाहींत. प्रतिष्ठित लोक अजून ह्या धंद्यांत पडले नाहींत ह्मणून तो हलकाच आहे.

गोपाळराव—धंद्याच्या निवडणुकीसंबंधानें इतरांपेक्षां ब्राह्मणांचेच हातपाय बांधलेले कां असावेत, हें एक मोठें गूढ आहे. ब्राह्मणांनीं शास्त्रांत सांगितलेला आपला धर्म मागेंच सोडून देऊन दास्यवृत्ति देखील पत्करिली आहे. मग आतां हा धंदा करण्यास हरकत ती कोणती राहिली? एखादा धंदा आज प्रतिष्ठित लोक करीत नाहींत इतक्यानेंच कांहीं तो हलका होत नाहीं. उद्यां प्रतिष्ठित लोक त्यांत शिरले ह्मणजे आपोआप तोच धंदा श्रेष्ठ आहे, असें तुह्मी ह्मणाल.

श्रीधर—परंतु आजच ह्या धंद्यांत पडून तुह्मी आपणांकडे कमीपणा कां घेतां?

गोपाळराव—श्रीधरपंत, कमीपणा धंदा चालविणाऱ्या मनुष्यांत असेल, पण तो धंद्यांत नाहीं. मी जर ह्या धंद्यांत मन घातलें व तो नेकीनें चालविला तर त्या योगानें माझ्या हातून आपल्या देशाचें थोडें तरी हित होईल. मनुष्याचें मोठेपण त्याच्या धंद्यावर असत नाहीं, तर तें सद्वर्तन, प्रामाणिकपणा, उद्योगप्रियता वगैरे त्याच्या अंगच्या गुणांवर अवलंबून असतें. हल्लींच्या ह्या कठिण काळांत शिकलेल्या लोकांनीं निरनिराळे धंदे हातीं घेतल्याशिवाय आपल्या देशास चांगली स्थिति येणार नाहीं.

मोरेश्वर—तुह्मी कांहींही ह्मणा, प्रतिष्ठित धंदे सोडून हलक्या धंद्यांत पडण्यापेक्षां नोकरी करणें मी पसंत करीन. करावा तर प्रतिष्ठित धंदा करावा. आपण तर आतां ह्या परीक्षेसाठीं रिकामी डोकेफोड करण्यास कंटाळलों आहों. हे परीक्षक असतात अगदीं मठ्ठ डोक्याचे, आणि त्यांतही पहिल्या प्रतीचे पक्षपात करणारे. खरी हुशारी त्यांच्या लक्षांतच येत नाहीं. आपण त्यांचा नाद आतां सोडून देणार. अस्मादिकांची स्वारी आतां डॉक्टर बनणार आहे.

शंकर—स्वतः डाक्टर बनण्यापेक्षां युनिव्हर्सिटींतून शिक्यामोर्तबानिशीं डॉक्टर ह्मणून बाहेर पडणें बरें. थोड्यासाठीं उतावीळ होण्यांत काय हांशील आहे ? नाकाडोळ्याचे वैद्य होण्यापेक्षां एल्. एम्. ॲंड एस्. होणें चांगलें.

गोपाळराव—खरेंच, तुमची आतां एकच परीक्षा राहिली आहे; ती लवकरच उतरेल.

शंकर—आणि ती उतरली ह्मणजे तुमची पायरी वर चढेल. जरी तुमच्या परीक्षकांचें तुमच्यावर फार प्रेम असल्यामुळें ते तुह्मांस लवकर सोडूं इच्छित नाहींत, तरी तुह्मांला आणखी फार गोते खावे लागतील असें वाटत नाहीं. एवढी शेवटली परीक्षा होऊं द्या आणि मग खुशाल दवाखाना उघडून धंद्यास आरंभ करा.

मोरेश्वर—मला आतां ह्या परीक्षांचा अगदीं कंटाळा आला आहे. आणखी तुह्मी असें पहा कीं, धंद्याला आरंभ करावयाचा तो अंगांत ताकद आहे तोंपर्यंतच केला पाहिजे. परीक्षेच्या चरकांतून बाहेर पडतां पडतां अंगांतील सर्व जोम एकदां नाहींसा झाला, ह्मणजे मग धंद्याकरितां शिल्लक तें काय राहणार व त्या धंद्यांत यश कसें येणार ? द्रव्य कसें मिळणार ?

शंकर—द्रव्य न मिळालें तरी हीं भलतींच सव्यापसव्यें करण्यांत काय हांशील आहे ? मुंबईंत सध्यां डाक्टरांचा झाला आहे सुकाळ. सकाळच्या प्रहरीं एखादा चांगला न्हावी पाहिजे असला तर कोण पंचाईत पडते, परंतु डाक्टर गल्लोगल्लीं आपापलीं दुकानें मांडून गिऱ्हाइकांची मार्गप्रतीक्षा करीत बसलेले दृष्टीस पडतात ! अशा स्थितींत तुमच्या सारख्या परीक्षा पास न झालेल्या डाक्टरांस कोण विचारतो ?

मोरेश्वर—तुमच्या बोलण्यावरून व्यवहाराचा अनुभव तुह्मांस थोडा कमी आहे असें दिसतें. आमची स्वारी एकदां ह्या धंद्यांत पडली कीं सर्व डाक्टरांचें धाबें दणाणून जाईल, समजलांत ?

शंकर—होय होय, खरेंच; आणि ते मुंबई शहर सोडून पळून देखील जातील.

मोरेश्वर—तुह्मी थट्टा करीत आहां, करा बापडे. परंतु मी खचित सांगतों कीं परीक्षा पास होण्यापेक्षां धंदा चालविण्यास अकलेचीच जास्त जरूरी आहे. ही अकल अंगीं असली ह्मणजे मग दुसऱ्या कशाचीही गरजच नाहीं. परीक्षा पास झालेले किती तरी डाक्टर ही अकल नसल्यामुळें आज उपाशीं मरत आहेत

व आमच्यासारख्या झुकानेवाल्यांची दुनियेंत चंगळ चालत आहे. डाक्टरीचा धंदा चांगला चालण्यास आधीं काय काय केलें पाहिजे तें ऐका. आधीं एक भपकेदार दवाखाना उघडून त्यांत मौल्यवान व सुंदर अशा रंगीबेरंगी तऱ्हे-तऱ्हेच्या पाण्याच्या बाटल्या, टेबल, खुर्ची, वगैरे सामान नीटनेटकें रचून ठेविलें व दरवाजावर डाक्टरसाहेबांच्या नांवाची एक, दुसरी डाक्टरसाहेबांच्या भेटीची वेळ दाखविणारी, व तिसरी डाक्टर साहेब "आंत" आणि डाक्टरसाहेब "बाहेर" अशा पाट्या फडकावल्या—

शंकर—कीं बाकीच्या डाक्टरांस शहर सोडून आपला रस्ता सुधारण्याची नोटीस मिळालीच !

मोरेश्वर—नोटीस नको आणि कांहीं नको. डोकीस उत्तम जरीकांठी रुमाल किंवा फॅशेनेबल कॅप्, डोळ्यांवर सोन्याच्या स्प्रिंगचा चष्मा, नेकटाय, कॉलर व बूट पाटलोण यांसह नटून थटून आमच्यासारखे धन्वंतरी शंकरानें जाळून भस्म केलेल्या मदनास आपल्या संजीविनीनें पुनः सजीव करण्यास पुढें सरसावले, त्यांच्या रामबाण औषधांच्या जाहिरातींची मलमपट्टी प्रत्येक घराच्या भिंतीवर लागलेली दिसूं लागली, त्यांना हजारों कल्पित लोकांकडून मिळालेलीं सर्टिफिकिटें ज्याच्या त्याच्या डोळ्यांपुढें फडकूं लागलीं कीं, गिऱ्हाइकांची गर्दी झाल्याशिवाय रहाणारच नाहीं.

शंकर—आणि गिऱ्हाइकांमध्यें रोगांचीही गर्दी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

गोपाळराव—पण मोरेश्वर, अभ्यास पुरा झाल्याशिवाय डाक्टरगिरी-सारख्या थोर व जबाबदारीच्या धंद्यांत पडणें चांगलें नाहीं.

मोरेश्वर—पुनः तुमचें तेंच. धंदा पैसे मिळविण्याकरितां करावयाचा ना ? मग तशी अक्कल आपल्यापाशीं असल्यावर अभ्यासाची काय जरूरी आहे ?

शंकर—लोकांजवळून पैसे उपटण्याचें ज्ञान असलें ह्मणजे त्यांना पुरे.

श्रीधर—तुमच्या धंद्यास सनद लागत नाहीं इतकें बरें आहे. 'नाहीं मिळत भीक तर वैद्यगिरी शीक.' निदानीला हा धंदा फारच उत्तम आहे. ह्मटलें आहेना,

यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रितं ।
यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति ॥

शंकर—रोगी मेला काय, जिवंत राहिला काय, यमराजसहोदरांची तुंबडी भरली ह्मणजे झालें. नवरा मरो, किं नवरी मरो उपाध्येबुवांची नजर आपल्या दक्षिणेकडे.

मोरेश्वर—तुह्मी कांहीही ह्मणा माझी खात्री आहे कीं, डोक्यांत अक्कल असली ह्मणजे सनदेची अथवा विद्वत्तेची बिलकूल गरज नाहीं. आजच्या काळांत ज्यानें त्यानें स्वहितावर नजर ठेविली पाहिजे. 'कोणी निंदा कोणी वंदा आह्मां स्वहिताचा धंदा.' मी तर आतां डाक्टर मोरेश्वर बनून जिकडेतिकडे धांदल करून सोडणार.

(सर्व जातात.)

प्रवेश २.

स्थलः-शंकररावांचें घर.

(शंकर व गोपाळराव बोलत बसले आहेत.)

शंकर—त्यासंबंधानें आपण दोघेही एकदा हिंमतरावांस भेटूं.

गोपाळराव—माझाही त्यांना भेटण्याचा विचार आहे; परंतु त्याविषयीं पुढें पाहूं. मी तुह्माला एक दोन दिवसांनीं भेटेन. आतां मला श्रीधरपंतांजवळ कांहीं काम आहे तर मी जातों.

शंकर—मला लवकरच भेटण्यास मात्र विसरूं नका. (गोपाळराव जातो.)

यमुना—(प्रवेश करून) गोपाळराव आले होते ते गेले वाटतें ?

शंकर—तुह्मी कदाचित् कंटाळाल आणि रागावाल ह्मणून लवकरच गेले.

यमुना—जसें काय मला उठल्याबसल्या येथें आल्याशिवाय चैनच पडत नाहीं, ह्मणून परकें मनुष्य जरा आलें कीं, मी अगदीं कंटाळून जातें. पण ह्मटलें ते गोपाळराव चामड्याचा कारखाना काढित आहेत त्यांना आपल्याकडून कांहीं सांगणें झालें काय ? आपल्या वाडवडिलांनीं असा धंदा केव्हांही केला नव्हता. मग आतांच त्यावांचून काय अडलें होतें ?

शंकर—आपले वाडवडील आगगाडींत केव्हां बसले होते काय ? आपण तर नेहमीं बसतों. आपले वाडवडील इंग्रजी शिकत होते काय ? आपलें इंग्रजी-शिवाय चालत नाहीं. आपले वाडवडील चहा पीत नव्हते, बटाटे खात नव्हते, आपणांस उपासाच्या दिवशीं सुद्धां चहा व बटाटे लागतात. वाडवडिलांची स्थिति निराळी होती, आपली स्थिति निराळी आहे. सध्यां लोकांना खायाला मिळत नाहीं, देशास दारिद्र्य येत चाललें आहे, देशांतली सर्व संपत्ति परदेशीं

जात आहे, अशा वेळीं आपले वाडवडील करित होते तितकेंच करून कसा निभाव लागेल ? देशाची स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं यत्न करावयाला नको काय ?

यमुना—चामड्याचा कारखाना काढून आतां देशांत संपत्तीचा लोट येईल आणि आपला देश सुधारणेच्या अगदीं उच्च शिखराला पोंहचेल असेंच ना ?

शंकर—प्रत्येकानें आपल्या हातून जें होण्यासारखें असेल तें केलें पाहिजे. हें काम एक दोघांचें नाहीं; व एखाद्या दुसऱ्या दिशेनें यत्न केल्यानेंच आपली इतिकर्तव्यता संपत नाहीं. आपलें काम अवघड आहे अथवा लोक आपणास नांवें ठेवितील इतक्यासाठीं देशसुधारणेच्या कामीं माघार घेणें चांगलें नाहीं.

यमुना—परंतु असा धंदा केल्यानें लोकापवाद सोसावा लागेल याची वाट काय ?

शंकर—ही वेळ आतां वाट पाहण्याची नाहीं. आपल्या देशाची स्थिति सुधारण्यासाठीं सर्व कांहीं सोसण्यास तयार असलें पाहिजे. शिकलेल्या लोकांनीं तर देशसुधारणेच्या व्रताचा अंगीकार केलाच पाहिजे.

यमुना—हल्लीं जो उठला तो आपला देशसुधारणेच्या गोष्टी बोलतो, परंतु आपलें घर सुधारण्याचा कोणीच यत्न करीत नाहीं. आपण कांग्रेस भरवितां, कॉन्फरन्स भरवितां, नाहीं नाहीं ते धंदे काढतां, परंतु आपल्या घरांत काय अंधार आहे तिकडे कोणी लक्ष देतो काय ? घरांत पावलो पावलीं आपण किती अन्याय करितों, किती जुलूम करितों, ह्याचा कोणी विचार करितो काय ?

शंकर—हें तारूं कोठें चाललें आहे तें मला अजून उमजत नाहीं. मला तर ह्या अन्यायाची आणि जुलमाची वार्ताही नाहीं.

यमुना—कशाला असेल ? ज्याला कांटा रुतेल त्याच्या डोळ्यांला पाणी येईल ! दुसऱ्यांना त्याचें काय ? आपलें काम झालें ह्मणजे झालें. आपले हक्क सांभाळण्यासाठीं यत्न करावे, आपणावर जुलूम झाला तर येथून तेथून ओरड करीत सुटावें, परंतु आपण स्वतः दुसऱ्याचे हक्क पायाखालीं तुडवीत आहों, दुसऱ्याच्या सोईकडे दुर्लक्ष्य करीत आहों, तिकडे कोणाचें तरी लक्ष जातें काय ? परदुःख शीतल असतें असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. बायकांनीं पावसापाण्यांतून किंवा भर उन्हांतून छत्री घेतल्याशिवाय आणि अनवाणी फिरावें—

शंकर—त्यांच्या डोकीवर छत्री धरावयाला आतां आह्मी येऊं तेव्हां. त्यांच्या वाडवडिलांनीं छत्री घेतली नव्हती तेव्हां त्यांना कितीही सांगितलें तरी त्या

स्वतः हातांत छत्री घेणार आहेत थोड्याच. बायका स्वतः अज्ञानानें आणि दुराग्रहानें भलत्या सलत्या रूढीस चिकटून बसतील त्याला आह्मीं काय करावें? ज्यानें त्यानें आपणास सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे; निदान त्या प्रयत्नास मदत तरी केली पाहिजे. बायकांचा सारा वेळ सोंवळ्याओंवळ्यांत, व्रतें उपोषणें करण्यांत, किंवा दागिन्यांची चर्चा करण्यांत व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांत जातो. लोक आपणांस काय ह्मणतील एवढेंच त्यांचें पाहणें असतें. आमच्या मनाला जें बरें दिसेल तें आह्मी करतों. तो मोरेश्वरच पहाना—

यमुना—त्यांनीं सत्यभामाबाईंना निरोप पाठविला तो आपण ऐकला काय?

शंकर—नाहीं. काय निरोप पाठविला?

यमुना—निरोप पाठविला असेंच केवळ नाहीं, परंतु दिनकरजवळून त्यांच्या कानावर घातलें कीं दुर्गेबरोबर लग्न लावण्याची आपली इच्छा नाहीं.

शंकर--काय, दुर्गेबरोबर लग्न लावित नाहीं ह्मणतो? आणि असें करण्याचें कारण?

यमुना--कारणबिरण कांहीं माहित नाहीं.

शंकर—हें त्याचें करणें मला अगदीं गैरशिस्त दिसतें. तो इतका चंचल असेल असें वाटलें नव्हतें.

यमुना--वाटलें आणि न वाटलें त्याला करावयाचें काय? नुकतेंच आपण ह्मटलें ना कीं, आपल्या मनाला बरें दिसेल तसें करावें. लोक काय ह्मणतील याची पर्वा करूं नये. त्याचा परिणाम हा असाच.

शंकर--मग सत्यभामाबाई काय ह्मणतात?

यमुना—त्या काय ह्मणणार? ह्यांनीं नाहीं ह्मटल्यावर यांच्यावर काय जुलूम करावयाचा आहे?

शंकर—ही गोष्ट ऐकून मला फार वाईट वाटतें. मोरेश्वर आतां आतां फार स्वच्छंदी होत चालला आहे, हें कांहीं बऱ्यांतलें लक्षण दिसत नाहीं. (घड्याळाकडे पाहून) अरे समाजांत जावयाची वेळ झाली. चला कपडे करावयाला लागलें पाहिजे.

(जातो.)

प्रवेश ३.

स्थलः–डाक्टर मोरेश्वरचा दवाखाना.

दिनकर—गेल्या वर्षी ह्या वेळीं माझी काय स्थिति होती! येथें कोणाची ओळख नाहीं देख नाहीं, जवळ पैसा नाहीं, आणि त्यांत दुखणें असें आलें कीं, त्यांतून उठेन कीं नाहीं याचाच संशय. अशा वेळीं मोरेश्वरानें मला आश्रय दिला नसता, माझ्यासाठीं मेहनत घेतली नसती, तर माझी कांहीं धडगत नव्हती. मी बरा झाल्यावर पुनः पोटाची काळजी माझ्या मागें लागली. मोरेश्वराचें मी नुकसान करीन किंवा त्यास वाईट मार्गास लावीन ह्या विचारानें त्याचे हितचिंतक ते माझे शत्रु बनले. पण मी कसला वस्ताद! मोरेश्वराचें आणि त्याच्या हितचिंतकांचें वांकडें यावें व माझी मोरेश्वराला नेहमीं गरज लागावी अशा तजविजीस लागलों. शेवटची परीक्षा उतरण्याच्या आधींच डाक्टरगिरीचा धंदा सुरू करण्यास मी त्याला भर दिली आणि स्वतः त्याचा कंपाउंडर बनलों. माझ्याविषयीं सावध राहण्यास मोरेश्वराला गोपाळराव वारंवार सांगत असतात, आणि सत्यभामाबाई तर माझ्या गांवच्याच असल्यामुळें त्यांना माझी पूर्वीची एकंदर हकीगत माहित आहे. त्या मला पुऱ्या ओळखून आहेत; व मी लफंग्या व लुच्चा आहें अशी माझी नेहमीं नालस्ती करीत असतात. ह्याचा वचपा मी लवकरच काढीन ह्मणा. ह्यांच्या संबंधानें मोरेश्वरच्या मनांत वाईट ग्रह उत्पन्न करण्यास मी आरंभ केलाच आहे. सत्यभामाबाईंच्या मुलीशीं मोरेश्वराचें लग्न लागलें तर आपला येथें टिकाव लागत नाहीं हें मी आधींच समजून चुकलों. माझ्या कित्येक लबाड्या तिला समजल्या, आणि त्याबद्दल तिनें माझी चांगली कानउघाडणी केली. मीही मोरेश्वराच्या मनांत तिच्या वर्तणुकीविषयीं संशय उत्पन्न करण्याचा व त्याचें मन सुलोचनेकडे वळविण्याचा उद्योग आरंभिला आहे, व मोरेश्वराच्या मनांतून दुर्गेशीं लग्न लावण्याचें नाहीं, तो सुलोचनेच्या पाठीमागें लागला आहे असें सत्यभामाबाईंच्या कानांवर घातलें आहे. ह्या माझ्या उद्योगानें गोपाळराव, सत्यभामाबाई आणि दुर्गा ह्या तिघांचीही खोड मोडून माझें काम साधेल. आज हें पत्र मला मिळालें हें बरें झालें. ह्याचा शेवटचा भाग फाडून मोरेश्वराच्या हातांत देतों व तें गोपाळरावाच्या हातांतून पडलेलें मला मिळालें असें सांगतों ह्मणजे काम झालें. स्वतःचा स्वार्थ साधून या जगांत चैन भोगण्याकरितां सर्व कांहीं केलें पाहिजे. जेथें प्रत्यक्ष धर्मराजालाही व्यवहारांत

खोटें बोलावें लागलें, तेथें आमच्या सारख्यांची काय कथा? हें ह्या येथून फाडलें पाहिजे. (पत्र फाडून त्याचा एक भाग बाहेरच्या खिशांत घालतो.) अरे, परंतु आमचे डॉक्टरसाहेब आले. (पत्राचा दुसरा भाग घाईघाईनें आंतल्या खिशांत घालतो.) (मोरेश्वर येतो.)

मोरेश्वर—कायरे दिनकर, त्या जाहिराती छापावयाला दिल्या ?

दिनकर—होय, दिल्या, आणि त्या पेंटरलाही भेटून आलों. आपला थाट तर नीट जमत चालला; परंतु ते गोपाळराव अगदीं हात धुऊन आपल्या पाठीस लागले आहेत. त्यांस मात्र आपण संभाळा. त्यांचें मला भय वाटत आहे.

मोरेश्वर—दिनकर त्या गोपाळरावासंबंधानें तुला उगीच संशय येतो. माझ्या ह्या धंद्यासंबंधानें त्यांचें जरी अनुकूल मत नाहीं तरी तो माझें नुकसान करण्यास कधींही प्रवृत्त होणार नाहीं. तो त्या प्रकारचा मनुष्य नाहीं.

दिनकर—धनीसाहेब, आपण आपल्यावरून जग ओळखितां. आपण स्वतः उदार दिलाचे असल्यामुळें दुसरे सर्वजण आपल्यासारखेच असतील असें आपणास वाटतें. गोपाळरावांचे सर्व पराक्रम जर आपल्या कानीं येतील–पण तें असो. निदान इतकें तरी खरें कीं, ते जेव्हां तेव्हां धनीसाहेबांची नालस्ती करीत असतात. हिंमतरावांचा आणि त्यांचा पूर्वीपासून फार घरोबा असल्यामुळें त्यांनींच आपल्या विरुद्ध हिंमतरावांचे कान भरून टाकिले आहेत. आपण हा धंदा काढला आहे हें त्यांना अगदीं पाहवत नाहीं. ते आधींपासूनच ह्मणतात कीं तो चालणार नाहीं.

मोरेश्वर—त्यांचें ह्मणणें इतकेंच कीं, परीक्षा उतरेपर्यंत मी ह्या धंद्यांत पडूं नये.

दिनकर—जणूं काय ते तुमचे मोठे हितचिंतकच आहेत ! इतकेंच जर त्यांचें ह्मणणें असतें तर धनीसाहेबांची इतकी निंदा करण्याची त्यांना काय गरज होती ? ते ह्मणतात कीं, आपल्या अंगांत तितकें पाणीच नाहीं. धंदा चालविणें ही कांहीं खावयाची गोष्ट नाहीं. आपल्या हातून ही गोष्ट होणारच नाहीं. लोकांवर आपली छाप बसविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांतच नाहीं. माझी तर ह्या धंद्यांत पूर्ण यश येईल अशी खात्री आहे. परंतु गोपाळराव पडले आपले जुने आणि अस्सल स्नेही. ते आपल्या हिताचीच गोष्ट सांगत असतील. त्यांच्या ह्मणण्याचा आपण नीट विचार करावा, नाहीं तर पुढें फसल्यासारखें होईल.

मोरेश्वर—दिनकर, तूं भिऊं नकोस. गोपाळरावांना तसें वाटतें मात्र; ह्या पलीकडे कांहीं नाहीं. आपला धंदा एकदां चांगला चालूं लागला ह्मणजे तेच आपली वाहवा करूं लागतील.

दिनकर—वाहवा करतील ह्यांत कांहीं संशय नाहीं. तुह्मांला काय सांगूं ! तुह्मी अजून त्यांना पुरें ओळखिलें नाहीं. धंद्याची गोष्ट एक वेळ असूं द्या. दुसऱ्या एका नाजूक बाबतींत धनीसाहेबांस कांहीं सांगावयाचें होतें. मी मागें आपणाजवळ ह्यासंबंधानें एक दोनदां गोष्ट काढली होती, परंतु नको. त्यांत माझा काय संबंध आहे ? बरें, संबंध नाहीं ह्मणावा तर धनीसाहेबांचें मी अन्न खात आहे.

मोरेश्वर—अरे, असें काय आहे तें सांग तर खरा. तूं मनांत कांहीं आणूं नको.

दिनकर—परंतु आतां ती गोष्ट नको. कदाचित् माझी माहिती चुकीची असेल, आणि तीमुळें उगाच तुमच्या जीवाला वाईट वाटेल. कारण ती गोष्ट खरोखरी तशीच आहे.

मोरेश्वर—दिनकर, तुझ्या मनांत काय असेल तें स्पष्ट सांग. मला तूं कांहीं भलती सलती किंवा खोटी गोष्ट सांगणार नाहींस, अशी माझी खात्री आहे. तूं जें सांगशील तें खरेंच असलें पाहिजे.

दिनकर—बरें आहे तर, धनी साहेब. आलेंच तें कपाळीं तर आतां सांगतों; माफ करा ह्मणजे झालें. आपण माझे आश्रयदाते. आपला ज्या गोष्टींत संबंध येतो आणि जीवर आपली अब्रू आणि सर्व सुख अवलंबून आहे, ती गोष्ट मला तरी आपल्या कानावर घातलीच पाहिजे. ह्यासंबंधानेंही मागें मला " तूं फार संशयखोर आहेस" ह्मणून आपण ह्मटलें होतें. माझा संशय निराधार आहे असें ठरलें असतें—

मोरेश्वर—तुझ्या मनांतून दुर्गेसंबंधानें बोलावयाचें आहे. मागें एक दोनदां दांत चावीत चावीत तूं कांहीं बोलत होतास. माझा स्वभाव संशयी नाहीं. भलत्याच संशयास मी मनांत थारा देणार नाहीं; व संदिग्ध भाषणें मला आवडतही नाहींत. मी तुला स्पष्ट सांगतों कीं, दुर्गेसारख्या सुशिक्षित स्त्रीच्या हातून कोणतीही वाईट गोष्ट होईल असें मला वाटत नाहीं.

दिनकर—कदाचित् नाहीं होणार; तें तरी कोणी सांगावें. परंतु आज गांवांत ज्याच्या त्याच्या तोंडीं जी गोष्ट झाली आहे—

मोरेश्वर—काय ह्मणतोस गांवभर अशी कांहीं अफवा पसरली आहे ?

दिनकर—धनीसाहेब अशा गोष्टी कोठें फार वेळ लपत असतात ? लोक ह्यासंबंधानें आपल्या मागें आपली किती कुचेष्टा करीत असतात. आपले एक

स्नेही परवां ह्मणत होते कीं, मोरेश्वर आपणास मोठे धूर्त समजतात; परंतु त्यांच्या पायांखालीं काय जळतें याची देखील त्यांना बातमी लागत नाहीं.

मोरेश्वर—दिनकर, लोकांना उगाच दुसऱ्याची निंदा करण्याची हौस असते, दुसरें कांहीं नाहीं.

दिनकर—मलाही आधीं तसेंच वाटलें होतें, परंतु तुमच्या हिताचा ह्या गोष्टीशीं संबंध असल्यामुळें मी ह्याचा पुरा तलास लावण्याचा निश्चय केला आणि माझी तर खात्री झाली कीं, ह्या बाबतींत गांवांत जी अफवा आहे ती कांहीं खोटी नाहीं. तुह्मांला सांगितलें तर खोटें वाटेल, परंतु मी स्वतः रात्री अपरात्रीं गोपाळरावांस दुर्गेच्या घरीं जातांना——

मोरेश्वर—गोपाळरावांस ?

दिनकर—मोझे डोळे मला फसवितील काय ? किंवा मी तरी तुह्मास फसवीन काय ? माझ्यावर आपला विश्वास नसेल तर मग बोलणेंच राहिलें.

मोरेश्वर—दिनकर, ह्या सर्व मुंबई शहरांत तुझ्यासारखा माझ्या हितासाठीं झटणारा आणि माझी काळजी वाहणारा दुसरा कोणी नसेल. तूं कांहीं मला खोटें सांगणार नाहींस ही माझी खात्री आहे, परंतु—

दिनकर—आपलें ह्मणणें बरोबर आहे. सबळ पुरावा हातीं आल्याशिवाय अशा गोष्टींत कोणाचें ऐकूं नये. आज ह्यासंबंधाचा आणखी पुरावा हातीं आल्यामुळें मी पुनः हीच गोष्ट आपणाजवळ काढली. आज गोपाळराव कांहीं विचारांत मग्न झालेले असे रस्त्यांतून जात होते. जातां जातां त्यांनीं खिशांतून एक पत्र काढलें आणि फाडून त्याचे तुकडे करून टाकून दिले. त्यांच्या निष्काळजीपणामुळें ह्मणा किंवा त्यांचें डोकें ठिकाणावर नव्हतें ह्मणून ह्मणा, त्या पत्राचा शेवटचा भाग तसाच खालीं पडला आणि तो माझ्या हातीं लागला. हा पहा तो भाग.

मोरेश्वर—(कागद हातांत घेऊन) हें अक्षर तर दुर्गेचेंच आहे. पत्राचा खालचाच भाग शिल्लक आहे. (वाचतो.)

"एका गोपाळरावाशिवाय मला कांहींच दिसत नाहीं. मला एकटीला करमत नाहीं. तुमच्या भेटीसाठीं मी फार आतुर झालें असून चातक पक्ष्याप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत आहें. लवकरच आपली भेट होऊन आपणांस एकत्र आनंदानें व सुखसमागमांत वेळ घालविण्यास मिळेल अशी आशा करणारी

दुर्गा."

मी स्वप्नांत तर नाहीं ना? माझे डोळे मला फसवित तर नाहींत? जिच्या सत्यनिष्ठेसंबंधानें मी माझे प्राणही पणीं लावले असते तीच ही दुर्गा काय? तर मग आजपर्यंत मजवर दाखविलेलें सर्व प्रेम खोटेंच? काय हें कपट आणि मानभावीपणा! एकूण दुराचारालाही रमणीय स्वरूप धारण करून जगास फसवितां येतें. इतक्या सुंदर आकृतींत इतकें काळें हृदय असूं शकेल असें कोणाला स्वप्नांत तरी वाटलें असतें काय आणि हा सदाचरणाविषयीं नावाजलेला गोपाळराव! गोपाळराव, तूं इतका नीच असशील असें कोणाला वाटलें असतें काय? आपल्या स्नेह्याच्या हातूनच आपला गळा कापला जावा काय? खरोखर ह्या जगांत विश्वास ठेवण्यालायक असें कांहींच राहिलें नाहीं. दुर्गेचें सरल हृदय व निष्कपट प्रेम तें हें! (किंचित् मोठ्यानें) बस, आजपासून तिचें तोंड काळें. दिनकर, हें पत्र मजजवळ राहूं दे. माझें मन सध्यां ठिकाणावर नाहीं. तूं जा येथून.

दिनकर-- (जातां जातां स्वगत) गोळी बरोबर लागली. आतां हा संशय दृढ करण्यास वेळ लागणार नाहीं. तसेंच आतां ह्या स्वारीचें मन सुलोचनेकडे वळविणें देखील कठीण नाहीं. आतां मला त्याच तजविजीस लागलें पाहिजे. (जातो.)

प्रवेश ४.

स्थलः—सत्यभामाबाईच्या घरांतील एक खोली.

(दुर्गा विचार करीत बसलेली आहे.)

दुर्गा—संकटें आलीं ह्मणजे एकएकटीं येत नसतात असें ह्मणतात, तें खोटें नाहीं. बाबांना व्यापारांत एकदम ठोकर बसली आणि त्या धक्क्यानें ते एकाएकीं मरण पावले. ते वारल्यानंतर कर्ज फेडण्याच्या पायीं सर्व इस्टेटीची धूळधाण झाली, आणि जरा कमी होतें तर आमच्या लग्नाचा संकल्प आधींच ठरलेला असतांना दिनकर ह्मणतो कीं, आतां ते माघार घेत आहेत. आई सांगते कीं, आमची गरिबी झाली ह्मणून अशी अपेष्टा आणि अपमान सोसण्याचा प्रसंग आला. हें खरें असेल काय? मला तर तसें वाटत नाहीं. पैसा ही अजब चीज आहे व पुष्कळजण त्याच्या भजनीं लागतात, त्याच्यासाठीं वेडावून जातात ही गोष्ट खरी; परंतु येथून तेथून सर्व पुरुषांना पैशाशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं, ही गोष्ट संभवनीय नाहीं; आणि पैशाशिवाय आतां त्यांचें अडून राहील असें थोडेंच आहे. ते आतां डाक्टरगिरी

करितात. मोठ्या थाटाचा दवाखाना काढला आहे व पैसेही पुष्कळ मिळवितात असें मी ऐकतें; तर मग पैशासाठीं आपली इभ्रत अशा रीतीनें घालवितील, आपला शब्द मोडतील, असें माझें मन मला सांगत नाहीं. मग त्यांचें मजवरील प्रेम कां बरें नाहींसें व्हावें? मला वाटतें कोणी तरी दुष्टानें माझ्याविषयीं त्यांच्या मनांत कांहीं काळेंबेरें भरून दिलें असावें. नाहीं तर असें करण्यास तयार होणें हें त्यांचें ब्रीद नाहीं. ह्याच्या मूळाशीं काय आहे तें शोधून काढिलें पाहिजे. दिनकर गुलाम नीट सांगत नाहीं; परंतु ते आतांशा सुलोचनेच्या मागें लागलेले असतात असें एकंदर धोरणावरून दिसतें. विचारी सुलोचना! ती माझ्यासाठीं कितीतरी हळहळते. परंतु तिचा काय इलाज आहे? बायकांचें जिणें ह्मटलें ह्मणजे सर्वस्वीं परस्वाधीन. तरी आह्मांला मुलाप्रमाणें शिक्षण दिलें. यमुनेचें लग्न जरा लवकर झाल्यामुळें तिचें उच्च प्रतीचें शिक्षण अपुरेंच राहिलें, परंतु बाबांच्या आणि हिंमतरावांच्या मनाप्रमाणें मला आणि सुलोचनेला शिक्षण मिळालें, एवढें तरी आमच्या सुदैवानें ठीक झालें.

यमुना—(प्रवेश करून) काय दुर्गाबाई, कसला विचार चालला आहे?

दुर्गा—दुसरा कसला विचार करणार? आमचीच रडकथा आणि नशीबाचे खेळ यांचा विचार करीत होतें.

यमुना—तूं नेहमीं अशी काळजींत असतेस हें बरें नाहीं. हे दिवस नेहमीं असेच राहतील असें नाहीं. ज्याप्रमाणें वर्षांतील कांहीं महिने उन्हाळ्याचे असतात, कांहीं पावसाळ्याचे असतात, कांहीं हिंवाळ्याचे असतात, त्याप्रमाणें केव्हां चांगली स्थिति येते, केव्हां वाईट येते, कधीं सर्व साधारण राहते. कोणतीही स्थिति आली तरी आपण मनाचा समतोलपणा सोडूं नये.

दुर्गा—यमुने, दुसऱ्यांस उपदेश करणें फार सोपें आहे. तुझा उपदेश वावगा आहे, असें मी ह्मणत नाहीं; परंतु सर्व प्रकारच्या स्थितीमध्यें मनाचा समतोलपणा राहणार कसा? आपलें जिणें तरी इतकें परस्वाधीन कां असावें?

यमुना—जी गोष्ट आपल्या हातांतली नाहीं त्यासंबंधानें उगाच विचार करून कष्टी होण्यांत काय हांशील आहे? जिणें परस्वाधीन असलें तर आपणावरची तितकी जबाबदारी कमी झाली ह्मणून आनंद मानून घ्यावा.

दुर्गा--पुरुषांच्या आवडीनिवडीप्रमाणें आपणांस आपलें आयुष्य कंठावें लागावें, त्यांच्या आवडीनिवडीचा-प्रसंगविशेषीं केवळ लहरीचा परिणाम आपणांस भोगावयास लागावा हा अन्याय नव्हे तर काय?

यमुना--(थोडा वेळ विचार करून) तूं एखाद्या गोष्टीचा इतका ध्यास कां ध्यावास, हें मला समजत नाहीं. डाक्टर मोरेश्वरानें जर वचनभंग केला तर त्याचा नाद सोडून द्यावा आणि निरुपायास्तव दुसरीकडे कोठें जमलें तर पहावें.

दुर्गा—यमुने, माझ्या एकटीसंबंधानें मी विचार करीत नव्हतें, परंतु तूं गोष्टच काढलीस तर तुला मी असें विचारतें कीं, ज्या गोष्टीवर आपलें सर्व भावी सुखदुःख अवलंबून असतें त्यासंबंधानें आपणास कांहींच करतां येऊं नये काय? आपली स्थिति एखाद्या लांकडाच्या बाहुलीप्रमाणें असावी आणि आपल्या सुखदुःखाची विल्हेवाट सर्वस्वीं दुसऱ्यांनीं लावावी हें तुला बरें दिसतें काय? आपण माणसें आहोंत, आपल्या शरीरांत जीवंत-ताजें रक्त खेळत आहे. पुरुषांप्रमाणें आपणांसही सुखःदुख होतें, मग आपल्या आवडीनिवडीसंबंधानें थोडा अधिक विचार करावयास नको काय? आपल्या कृत्यांबद्दल जी काय जबाबदारी असेल तीही आपण अंगावर घेतलेली बरी नाहीं काय?

यमुना--आपल्या हक्कांची जेव्हां तेव्हां पायमल्ली होते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं, परंतु जेथें आपला नाइलाज आहे, तेथें रिकामी उरस्फोड करण्यांत अर्थ नाहीं. माझें ऐकशील तर तूं गत गोष्टींची आठवण करून व्यर्थ जीवाला शिणवूं नयेस.

दुर्गा--तुला वाटतें तितकें माझें मन माझ्या स्वाधीन नाहीं. त्यांचें मन ताळ्यावर आणण्यास जर मला कोणाची मदत असती तर त्यांच्याकडून जमसंबंधीं असें विपरीत वर्तन कां झालें हें शोधून काढण्याचा मी प्रयत्न करून पाहिला असता. मला एखादा भाऊ असता तर किती बरें बरें झालें असतें?

यमुना—भाऊ नाहीं तर मग तूं एखाद्या कल्पित कथेंतील नायिकेप्रमाणें पुरुषाचा वेष धारण करून डॉक्टर मोरेश्वरच्या दवाखान्यांत कंपौंडर होऊन राहीनास? तुझी कल्पना मला मुळींच पसंत नाहीं. तुझ्या मानानें मोरेश्वर अगदीं कमी योग्यतेचे आहेत असें मला वाटतें. तथापि ह्या द्रव्यलोभी व बेइमानी मनुष्यास ताळ्यावर आणण्याकरितां कांहीं युक्ति योजण्याची तुझी इच्छाच असेल तर मी तुला आनंदानें मदत करीन.

दुर्गा--यमुने, कोणत्याही गोष्टीसंबंधानें पुरी माहिती असल्याशिवाय दुसऱ्यास बोल लावूं नये. आपलें नशीबच आपल्या आड येत असलें तर दुसऱ्यास तरी काय म्हणून दोष द्यावा? सध्यां मी अगदीं हताश झालें आहे व मला कांहीं

युक्ति सुचत नाहीं. तात्यासाहेब लवकरच मुंबईस येणार आहेत. त्यांचे माझ्या लग्नासंबंधानें काय विचार आहेत तेही मला आधीं समजले पाहिजेत. शिवाय भलतेंच धारिष्ट करून आपलें नांव निंदकांच्या जिव्हेवर एखाद्या चेंडूप्रमाणें खेळतें ठेवावें हें मला आवडत नाहीं. स्त्रियांची निंदा करणें आणि कुत्सित बुद्धीनें त्यांच्या अब्रूवर घाला घालणें यांतच लोकांना मोठी मौज वाटते. एखादें साहस करून माझ्यासंबंधानें चर्चा करण्यास त्यांस अवसर द्यावा असें माझें मन मला सांगत नाहीं. इतक्या अडचणी असल्यावर मला कांहीं करतां येईल कीं काय याचा संशयच आहे, परंतु प्रसंग आलाच तर तुझी आणि सुलोचनेचीही मदत मिळेल असा मला भरंवसा आहे.

सत्यभामा—(पडद्यांतून) दुर्गे, दुर्गे, तीं पूजेचीं फुलें कोठें ठेविलीं आहेस तीं आण पाहूं.

दुर्गा—आणतें हं आई.

यमुना—चल, माझीही स्वयंपाकाला जाण्याची वेळ होईल आतां.

(जातात.)

प्रवेश ५.

स्थलः—डॉक्टर मोरेश्वरचा दवाखाना.

(श्रीधरपंत, शंकरराव, व शास्त्रीबुवा.)

शंकर—शास्त्रीबुवा, आजकालचे सुधारक काय करतील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं. त्यांच्यापुढें तुमच्यासारख्यांची चर्पटपंजरी चालणार नाहीं.

शास्त्रीबुवा—हा सारा कलियुगाचा महिमा. कलियुगांत असें असें होईल ह्मणून पुराणांतरीं वर्णन केलें आहे त्याचा आपणांस प्रत्यक्ष प्रत्यय येत आहे. व्यासवाक्य कधींही खोटें होणार नाहीं.

श्रीधर—(डोळे मिचकावून) इंग्रजी शिकलेल्या पुरुषांचे चाळे पुरे झाले नाहींत ह्मणूनच जणूं काय ते बायकांसही इंग्रजी शिकवूं लागले आहेत.

शंकर—(श्रीधरकडे वांकडया नजरेनें पाहून) शास्त्रीबोवा परवां रावसाहेबांच्या घरीं काय झालें तें ऐकलेंत काय ? त्यांच्या मुलीनें ह्मणे स्नान झाल्यावर टुवालानें अंग पुसलें.

शास्त्री०--अब्रह्मण्यम् ! अब्रह्मण्यम् !

शंकर—(गालांतल्या गालांत हंसून) काय हें भयंकर पातक ! आपल्या पूर्वीच्या बायकांस असले अनाचार ऐकून तरी ठाऊक होते का ?

शास्त्री०--कलियुग ! कलियुग !! हा सर्व कलियुगाचा महिमा !!! आपल्या सनातन धर्मांचा लोप झाला. शास्त्रें पुराणें रसातळास गेलीं. पृथ्वीवर जेथें तेथें अधर्म आणि अनाचार प्रबल होऊं लागला.

शंकर--स्त्रीनें आणि टुवालानें अंग पुसलें ! खरोखर वैदिक धर्मांचा लोप झाला.

श्रीधर—शास्त्रीबुवा, हे शंकरराव तुमची थट्टा करीत आहेत. हे स्वतः आंतून सुधारकच आहेत आणि त्यांचे परम स्नेही गोपाळराव यांनीं मोच्याचा धंदा स्वीकारला आहे, हेंही तुह्मांस ऐकून माहीत असेलच.

शास्त्री०—ब्राह्मणांनीं आणि मोच्याचा धंदा ! शिव ! शिव ! ह्या लोकांनीं अगदींच ताळ सोडला. ह्या वेळीं पेशवाई असावयाला पाहिजे होती ह्मणजे यांचे दांतच पाडले असते.

श्रीधर--शास्त्रीबुवा, पेशवाई असती तर धर्मांच्या नांवावर आपला पराक्रम गाजविण्यास आपणासारख्यांस अवसर मिळाला असता, यांत संशय नाहीं. परंतु अजून आपल्या हातांत आहेत ते उपाय योजून पाहतां येतील.

शंकर—होय, शिव्याशाप देण्याचें आपल्या हातांत आहे, तेवढें करून घ्यावें.

श्रीधर - शिव्याशाप कशाला पाहिजेत ? अहो ग्रामण्य करून--

शंकर—तुमच्या ग्रामण्यास आतां कोण विचारतो ? आणि ग्रामण्याचा रोपा मुंबईच्या जमिनींत जीव धरीत नाहीं. या शहरचें हवापाणी त्यास मानवत नाहीं.

श्रीधर—शास्त्रीबुवांनीं मनावर घेतलें तर ते गोपाळरावांना पाहिजे त्या रीतीनें अडवूं शकतील. ते उदारपणानें मनावर घेत नाहींत ह्मणून ह्या सुधारकांचें फावतें.

शंकर--खरेंच. ह्या कलियुगांत इतकी रिकामी उठाठेव करण्याची त्यांना जरुरी वाटत नाहीं.

श्रीधर--रिकामी उठाठेव कां ह्मणतां ? धर्मांचें रक्षण करणें हा त्यांचा अधिकार आहे. अधर्मांचा उच्छेद करण्यासाठीं शास्त्रीबुवा पाहिजे तें करण्यास सिद्ध होतील.

शंकर—हें महत्कार्य त्यांच्या हातून कसें होणार हाच काय तो प्रश्न आहे.

श्रीधर--अहो, शास्त्रीबुवा ह्मणजे ह्या शहरांतले शंकराचार्यच आहेत. त्यांच्या हातून काय होणार नाहीं? एकदां त्यांना मनावर मात्र घेऊं द्या, ह्मणजे पहा ते तुह्मां सुधारकांची कशी त्रेधा उडवून टाकतात ती!

शंकर--ते मनावर घेत नाहींत हा एकपरी त्यांचा शहाणपणाच आहे. नाहीं त्या उलाढाली करून उगाच आपली मिळकत कमी करावी ह्यांत काय हांशील आहे? कां शास्त्रीबुवा?

श्रीधर—शास्त्रीबुवा, हे लोक तुमच्या मानसिक औदार्याचा आणि सौजन्याचा फाजील फायदा घेतात, हें आपल्याला आवडत नाहीं. तुमच्या जागीं मी असतों तर खरोखर ह्या सुधारकांचें धाबें दणाणवून सोडलें असतें. त्यांना घटकाभरही चैन पडूं दिलें नसतें. त्यांचे चाळे बंद झाल्याशिवाय आपल्या सनातन धर्मांची कांहीं धडगत दिसत नाहीं.

शंकर--धर्माभिमान्यांच्या धर्मांचें धड कोणालाही सहज दिसूं शकेल. कोण कोणता धंदा करतो, तोंड धुतांना, स्नान करतांना कोणत्या दिशेला तोंड करतो इत्यादि गोष्टींवर सक्त नजर ठेवून धर्मांचें नियमन करणारा एकादा प्राणी लवकरच जन्मास येईल.

शास्त्री०--अहो, अधर्म फार झाला ह्मणजे तसें कांहीं तरी झालेंच पाहिजे. झटलें आहेना "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्-"

शंकर—परंतु शास्त्रीबुवा, धर्म कोणता तें आधीं आह्माला समजलें पाहिजे. 'जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतु र्यः स धर्मः।'

श्रीधर—शंकरराव, बरीच वेळ झाली. असल्या तुमच्या शेंकडों वाक्यांनीं हे शास्त्रीबुवा गडबडून जातील असें तुह्मांस वाटतें काय? पुरे करा आतां. डाक्टर इतक्यांत येतील असें वाटत नाहीं; तर चला सहल करावयास जाऊं.

शंकर—शास्त्रीबुवा, चला येत असाल तर आपण श्रीधरपंतांबरोबर रपेट करावयास जाऊं, ह्मणजे तुमच्याबरोबर तुमच्या धर्मांसही थोडेंसें चालन मिळेल.

शास्त्री०—तुह्मी पुढें व्हा, मी आलोंच मागून. (शास्त्रीबुवा शिवाय करून बाकीची मंडळी जाते.) (स्वगत) फार दिवस झाले, त्या फणसवाडींतल्या राघाजी कडे गेलों नाहीं. आज द्वादशी आहे तेव्हां एक फेरा टाकावा तेथें.

दिनकर—(प्रवेश करून) कसें काय शास्त्रीबुवा, आज धर्माची खूपच चर्चा चालली होती.

शास्त्री०—अरे, नुसती चर्चा करावयाला काय झालें! हे इंग्रजी शिकलेले लोक, ह्यांना धर्माची खरी आस्था असेल तेव्हां ना!

दिनकर—परंतु शास्त्रीबुवा, गोपाळरावांसारख्या ब्राह्मणानें मोच्याचा धंदा करावा हें अगदींच विपरीत दिसतें. ह्याला कांहीं तरी इलाज केला पाहिजे.

शास्त्री०—इलाज काय करणार? हल्लींचा मनूच तसा आहे.

दिनकर—आपल्यासारख्या सनातन धर्माच्या केवळ आधारस्तंभानें असें ह्मणून हात पाय गाळून स्वस्थ बसावें, हें आपल्याला तर ठीक दिसत नाहीं.

शास्त्री०—बाबारे, आमच्या हातून काय होणार आहे? दाढा आणि नखें काढलेल्या सिंहासारखी आमची स्थिति झाली आहे.

दिनकर--असें कां ह्मणतां? कसें जरी झालें तरी आपण प्रतिशंकराचार्य! सनातन धर्माभिमान्यांची सर्व भिस्त आज आपणांवर आहे. आपल्या हातून जें होईल तें दुसऱ्या कोणाच्या हातून होणार आहे? आतां हेंच पहा ना. गोपाळरावांच्या मनांतून आपल्या रावसाहेबांच्या मुलीबरोबर लग्न लावण्याचें आहे. आपण जर अंबाबाईचे कान फुंकले तर हें लग्न जुळण्याची आशाच नको. त्यांत तर आपण रावसाहेबांचे कुलोपाध्याय! ह्या गोष्टींत मन घालणें हें आपलें कर्तव्य आहे. यजमानाची मुलगी मोच्याच्या गळीं बांधल्यानें आपला किती तरी दुर्लौकिक होईल! शिवाय गोपाळरावांसारख्या धर्मबाह्य लोकांचें पारिपत्य करण्याचाही आपला अधिकार–नव्हे धर्म आहे. आपणांसारखे कर्मनिष्ठ लोक आपल्या धर्मास जागणार नाहींत ही गोष्ट तर संभवतच नाहीं.

शास्त्री०--दिनकर, धर्मापुढें मला सर्व कांहीं तुच्छ आहे.

दिनकर--वास्तविकच आहे. ह्या इंग्रजी शिकलेल्या लोकांना एक धर्माची चाड नाहीं ह्मणून ती आपणांसारख्या सनातन धर्माच्या करड्या अभिमान्यांना नसेल कीं काय? मला ठाऊकच आहे कीं, धर्मासाठीं तुह्मी प्राणही देण्यास तयार व्हाल.

शास्त्री०—बरोबर आहे. "स्वधर्मे निधनं श्रेय:" गोपाळरावांसारख्या मंडळीची खोड मोडलीच पाहिजे. ह्या कामीं अंबाबाई माझें ह्मणणें नि:संशय मनावर घेतील.

दिनकर—आपणांसारखे धर्मसंरक्षक जर आज नसते तर आपल्या लोकांची काय स्थिति झाली असती तें सांगवत नाहीं.

शास्त्री०--आतां उशीर होत आला, तर मी माझ्या कामास जातों. (जातो.)

दिनकर--गोपाळराव संभाळून अस. आतां ह्या दिनकराशीं गांठ आहे. मी एकदां कोणत्याही कामास हात घातला ह्मणजे मग मागें घेणार नाहीं. दुर्गावहिनी, बस ह्मणावें आतां हांका मारीत. सापाच्या शेपटीवर पाय दिल्यावर तो चावल्याशिवाय राहील काय? तुझी आणि मोरेश्वराची प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें जरी गांठ बांधून ठेवली असली तरी ती सोडविणारा हा पठ्या आहे. मी रचलेलें कारस्थान फसेल असें कालत्रयींही होणार नाहीं. ज्याच्या डोकींत अक्कल आहे, त्याला यश हें ठेवलेलेंच आहे.

(अंक १ समाप्त.)

अंक २.

प्रवेश १.

स्थलः—डाक्टर मोरेश्वरच्या दवाखान्याची आंतली खोली.

(दिनकर व धोंड्या.)

दिनकर—धोंड्या, तुला दररोज कितीही पढवून ठेविलें तरी तूं कांहीं ना कांहीं तरी चुकी करतोस. तूं डाक्टरसाहेबांची केव्हां फजिती करशील तें सांगतां येत नाहीं. आतां ऐक. नीट लक्षांत ठेव. कोणी रोगी आला आणि डाक्टर-साहेब त्याला तपासूं लागले ह्मणजे चारपांच मिनिटांनीं त्यांना जाऊन सांगत जा कीं टर्नर, नाहीं तर शार्प, नाहीं तर दुसऱ्या एखाद्या साहेबानें रात्रीं त्यांना जरूर बोलाविलें आहे. त्याची मडम फार बेजार आहे.

धोंड्या—पण मी कल डाक्टरसायबास्नी ह्मंगालों त्या **मसण्या** साय-बानीं तुह्मास्नी बोलावलाय तर ते रागावल्याती.

दिनकर—अरे गाढवा, कोणत्या तरी साहेबाचें नांव घ्यावयाचें. मसण्या साहेबानें असें नाहीं बोलावयाचें. तुला नांव येत नसेल तर मला विचारित जा. पुनः पांच मिनिटें झालीं ह्मणजे ह्मणावें कीं मेमणवाडींतील नबाव दुपारीं गाडी पाठविणार आहेत. ते फार आजारी आहेत.

धोंड्या—पण डाक्टर सायबास्नी सांगून ठेवा कीं परवांचेवानी कोनचा नबाब असें इचारूं नका.

दिनकर—मूर्खा, कोठला नबाब असें त्या दिवशीं तुला विचारलें तर 'परवां मेला तो' ह्मणून जबाब दिलास. तूं अगदींच अजागळ आहेस. आतां तरी मी सांगतों तें नीट ऐकून ठेव. पुष्कळशीं डाक्टरसाहेबांच्या नांवाचीं पत्रें मी तयार करून ठेविलीं आहेत त्यांतून पांच पांच मिनिटांनीं एकेक पत्र डाक्टरसाहेबांच्या हातांत नेऊन देत जा; आणि धोंड्या तूं लक्षांत ठेव, पत्रें संपलीं तरी त्या दिवसासा-रखा सांगावयाला जाऊं नकोस कीं आतां पत्रें संपलीं; दुसरीं तयार होत तोंपर्यंत दम धरावा. आणखी हें पहा, गिऱ्हाईक फार वेळ बसलें तर जाऊन सांगत जा कीं, दादीबायचा नवरा फार आजारी आहे, तुह्मांला आतांच बोलावलें आहे. धोंड्या त्या दिवसासारखा तूं गचाळपणा करूं नकोस. त्या दिवशीं तो नाना जावयाला

लागला आणि तूं जाऊन त्यांस ह्मणालास कीं, जरा थांबा; आतां दादीबायचा नवरा आजारी होईल तर तेवढें मी डाक्टरसाहेबांस सांगितलें ह्मणजे तें ऐकल्यावर जा.

धोंड्या—पण मी सांगाया येतों इतक्यामंदी ते जाया निघाले. तंवा मी तरी काय करूं ? मी तेस्नी ह्मंगालों जरा दम धरा आतां त्येचा आजारी होयाचा वखत झालाया.

दिनकर—तूं अगदीं मूर्ख आहेस. अरे, ह्या दवाखान्यांत कसें हुशारीनें वागलें पाहिजे. तूं जर हुशारी दाखविली नाहींस तर तुला तुझ्या गांवीं पाठवून द्यावें लागेल.

धोंड्या—आजपासून लयी लयी हुशारी दाखवतों पघा.

दिनकर—आतां आंत जा पाहूं. माझें डाक्टरसाहेबांकडे थोडें काम आहे. (धोंडू जातो.) (दिनकर दार उघडतो व मोरेश्वर दवाखान्यांत विचार करीत बसलेला दृष्टीस पडतो.)

मोरेश्वर--(स्वगत) एकूण दिनकरचा संशयच खरा ठरला. त्याच्यासारखा विश्वासू मनुष्य तसेंच कांहीं असल्याशिवाय असली.गोष्ट माझ्या जवळ काढताच ना. मी आजपर्यंत किती तरी भ्रमांत होतों. जग हें असें खोटें आणि मायामय आहे. बाहेरून तें सुंदर स्वरूप धारण करतें परंतु हा सौंदर्याचा पडदा दूर करून पाहिलें तर त्याचें स्वरूप आंत किती हिडीस आणि ओंगळ आहे तें दिसून येतें. हें बाहेरून सौख्यानें भरलेलें दिसतें, परंतु आंतून केवळ दुःखमय आहे. चंचलता, असत्य आणि माया यांची मूस ओतून ब्रह्मदेवानें स्त्री जातीस उत्पन्न केलें आहे. त्याचा हेतु हाच कीं पुरुषांनीं त्यांच्या मोहजालांत सांपडून ह्या संसाराच्या भोंवऱ्यांत दुःखानें भ्रमण करीत रहावें. परंतु असेंही नसेल कशावरून कीं केवळ अस्थानीं विश्वास ठेवल्यामुळेंच माझी ही अशी अवस्था झाली आणि मीं मनांत वागविलेल्या मनोराज्याचा वाळूवर बांधलेल्या टोलेजंग इमारतीप्रमाणें असा शेवट झाला. तरी इतकें बरें झालें लग्न होण्याच्या आधींच हें सर्व उघडकीस आलें. दिनकराच्या संदिग्ध बोलण्याचा अर्थ आतां मला कळून आला. तसेंच गोपाळराव माझी इतकी निंदा कां करीत असे तेंही माझ्या लक्षांत आलें.

दिनकर--(पुढें होऊन) धनीसाहेब, आपणांस दोन शब्द सांगावयाचे आहेत. आपल्यापेक्षां मला अधिक समजतें किंवा मी आपणांस अक्कल शिकवूं

इच्छितों, अशांतली गोष्ट नाहीं. परंतु ह्या जगाचा मला बराच अनुभव आहे, तेव्हां आपल्या हिताची एखादी गोष्ट आपल्या नजरेस आणल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

मोरेश्वर--दिनकर, तुला काय सांगावयाचें असेल तें सांग. त्याला एवढी प्रस्तावना नको.

दिनकर—हें पहा, ह्या धंद्याचें असें आहे कीं येथें गिऱ्हाइकांच्या आरोग्यापेक्षां आपल्या किफायतीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. केवळ आपल्या फायद्याकडे लक्ष दिलें नाहीं तर धंदा नीट चालणार नाहीं. केव्हां केव्हां चांगलें गिऱ्हाईक असूनही हा रोग आपणांस असाध्य आहे असें ह्मणून आपण त्यास दुसऱ्या डाक्टरांकडे पाठवितां, किंवा गरीब रोग्यांस फुकट औषधें देतां; परंतु असें केल्यानें धंद्याची भरभराट होणार नाहीं.

मोरेश्वर—दिनकर, तूं माझें हित पहातोस ही गोष्ट खरी, परंतु सर्वच गोष्टींत माझ्याच्यानें तुझें ऐकवत नाहीं. अरे जोंपर्यंत श्रीमंत, सुखवस्तु आणि उठल्या बसल्या औषधें घेत सुटणारे लोक आपणांस उदार आश्रय देण्यास एका पायावर तयार आहेत, आपल्या जाहिरातींस भुलून निरनिराळ्या औषधांवर लोकांच्या उड्या पडत आहेत, तोंपर्यंत तरी उगीच गरीब लोकांस नाडण्यांत किंवा खरोखरच आजारी असतील त्यांचें दुखणें दुणावण्यांत काय हांशील आहे? पुनः मजजवळ अशी गोष्ट काढूं नकोस.

दिनकर—आपणच असें ह्मटल्यावर माझा कांहीं इलाज नाहीं. आपला धंदा नांवारूपास येई तोंपर्यंत तरी माझें ह्मणणें ऐकलें असतें तर बरें झालें असतें. आतां परवां शंकररावच ह्मणत होते कीं मोरेश्वराचें दिवाळें निघण्याची लवकरच पाळी येईल.

मोरेश्वर—तो कांहीं तरी ह्मणतो झालें. तुझ्यासारखा मनुष्य मजजवळ आहे तोंपर्यंत माझें दिवाळें निघणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

दिनकर—धनीसाहेब, आपणास जर आणखी फुरसद असेल तर दुसऱ्या एका गोष्टीसंबंधानें दोन शब्द सांगावयाचे होते. दुर्गाबाईचें तें पत्र आपणांस दाखविल्यापासून आपण फार उदास झालेले दिसतां. कामकाजांत आपलें लक्ष नसतें. एखाद्या गोष्टीची इतकी खंती करणें हें आपणांसारख्यांस उचित नाहीं. मी असें बोलतों याबद्दल आपण मला क्षमा करा. आपलें मन उद्विग्न होण्यास

मीच कारण झालों, हा विचार वारंवार मनांत येऊन मी फार दिलगीर होत असतों.

मोरेश्वर--तुला असें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. हें माझेंच दुर्दैव.

दिनकर—आणखी कदाचित् त्या गोष्टींत आपला गैरसमजही झाला असेल. कारण तेंही संभवनीय आहे.

मोरेश्वर--इतका सबळ पुरावा असल्यावर त्या बाबतींत गैरसमज होणें शक्यच नाहीं. झाली गोष्ट ती झाली. या उपर माझ्याजवळ त्या गोष्टीचा उल्लेख कधींही करूं नकोस. तसें केल्यानें माझा संताप व उद्विग्नता हीं दोन्हीही दुणावतात. मी जो नाद एकदां सोडला तो सोडला. तूं मला पुनः दुर्मुखलेला पहाणार नाहींस. मी कांहीं मनाचा इतका दुबळा नाहीं ! आतां कामकाजासंबंधानें तुला दुसरें कांहीं सांगावयाचें असेल तर सांग.

दिनकर—धनीसाहेब, तुह्मी दुःखी असलां ह्मणजे कामकाजासंबंधानें गोष्ट काढण्यास मला धीर होत नाहीं.

मोरेश्वर--दिनकर मी तुला आतांच सांगितलें ना, या बाबतींत दुःख करण्याचें मी अगदीं सोडून दिलें ह्मणून. आतां दुर्गेचा आणि माझा मुळींच संबंध नाहीं असें समज. हा धंदा नांवारूपास कसा आणावयाचा इतकेंच आज मला पहाणें आहे. मागील सर्व गोष्टी मी विसरून गेलों असें समज.

दिनकर—असें करणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे. स्त्रियांच्या नादीं लागून आपला सर्वस्वीं नाश करून घेणारेही हरीचे लाल ह्या जगांत सांपडतात; परंतु आपणांसारख्यांस माळ घालण्यास शेंकडों स्त्रिया मोठ्या उत्सुकतेनें तयार होतील. गोपाळराव ह्मणत होते कीं, मोरेश्वरासारख्या बुळ्याबरोबर लग्न लावण्यास कोणती सुशिक्षित व समंजस स्त्री तयार होईल ? तसेंच एखादें झोंड गळ्यांत पडल्यानें मोरेश्वरानें आपल्यास धन्य मानून घेतलें पाहिजे.

मोरेश्वर—(स्वगत) त्या सापाचें डोकें ठेंचलेंच पाहिजे. माझ्या तडाक्यांतून तो कांहीं सुटत नाहीं.

दिनकर—पण मला तर वाटतें कीं, केवळ मत्सर बुद्धीनें ते असें ह्मणतात. आपली खरी योग्यता त्यांच्या लक्षांतच येणार नाहीं. आपल्या मनांत असेल तर गोपाळरावांच्या हातावर तुरी देऊन प्रत्यक्ष सुलोचनेशींही आपणांस लग्न लावतां येईल.

मोरेश्वर—(स्वगत) आणि तसें झालें तर कांहीं वावगें होणार नाहीं. शेरास सव्वाशेर मिळतोच. गोपाळराव तुला तोंडघशीं पाडल्याशिवाय हा मोरेश्वर कधींही राहणार नाहीं. कर ह्मणावें, खुशाल माझी निंदा कर. तुला त्याचें प्रायश्चित्त लवकरच भोगावें लागेल. ज्यानें माझा गळा कापला त्याचा गळा कापलाच पाहिजे. माझ्या अंगांत पाणी आहे किंवा नाहीं तें लवकरच दिसून येईल. (उघड) बरें, दिनकर मी आतां व्हिजिटला जातों.

(जातो.)

प्रवेश २.

स्थलः—हिमतरावांचें घर.

(हिंमतराव व अंबाबाई.)

अंबाबाई—ऐकलेंत काय ? काय ह्मणे ते गोपाळराव मोच्याचा कीं चांभाराचा धंदा करितात.

हिंमतराव—तूं ही एकेक बातमी कोठून आणतेस ?

अंबा०—कोठून आणतेस काय ? साऱ्या गांवांत त्याची चालली आहे चर्चा. काल डाक्टर मोरेश्वर मला औषध देण्याला आले होते तेही तेंच सांगत होते. आज शास्त्रीबुवांच्याही तोंडीं तीच गोष्ट. मी साफ सांगतें कीं आपली सुलोचना कांहीं त्याला द्यावयाची नाहीं. आपल्याला चांभार जांवई नको.

हिंमत०—तुह्मी त्या मोरेश्वराचें औषध घेतां तें कांहीं बरोबर नाहीं. तो असाच आपला नाकाडोळ्याचा वैद्य आहे झालें. तो कांहीं पास झालेला डाक्टर नाहीं.

अंबा०—पास झालेला असो कीं नसो, त्याच्या हाताला यश आहे. आपल्याला परीक्षेशीं काय करावयाचें आहे ? पुष्कळ मोठमोठ्या परीक्षा पास झालेले डाक्टर असतात आणि त्यांच्या हाताला यश नसतें. त्यांना घेऊन काय रडावयाचें आहे ? परवां त्या नानासाहेबांच्या मुलाला ताप आला होता, तेव्हां पुष्कळ पास झालेले डाक्टर आणि गोरे डाक्टरही आणले होते, पण त्यांचें कांहीं वळलें नाहीं; आणि डाक्टर मोरेश्वरांनीं एका दिवसांत त्याचा ताप काढला. अशीं एक कीं दोन शेंकडों उदाहरणें तो दिनकर सांगत होता. पण तें असो. आपल्या मुलीचें काय ? तिला कोणाच्या गळ्यांत बांधावयाची ?

हिंमत०—त्याचा विचार पुढें पाहूं. सध्यां गोपाळराव—

अंबा०—त्या मोच्याचें पुनः मजजवळ नांव काढूं नका. त्याचें आणि सुलोचनेचें लग्न मी कधींही होऊं देणार नाहीं. गांवांत काय योग्य नवरा मिळत नाहीं, कीं तुमच्या मुलीला नाक डोळे नाहींत ? कीं ती अगदीं काळीविंद्री आहे ? तुह्मी आपला हट्ट सोडाल तर माझ्या मुलीला हजारों लोकांच्या मागण्या येतील. आतां ते डाक्टर मोरेश्वर लग्नाचे झालेले आहेत. त्यांच्या मनांतून अनुरूप नवरी पाहून लग्न उरकून घेण्याचें आहे.

हिंमत०--परंतु तो मनुष्य कसा काय आहे, याची तुला काय माहिती आहे ?

अंबा०--नाहीं, मला कांहींच माहिती नाहीं, आणि मला माणसाची परीक्षाही नाहीं. सगळी माहिती कायती इकडेच भरलेली आहे. ह्मणूनच तर त्या गोपाळरावाचें इतकें प्रस्थ माजवून ठेविलें आहे. मोरेश्वरची आणि आपली ओळख कांहीं आजकालची नाहीं. त्यांची माहिती मला नाहीं असें कसें होईल ? मी सुतानें स्वर्गास जाणारी आहें.

हिंमत०—नुसती बडबड करण्यानें स्वर्ग मिळता तर पुष्कळ लोक स्वर्गास जाते.

अंबा०—होय, मला नुसती बडबडच करतां येते ! मी कोठें सांगतें कीं मला दुसरें कांहीं येतें. मला कांहीं येतही नाहीं व काडीची अक्कलही नाहीं. परंतु माझी मुलगी साफ गोपाळरावाला द्यावयाची नाहीं. एक वेळ मुलीच्या गळ्यांत दगड बांधून तिला विहिरींत लोटलेली पत्करेल, परंतु तिला त्या चांभाराच्या गळ्यांत बांधावयाची नाहीं. लोकांत सर्व छी थू होईल, अब्रूचे धिंडवडे निघतील. त्याचें इकडे कांहीं आहे ? ह्या संसाराच्या गोष्टी. पुरुषांना ह्यांत काय कळतें ? त्यांनीं यांत मन घालूं नये आणि भलताच आग्रह देखील धरूं नये.

हिंमत०—तूं एकदां बोलायला लागलीस ह्मणजे तुझें बोलणें केव्हां संपतें असें होऊन जातें.

अंबा०—माझें बोलणें संपावयाचेंच नाहीं ! तें मारुतीच्या शेंपटासारखें आहे कीं नाहीं ! एकेक बोल तेवढा ऐकून घ्यावा. तरी मी फार बोलत नाहीं ह्मणून. ह्मटलें आपलें कोणी ऐकत नाहीं तर कशाला उगीच बडबड करा. पण मी जसजशी गप रहातें तसतसें घरांत माझें कोणी कांहींच चालूं देत नाहींत. सगळ्या गोष्टींत ह्यांचें तेवढें खरें. मी ह्मणजे अगदीं केरकचरा. आपण मेलें आपलें मनावरच घेऊं नये. ज्या त्या गोष्टींत पड घ्यावी; पण त्याचें इकडे कांहीं आहे काय ?

जगाची रीतच तशी पडली, त्याला तुह्मी तरी काय कराल? बोलत नाहीं त्याला कोणी विचारित नाहीं. ते शास्त्रीबुवाही ह्मणत होते कीं अंबाबाई, तुमचा स्वभाव फारच गरीब. हांसतां काय? तुह्माला सर्व थट्टाच वाटते. हंसण्यावारी घालविलें ह्मणजे झालें.

हिंमत०—राहूं दे ती किटकिट. मला जरा स्वस्थ बसूं दे.

अंबा०—झालें, आतां किटकिट झाली. इकडच्या स्वभावापुढें आपला तर बाई इलाज चालत नाहीं. जरा कांहीं बोलायला लागलें कीं किटकिट होते. तरी मी आतांशा बोलायचें सोडून दिलें आहे, ह्मणून बरें आहे. काय बाई तरी चमत्कार सांगावा! जरा पोरीच्या लग्नाची गोष्ट काढली तर त्यांना अगदीं नकोसें झालें. त्या पोरीला एवढी घोडी करून ठेविली आहे. यंदा तिचें लग्न न झालें तर सर्व लोक तोंडावर थुंकतील, त्याचें इकडे काय आहे? मला तर कोणी तोंड वर काढूं देणार नाहीं. मी साफ सांगतें कीं आपल्या कुळाला साजेल असा नवरा पाहून यंदांच तिचें लग्न उरकून घेतलें पाहिजे. तुमच्यानें होत नसेल तर मी पाहिजे असल्यास मोरेश्वर डाक्टर जवळ गोष्ट काढीन. त्यांना सगळ्याची अनुकूलता आहे. पैसा आहे, घर आहे, लौकिक आहे. पोरीच्या अंगावर चांगले दागिने पडतील व ती चांगल्या घरीं पडेल.

हिंमत०—त्याचा मी विचार करीन.

अंबा०—तुह्मी विचार करितां करितां इतकीं वर्षें झालीं. काय ह्मणे मी त्याचा विचार करीन! तुह्मी विचार करणार आणि मी कोण? मी कांहीं एखादी मोलकरीण असेन नाहीं? दुसऱ्या सर्व गोष्टी असोत, परंतु प्रत्यक्ष माझ्या मुलीच्या लग्नासंबंधानें देखील माझें कांहीं चालूं नये, ह्मणजे मोठाच जुलूम ह्मटला पाहिजे. प्रत्येक गोष्टींत आपलाच हेका चालवायचा हा कोठल्या गांवचा न्याय? आणखी ह्यांत इतका विचार तो काय करावयाचा? डाक्टर आपल्या घरीं नेहमीं येतात जातात. त्यांची काय तुह्मांला माहिती नाहीं? तुह्मी एकदां हो ह्मणा ह्मणजे मी त्यांना विचारतें. (हिंमतराव निघून जातात.) काय मला तसेंच बोलत टाकून ते निघून गेले! मी ह्मणजे कांहीं वेडीच असेन कीं नाहीं? माझ्या बोलण्याची जशी काय किंमतच नाहीं. जा, खुशाल जा. तुमच्यासारखा मलाही विचार करतां येतो. पाहीन त्या गोपाळरावांबरोबर सुलोचनेचें कसें लग्न होतें तें! (जाते.)

प्रवेश ३.

स्थलः—डाक्टर मोरेश्वरचा दवाखाना.

(दिनकर दवाखान्यांत बसला आहे, इतक्यांत सदाशिवराव येतात.)

सदाशिव—डाक्टर मोरेश्वरांचा दवाखाना हाच काय ?

दिनकर—होय, हाच. तुह्माला काय पाहिजे ?

सदाशिव—डाक्टरसाहेब आपणच काय ?

दिनकर—(स्वगत) हा कोणी भाबडा गृहस्थ दिसतो. (उघड) डाक्टर साहेब बाहेर गेले आहेत. त्यांच्या गैरहजिरींत मी त्यांचें काम पहात असतों. डाक्टरसाहेबांच्या औषधांची आणि चूर्णांची मला पूर्ण माहिती आहे. तुह्माला काय होत आहे ?

सदाशिव—डाक्टरसाहेबांची कीर्ति ऐकून सहज त्यांची भेट घ्यावी ह्मणून—

दिनकर—डाक्टरसाहेबांचें नांव आज ज्याच्या त्याच्या तोंडीं आहे तें उगीच नाहीं. त्यांचीं औषधेंच तशीं रामबाण आहेत. त्यांच्या औषधांस आज हिंदुस्थानांतच नाहीं तर जपान, सिलोन, इंग्लंड, अमेरिका येथूनही शेंकडों मागण्या येतात. ह्या गोळ्याच पहा ना, खोकल्यावर अगदीं रामबाण! लोकांच्या त्यावर उड्याच पडतात. कसाही खोकला असला तरी आठ दिवसांच्या आंत हटकून गुण. त्यांच्या गुणाविषयीं हजारों लोकांचीं सर्टिफिकिटें आलेलीं आहेत आणि किंमतही अगदीं बेताची, ह्मणजे दर डबीस दोन रुपये.

सदाशिव—गोळ्या तर चांगल्या दिसतात. परंतु सध्यां मला त्यांची जरूरी नाहीं. मला खोकला झाला नाहीं.

दिनकर—खोकला झाला नसेल तर पडसें होत असेल. तुमची नाडी पाहूं.

सदाशिव—मला पडसेंही होत नाहीं.

दिनकर—आज झालें नसेल तर उद्यां होईल. त्याचा कोणी नेम सांगावा? रोग झाल्यावर औषधासाठीं धांवाधांव करण्यापेक्षां आधींच त्याचा प्रतिकार करण्याची तजवीज केलेली बरी. तहान लागल्यावर विहीर खणण्यास आरंभ करण्यांत शहाणपण नाहीं. आधींच सावध झालेलें बरें. ही गुटिका जर तुह्मी दिवसांतून दोनदां घेत जाल तर यावच्चंद्रदिवाकरौ तुह्माला पडशाखोकल्याची बाधा ह्मणून होणार नाहीं.

दिनकर—स्वारी वस्ताद दिसते. परंतु माझ्यापुढें त्याची वस्तादगिरी किती टिकणार ? हा दिनकर कांहीं कच्च्या गुरूचा चेला नाहीं. डाक्टरांचें लग्न माझ्या मध्यस्थीवांचून होणार आहे थोडेंच! माझें हिताहित कशांत आहे तें पाहून त्याप्रमाणें डाक्टरसाहेबांचे सर्व कांहीं व्यवहार होणार. प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें कांहींही लिहिलें असलें तरी तें पुसून डाक्टराचें सुलोचनेबरोबर मी लग्न लावून टाकणार! हा दिनकर आहे. मी मनांत आणलें कीं ती ब्रह्मगांठ झालीच.

(पडदा पडतो.)

प्रवेश ४.

स्थलः—हिंमतरावांचा दिवाणखाना.

(गोपाळराव बसलेले आहेत.)

गोपाळराव—जिच्या सहवासांत माझें बालपण सुखानें गेलें, जिच्याशीं मी तासांचे तास आनंदांत घालविले आहेत, जिच्या समागमानें आणि साहाय्यानें माझ्या भावी सुखाची इमारत बांधण्याची मीं आशा धरिली आहे, जिच्यावरील माझें प्रेम दिवसेंदिवस वाढतच जात आहे, त्या सुलोचनेस सर्व हकीगत समक्ष कळवून तिचा माझ्यासंबंधानें गैरसमज झाला असल्यास तो दूर करण्याच्या उद्देशानें, व तिच्या बापाचें तिच्या लग्नासंबंधानें काय धोरण आहे तें जाणण्यासाठीं मी मागें ठरविल्याप्रमाणें शंकरबरोबर आज येथें आलों आहें; परंतु तिचा गैरसमज मी दूर करणार तरी कसा ? मी आज तिला काय सांगूं ? मी चामडें कमावण्याचा कारखाना काढला आहे, त्यांत तूं माझी भागीदारीण हो ह्मणून तिला सांगूं कीं, लोक मला चांभार, मोची ह्मणतात, माझा अपमान करितात तर तो अपमान मजबरोबर तूंही सहन करण्यास ये ह्मणून सांगूं ? यदाकदाचित् तिच्याशीं माझें लग्न जुळलें तर सध्यां ती सुखांत आहे, तिला मी दुःखांत मात्र लोटून दिल्यासारखें होईल. मी माझें कर्तव्य करीत आहें अशी मनाची खात्री असल्यामुळें लोकांनीं केलेला तिरस्कार सोसून घेणें मला सोपें जातें. परंतु माझ्याशीं लग्न लावल्यानें सुलोचनेचा जो छळ होईल तो तिनें कसा सहन करावा ? प्रेमाच्या सामर्थ्यानें ? कितीही छळ झाला तरी खरें प्रेम त्यास जुमानणार नाहीं ही गोष्ट खरी आहे; परंतु मी तरी तिला मजबरोबर लग्न लावून छळ सोसण्यास तयार हो ह्मणून

कां सांगावें ? केवळ स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन मी आज येथें आलों काय ? तर मग मी आलों तसाच परत जाऊं ? मला हा अपमान सोसण्यांत एक प्रकारचें भूषण किंवा सुखही वाटतें तसेंच तिलाही वाटत असलें तर ? ज्या श्रेष्ठ कर्तव्यजागृतीनें मी प्रेरित झालों त्यानेंच ती होणार नाहीं कशावरून ? (हिंमतराव व शंकर येतात)

हिंमत०—कसें काय गोपाळराव, तुमचा नवीन कारखाना कसा काय चालला आहे ?

गोपाळ०—आपल्यासारख्यांची सहानुभूति असल्यावर कां चांगला चालणार नाहीं ?

हिंमत०—तुमचे ते स्नेही मोरेश्वर डाक्टरगिरी करताहेत, तो धंदा चांगला.

गोपाळ०—धंदा चांगला आहे, परंतु सर्वचजण डाक्टर झाले तर कसें होईल ? शिकलेल्या लोकांनीं एक एक धंदा हातीं घेतल्याशिवाय आपली सांपत्तिक स्थिति सुधारेल कशी ?

हिंमत०—तें खरें; परंतु लोकांनीं शिष्ट मानलेले असे आणखीही पुष्कळ धंदे आहेत.

गोपाळ०—रावसाहेब, मजपुरताच विचार केला तर शिष्ट मानलेले असे पुष्कळ धंदे आहेत. परंतु सर्वचजण देशहिताच्या व्यापकदृष्टीनें न पहातां स्वतःच्या पुरताच विचार करूं लागले तर आपले उद्योगधंदे ऊर्जितदशेस कसे येतील ?

हिंमत०—तात्विक दृष्ट्या तुमचें ह्मणणें बरोबर आहे, परंतु अशा गोष्टीस हात घातला ह्मणजे तेथें हजारों अडचणी उपस्थित होतात. सुधारकांस सुधारणेच्यां लांब लांब बाता मात्र मारतां येतात परंतु त्यांच्या हातून कृति अशी कांहींच होत नाहीं असें ह्मणून जे हांसतात आणि त्यांची निंदा करितात त्यांना कोणतीही सुधारणा अमलांत आणण्याचा प्रयत्न करणाऱ्याच्या मार्गांत काय काय अडचणी येतात यांची कल्पनाही नसते. जुन्या समजुती एकदम सोडून देणें सोपें नाहीं.

गोपाळ०—ह्मणूनच ह्यासंबंधानें कांहीं तरी प्रयत्न झाला पाहिजे; व असा प्रयत्न करणारांची नाउमेद न करितां आपल्या सारख्यांनीं त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे.

हिंमत०—तुमचा हिरमोड करावा असा माझा उद्देश नाहीं; उलट मला असें वाटतें कीं तुमचा उद्योग नांवाजण्यासारखा आहे.

गोपाळ०—आपल्यासारख्यांनीं अशा उद्योगास आपली सहानुभूति विशेष स्पष्ट रीतीनें दाखविली पाहिजे.

हिंमतराव—गोपाळराव, तुमचा उद्योग असाच चालूं द्या. आपला हेतू उत्तम आहे. अलीकडे उठलासुटला तो सरकारी किंवा सावकारी नोकरींत, नाहीं तर डाक्टरीच्या किंवा वकिलीच्या धंद्यांत शिरण्याच्या उद्योगांत असतो. असें केल्यानें आपल्या देशाचें दारिद्र्य फिटेल असें वाटत नाहीं. आपण आरंभिलेल्या उद्योगांत परमेश्वर आपणांस यश देवो, असें माझें त्यापाशीं मागणें आहे. तुमचें आज आणखी कांहीं विशेष ह्मणणें आहे काय ?

शंकर—गोपाळराव आज एक विशेष हेतु मनांत धरून येथें आले आहेत. सुलोचनेसारख्या सुशिक्षित मुलीशीं आपलें लग्न व्हावें अशी गोपाळरावांची फार दिवसांपासून इच्छा आहे व त्यासंबंधानें आपला विचार काय आहे तें समजून घेण्यासाठीं व आपली संमति मागण्यासाठीं ते आज येथें आले आहेत. गोपाळरावांचा आणि आपला इतक्या वर्षांचा परिचय आहे, तेव्हां ह्या गोष्टीस तुमचा रुकार मिळेल अशी त्यांस आशा आहे.

हिंमतराव—हें पहा गोपाळराव, सुलोचनेच्या लग्नासंबंधी माझा अजून कांहींच निश्चय झालेला नाहीं. शिवाय तिच्या लग्नाची एव्हांच घाई आहे असें मला वाटत नाहीं; परंतु सध्या मी इतकेंच सांगूं शकतों कीं सुलोचनेच्या संमतीशिवाय तिचा कोणाशींही विवाह होणार नाहीं. ह्यापलीकडे माझ्यानें आज कांहींच सांगवत नाहीं.

गोपाळ०—(स्वगत) एवढें जरी झालें तरी ठीक. मला आशा बाळगण्यास हरकत नाहीं. (रामा गडी येतो.)

रामा—मुनूशिपाल्टिचे इनस्पेक्टर आल्याती. ते रावसायबास्नी भाईर बोलावत्याती.

हिंमत०—मी जरा जाऊन येतों.

शंकर०—रामा, सुलोचनेस ह्मणावें कीं गोपाळराव आणि मी येथें आलों आहों तर जरा येऊन जा.

रामा—जी, व्हय. (हिंमतराव व रामा जातात.)

शंकर—गोपाळराव, प्रेमाचा मार्ग अडचणींनीं दुर्गम झालेला असतो असें ह्मणतात त्याचा अनुभव हळूहळू तुह्मांस येत आहे.

गोपाळ०—अशा अडचणींनीं जो नाउमेद होईल त्याच्या हातून कांहींच होणार नाहीं. मार्गांत कितीही अडचणी असल्या तरी त्या दूर करण्यास प्रेमामुळें आपल्या अंगांत शक्ति येते.

शंकर—ही शक्ति येत आहे खरी. (सुलोचना येते.)

गोपाळ०—आज सुलोचनाबाईची फार दिवसांनीं भेट झाली.

सुलोचना—आपण नवीन उद्योगांत गुंग असल्यामुळें जुन्या स्नेह्यांस भेटण्यास फुरसद मिळत नसेल.

गोपाळ०—माझ्या नवीन उद्योगासंबंधानें जुन्या स्नेह्यांस काय वाटत आहे त्याची चौकशी करण्यासाठीं तर मी मुद्दाम आज येथें आलों आहें.

सुलो०—ह्या उद्योगांत शिरण्याच्या आधींच ही चौकशी झाली असती तर बरें नव्हतें का?

गोपाळ०—एकूण मी स्वीकारलेला धंदा आपणांस पसंत नसावा असें दिसतें.

सुलोचना—मला पसंत नाहीं ह्मणून मी ह्मणत नाहीं. मी माझी गोष्ट सांगत नाहीं. लोक काय ह्मणातात याचा विचार करावयाचा. आपणांविषयीं आपल्या हितचिंतकांच्या मनांत असलेल्या उमेदी खचल्या, आपल्या स्नेह्यांच्या आशेची निराशा झाली, सर्व लोक आपली निंदा करीत आहेत, आणि आपले शत्रु तेवढे आनंदानें नाचत आहेत व आपली कुचेष्टा करीत आहेत, आणखी काय व्हावयाचें राहिलें आहे ?

गोपाळ०—सुलोचने, एकदम लौकिक संपादन करून लोकांस चकित व इष्टमित्रांस आनंदित करून सोडण्याचें माझ्या नशिबीं नाहीं, परंतु लोकांकडून बरें ह्मणवून घेण्याच्या उद्योगासच लागलों तर ती गोष्ट मला केवळ असाध्यच आहे, असें नाहीं. आपलें कर्तव्य करून मनोदेवतेस संतुष्ट करण्याच्या ऐवजीं लोकप्रियता संपादन करण्याच्या पाठीस लागलों तर तें काम कांहीं कठिण नाहीं. बाहेरून प्रतिष्ठितपणाचा आव घातला, पैशाची तुंबडी भरण्याच्या उद्योगास लागलों, वेळीं अवेळीं सुधारकांची निंदा करण्याचा उद्योग आरंभिला तर लो-

कांत मान्यता होण्यास उशीर लागणार नाहीं; परंतु असें करणें तुला पसंत पडेल काय? मी आज स्वीकारलेला मार्ग तुला आवडत नाहीं काय?

सुलोचना—माझ्या आवडीसंबंधानें मी बोलतच नाहीं. आपण कोणतीही गैरशिस्त गोष्ट कराल असें माझें मन मला सांगत नाहीं. परंतु आपल्या कृतीपासून सध्यां जो गोंधळ माजून राहिला आहे, तो पाहून व पुढें ह्याचा परिणाम काय होईल त्याची चिंता वाटून माझें हृदय थरथर कांपू लागतें. आजकाल आपलें कर्तव्य करणें इतकें कठिण झालें आहे काय? हें काम तरी आपणच हातीं घेतलें पाहिजे असें कोठें आहे?

गोपाळ०—प्रत्येकजण आपणावरची जबाबदारी अंगाबाहेर टाकूं लागेल तर कसें होईल? मग आपल्या लोकांस चांगले दिवस कसे येतील? लोकनिंदेस भिऊन तूं आपलें पवित्र कर्तव्य–आपला धर्म सोडशील काय?

सुलोचना—मी लोकनिंदेस भीत नाहीं आणि माझ्यानें तुम्हांस कोणत्याही रीतीनें दोष देखील देववत नाहीं. परंतु सध्यां आपली होत असलेली निंदा ऐकून माझें मन उद्विग्न होतें. ह्यामुळें आपल्या मार्गांत नसत्या अडचणी येऊन उभ्या राहतील अशी मला काळजी लागून राहिली आहे. आपली कृति आईस बिलकूल पसंत नाहीं. बरें मुलीनें आईबापांच्या आज्ञेबाहेर तरी कसें जावें? आज त्यांचीच आज्ञा पाळणें हा माझा धर्म आहे.

गोपाळ०—मी तुला आज आईबापांची आज्ञा मोडण्यास सांगत नाहीं. परंतु कित्येक गोष्टी अशा असतात, कित्येक प्रसंग असे येतात कीं, त्या वेळीं आपलें मत निर्भीडपणानें सांगणें व वाजवी असेल तेथपर्यंत आपला हेका न सोडणें हेंच आपलें कर्तव्य असतें. ह्यासंबंधानें विशेष बोलणें सध्यां मला प्रशस्त दिसत नाहीं. रावसाहेब ह्या बाबतींत खंबीरपणानें वागोत हीच आज माझी देवाजवळ प्रार्थना आहे. (हिंमतराव येतात.)

हिंमत०—गोपाळराव, मला कामामुळें परत येण्यास थोडा उशीर झाला व त्यामुळें तुमची बरीच खोटी झाली ह्याबद्दल मी दिलगीर आहें.

गोपाळ०—छे, छे, तसें कांहीं नाहीं. रावसाहेबांचा लोभ असाच सदोदित कायम असला ह्मणजे झालें. आपली माझ्याठायीं सहानुभूति आहे हें पाहून आज मला फार समाधान वाटलें.

शंकर०—अशा नवीन उद्योगास थोर लोकांनीं उत्तेजन दिल्याशिवाय सामान्य जनांची त्या दिशेनें प्रवृत्ति होणार नाहीं व लोकांच्या मनांत इतकीं वर्षें बाणून गेलेला दुराग्रह दूर होणार नाहीं.

हिंमत०—खरें आहे; परंतु अशा कामीं फार उतावळेपणाही उपयोगाचा नाहीं. सर्व कांहीं धीराधीरानेंच घेतलें पाहिजे. होतां होईल तों, जेणेंकरून आपल्या मार्गांत अगदीं कमी अडचणी येतील तो मार्ग स्वीकारणें हें उत्तम.

गोपाळ०—अशा कामीं अडचणी आल्याशिवाय राहणार नाहींत, व त्या आल्या ह्मणजे त्यांस तोंड देण्यासही आपण तयार असलें पाहिजे. संकटें सोसल्याशिवाय, खडतर मार्गांतून गमन केल्याशिवाय, कोणतीही चांगली गोष्ट घडून येत नाहीं.

हिंमत०—परंतु अडचणी जर टाळतां येतील तर त्या टाळण्यांतच शहाणपण आहे. कारणाशिवाय लोकांचें मन दुखविणें बरोबर नाहीं. तुमच्या अंगांत तारुण्याची हुरूप असल्यामुळें लोकमत तुमच्या अगदीं खिसगणतींत नसतें.

शंकर०-परंतु, ही हुरूप अंगांत असल्यामुळें मनुष्याच्या हातून मोठमोठीं कृत्यें घडून येतात. लोकमतास किती मान द्यावा हा तरी एक प्रश्नच आहे.

हिंमत०—तें देखील खरें आहे. तुमची हिंमत पाहून मला फार कौतुक वाटत आहे. गोपाळराव, तुमचा उद्योग असाच नेटानें चालूं द्या. परंतु एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा, ती ही कीं, प्रत्येक गोष्टींत नेमस्तपणा असला पाहिजे.

शंकर०—हें मात्र खरें. (गोपाळरावांस) नेमस्तपणांत देखील नेमस्तपणा ठेविला पाहिजे, नाहीं तर तो फाजील व्हावयाचा. असो. आतां आपणांस दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें आहे. चला. उशीर होईल. (शंकर आणि गोपाळराव जातात.)

प्रवेश ५.

स्थलः—हिंमतरावाचें घर.

(अंबाबाई आणि सुलोचना.)

अंबाबाई—डाक्टर अजून कां बरें येत नाहींत ? त्यांनां बोलवायला पाठवून बराच वेळ झाला.

सुलोचना—डाक्टरांना आज बोलवायला पाठविलें आहे ? कशाला तें ?

अंबाबाई—कशाला बोलावलें? माझ्या डोक्याला. सकाळपासून माझें डोकें दुखत होतें, परंतु कोणी विचारलें तरी आहे कीं, तुला काय होतें नी काय नाहीं ? कोण कशाला विचारील ? कोणाला माझी गरज आहे ?

सुलोचना—आई, असें काय बरें करितेस ? तूं सांगितल्याशिवाय आह्मांला कसें समजावें कीं तुझें डोकें दुखतें ह्मणून ? आतां तुला कसें वाटतें ?

अंबाबाई—आतां बरें वाटतें. डाक्टरांना बोलवायाला पाठविलें आणि डोकें दुखायचें राहिलें.

सुलोचना—तर मग मी पुनः निरोप पाठवितें कीं, आतां येण्याची जरूरी नाहीं.

अंबाबाई—आणि डाक्टर आले ह्मणून काय झालें ? इतका निरोप नको कांहीं पाठवायला. हे आलेच वाटतें. (मोरेश्वर येतो.) या डाक्टर. आज सकाळपासून कीं नाहीं माझें डोकें दुखत होतें, पण आतां राहिलें आहे. आतां कांहीं औषधाची जरूर नाहीं. आमच्या सुलोचनेला बाई तुमची भारी काळजी. तुह्मांला उगीच तसदी पडेल ह्मणून नुकतीच पुनः निरोप पाठवित होती; पण इतक्यांत तुह्मी आलांत.

मोरेश्वर—तसदी कशाची त्यांत ? तुमचा निरोप आला तेव्हां त्या नबाब दिल्लीरखानाच्या बंगल्यावर गेलों होतों. तो आज चार दिवस फार आजारी आहे. तेथून आल्यावर तुमचा निरोप पोंहचला. मला डाक्टर प्रिमरोजकडून पुनः बोलावणें आलें होतें, परंतु तुमचा निरोप ऐकल्याबरोबर मी जरा भ्यालों. मला वाटलें सुलोचनाबाईची तब्येत विघडली कीं काय ? जावेंच आधीं तपास करायला.

अंबाबाई—डाक्टर, तिची कांहीं काळजी करावयाला नको. ती ह्या आजकालच्या पोरींप्रमाणें फार नाजूक नाहीं. आतांच्या मुलींना जरा ऊन लागलें कीं पुरे. त्यांची तब्येत बिघडली. माझ्या सुलोचनेची प्रकृति पहिल्यापासूनच चांगली निकोप आहे.

मोरेश्वर—हल्लींच्या काळीं अशी निकोप प्रकृति असणें हें मोठें भाग्य समजलें पाहिजे. मला कालच विष्णुपंतांनीं बोलाविलें होतें. त्यांच्या मुलीच्या जीवास बरें वाटत नव्हतें. तिची प्रकृति फारच नाजूक. नेहमीं विचारी आजारी असते. गोपाळरावच मजकडे विष्णुपंतांचा निरोप घेऊन आले होते. त्यांच्या

मनांतून तिला मागणें घालण्याचें आहे असें ह्मणतात. तसें असेल तर विष्णुपंत त्यांच्या ह्मणण्यास कबूल होतील असें दिसत नाहीं. कारण विष्णुपंतांस माणसाची पारख आहे. ते केवळ वर वर पाहणारे नाहींत. त्यांत गोपाळरावानें ह्या नाहींत्या धंद्यांत पडून आपली व्यर्थ नाचक्की करून घेतली. जवळ असतील नसतील ते पैसे ह्या धंद्यांत घालवील आणि मग बसेल हांका मारीत.

अंबाबाई—ह्या अलीकडील लोकांना ताळ ना बंद. जें एकदां त्यांच्या डोक्यांत भरेल तेंच खरें. स्वतःची अक्कल नाहीं आणि दुसरा सांगेल तें ऐकावयाचें नाहीं. ते एकदां भडकले ह्मणजे कोणत्या थरावर जातील त्याचा नेम नाहीं.

मोरेश्वर—गोपाळरावचा स्वभाव पहिल्यापासूनच एककल्ली. ह्या स्वभावानेंच तर त्यांची हानि झाली. आतां त्यांनां कोणीही चांगलें ह्मणत नाहीं. मी त्यांना पुष्कळ हिताच्या गोष्टी सांगून पाहिल्या, परंतु उपड्या घागरीवर पाणी.

अंबाबाई—अशा माणसांनां त्यांच्या बऱ्याच्या गोष्टी सांगण्यांत हांशील नाहीं. ते आपला हट्ट कधींही सोडणार नाहींत. मला ह्याचा पुरा अनुभव आहे. असलीं एककल्ली माणसें काय कामाचीं ? लोकांच्या बोलण्याची त्यांनां जशी काय पर्वांच नसते. मला तर त्यांचा स्वभाव अगदींच आवडत नाहीं. (सुलोचना जाऊं लागते.) सुलोचने, कोठें चाललीस ? आतां काय कामाचे गाडे उरकावयाचे आहेत ? थांब जरा.

मोरेश्वर—अंबाबाई, मी रविवर्म्यांचीं नवीन चित्रें आणिलीं आहेत, तीं तुह्मीं अजून पाहिलीं नसतील. एकदा सुलोचनाबाईस घेऊन या. चित्रें फारच सुरेख आहेत.

अंबाबाई—आमच्या सुलोचनेस चित्रांची फारच आवड आहे. मला फुरसद मिळाली ह्मणजे मी तीस घेऊन येईन. काय करावें, कामामुळें फुरसदच मिळत नाहीं. घरांत दुसरें कोणी काम पहावयाला नाहीं. धन्याची देखरेख असल्याशिवाय चाकर माणसांच्या हातून कोठें कामें होतात ? तो सर्व बोजा मजवर पडतो; पण तुमच्या आग्रहासाठीं कशी तरी फुरसद काढून आह्मी एकदा येऊं.

मोरेश्वर—खरें ह्मणाल तर चित्रांचा मलाही फार नाद आहे. मी पुष्कळ चांगल्या चांगल्या चित्रकारांचीं चित्रें गोळा केलीं आहेत. तीं कोठें व कशीं लावावीं ह्यासंबंधानें मला सुलोचनाबाईचा सल्ला घेतला पाहिजे.

सुलोचना—त्यांत मला कांहीं समजत नाहीं. माझी सल्ला तुमच्या उपयोगीं पडणार नाहीं. मला थोडीशी चित्रांची आवड आहे इतकेंच.

मोरेश्वर—असें कां ह्मणतां ? तुह्मी चित्रकलेंत चांगल्या मर्मज्ञ अहां. आपल्या लोकांच्या अंगीं मर्मज्ञता ह्मणतात ती मुळींच नसते. ह्या जगांत रसिकतेसारखी चीज नाहीं. खरें कीं नाहीं सुलोचनाबाई ?

सुलोचना—मला वाटतें कीं सद्वर्तन आणि विवेक हीं रसिकतेपेक्षांही श्रेष्ठ आहेत.

मोरेश्वर—खरें आहे; खरें आहे. तुमचे विचार फारच प्रगल्भ आहेत. चांगलें वर्तन असल्याशिवाय लोकांत प्रतिष्ठा वाढत नाहीं.

सुलोचना—प्रतिष्ठा वाढण्यासाठींच चांगलें वर्तन ठेवावें असें माझें ह्मणणें नाहीं. प्रतिष्ठा वाढविण्याला सद्वर्तनच नको. ढोंगी आणि भोंदू लोकांचीही लोकांत पुष्कळ मानमान्यता असलेली आपण पाहतों. पुष्कळ वेळां सद्गुणी लोक कोनाकोपऱ्यांत पडून असतात, किंवा लोकांची निंदा सहन करीत असतात आणि ढोंगी लोकांचें जिकडे तिकडे स्तोम माजून राहिलेलें दिसून येतें. सद्गुणी लोकांपेक्षां बाहेरून सद्गुणांचा आव घालणाऱ्यांचीच प्रतिष्ठा कदाचित् अधिक होत असेल. (शंकर येतो.)

मोरेश्वर—मला तुमचें भाषण ऐकावेंसेंच वाटतें.

शंकर—काय चाललें आहे डाक्टरसाहेब ? कोणाचें भाषण ऐकावेंसें वाटतें ?

मोरेश्वर—दुसरें कोणाचें नाहीं, सुलोचनाबाईचें.

शंकर—सुलोचनेस काय व्याख्यान देण्यास सांगतां कीं काय ? डाक्टरसाहेब, तुमच्यासारख्यांनीं व्याख्यानें दिलीं तर तें एकवेळ शोभेल. सुलोचना व्याख्यान तें काय देणार ? शिवाय परक्या लोकांसमक्ष फार बोलणें तिला विशेष आवडत नाहीं. ह्यामुळें तुमची इच्छा तृप्त होणें मला कठिण दिसतें.

अंबाबाई—शंकर तूं तरी वेडाच दिसतोस. डाक्टर मोरेश्वर आपणांस परके आहेत काय ? त्यांचा आणि आपला आज इतके दिवसांचा घरोबा आहे. आपणांवर त्यांचा एवढा लोभ ह्मणून निरोप पाठविल्याबरोबर केव्हांही ते धांवत येतात.

शंकर—अंबाकाकू, तूं माझ्या ह्मणण्याचा अर्थ समजली नाहींस. डाक्टर येथें नेहमीं येतात हें मला माहित का नाहीं ? मीं येथें नेहमीं येत असल्या-

मुळें घरांत कोठें किती चिलटें येऊन जातात हें देखील मला सांगतां येईल; मग डाक्टर नेहमीं येतात हें का मला समजूं नये ? परंतु सुलोचनेचा स्वभाव पडला भिडस्त.

अंबाबाई—हें मात्र खरें. तिला फार बोलायलाच नको. तिच्या तोंडांतून कांहीं केल्या शब्द ह्मणून बाहेर पडणार नाहीं.

मोरेश्वर—मर्यादशील स्वभाव तर चांगला.

शंकर—मर्यादशील स्वभावाचा फायदा घेऊन एखाद्याला लघाळपणा करण्यास अवसर मिळतो हा त्यांत मोठा दोष आहे.

मोरेश्वर—निंदकाच्या दृष्टीनें पाहिलें तर प्रत्येक गुण दोष होऊं शकेल.

शंकर—आणि धूर्ताच्या दृष्टीनें पाहिलें तर प्रत्येक सात्विक गुणाचा त्याला फायदा घेतां येईल.

मोरेश्वर—(खिशांतील घड्याळ काढून पाहतो) अरे माझी व्हिजिटला जाण्याची वेळ होऊन गेली. अंबाबाई, येतों बरें मी आतां. मग तुह्मी लवकर याल ना ?

अंबाबाई—होय, एक दोन दिवसांत येऊं. (मोरेश्वर जातो.) सुलोचने, तुझा स्वभाव अगदींच तुसडा. माणसानें मोकळ्या मनानें बोलावें चालावें ह्मणजे बरें. हा असा तुसडा स्वभाव काय कामाचा ? तुझ्या वयाच्या मुलींच्या अंगांत किती हुशारी व चलाखी असते ! बोलून चालून त्या कशा गोड असतात ! मीच तुझ्याएवढी होतें तेव्हां असा तुसडेपणा मला ठाऊक देखील नव्हता. उलट जो तो माझ्या स्वभावाची वाखाणणी करीत असे.

शंकर—अंबाकाकू, सुलोचनेचा स्वभाव तुमच्यासारखा नाहीं. तिचें वळणच निराळें.

अंबाबाई—मला हा असा मिसमिशितपणा आवडत नाहीं. ही पोर जर माझ्या मनाजोगती असती—

शंकर—परंतु ती तशी नाहीं; आणि स्वभावाला कांहीं इलाज नाहीं. तुह्मी तिला कितीही सांगितलें शिकविलें तरी तिचा स्वभाव कांहीं बदलणार नाहीं.

अंबाबाई—स्वभाव बदलो कीं न बदलो, परंतु तिनें माझें ऐकलें पाहिजे इतकें खरें.

शंकर—होय, बापाचें आणि आईचें मुलीनें ऐकलेंच पाहिजे. (अंबाबाई आणि शंकर बोलत बोलत आंत जातात. दुसऱ्या बाजूनें यमुना येते.)

सुलोचना—मला आतां कांहीं सुचेनासें झालें आहे. आई कांहीं केल्या ऐकत नाहीं; व त्या मोरेश्वराचाही माझी पाठ पुरविण्याचा बेत दिसतो. एखाद्या मनुष्याच्या अंगांत इतर चांगले गुण असावेत आणि खरेपणा तेवढा असूं नये ही मोठी खेदाची गोष्ट आहे. दुर्गेबरोबर केलेल्या बेइमानीपणाबद्दल मोरेश्वरांनां कांहींच वाटूं नये हें किती आश्चर्य? दुर्गा आणि मी एके ठिकाणीं बसल्याउठलेल्या, एके ठिकाणीं शिकलेल्या. एकीस चिमटा घेतला तर दुसरीस दुःख जावें इतकें आमचें एकमेकींवर प्रेम? ह्या सर्व गोष्टी त्यांना माहीत असून तिजबरोबर केलेल्या वर्तनाबद्दल मला कांहींच वाटणार नाहीं असें का त्यांनां वाटतें? मोरेश्वर मजबरोबर जो लघळपणा करितात त्याचा मला अगदीं कंटाळा आला आहे.

यमुना—दुर्गेबरोबर केलेल्या हरामखोरीबद्दल त्याचे एकदां चांगले कान उपटा म्हणजे तो पुनः तुमची गोष्ट काढणार नाहीं. चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा म्हणून म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. अशांची अशीच खोड मोडली पाहिजे.

सुलोचना—मला वाटतें मी फाजील मर्यादशील आहें म्हणूनच माझा असा छळ होतो. ह्या बाबतींत बाबांचा मला पाठिंबा आहे म्हणून तरी बरें आहे.

यमुना—कदाचित् त्यांनीं कंटाळून मोरेश्वराच्या म्हणण्यास रुकार दिला तर तुम्ही काय कराल?

सुलोचना—त्याच चिंतेनें रात्रंदिवस मी होरपळत आहें. अशा प्रसंगीं आपण काय करावें तें मला समजत नाहीं. प्रेमाचा ओढा एकीकडे नेत आहे व धर्माची आज्ञा दुसऱ्या बाजूस जाण्यास सांगत आहे अशी स्थिति खरोखर मोठी भयंकर आहे. आयुष्य क्षणिक आहे व संसार असार आहे म्हणून धर्माची आज्ञा पाळून, शाश्वतचें कल्याण करून घ्यावें हा युक्तिवाद भर तारुण्यांत किती लोकांस रुचेल?

यमुना—इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची मला जरूरी दिसत नाहीं. लग्नाच्या बाबतींत तुम्हीं करारीपणा दाखविला पाहिजे. तुम्ही स्वतःचा हेका सोडला नाहीं म्हणजे आपोआप सर्वजण ताळ्यावर येतील.

सुलोचना—मी आईबापांचें देखील ऐकूं नये असेंच कीं नाहीं तुझें म्हणणें?

यमुना—जेथें ऐकावयाचें असेल तेथें ऐकलें पाहिजे. आईबाप भलतेंच कांहीं करावयाला सांगतील तर मग त्यांचें कसें ऐकावें?

सुलोचना—परंतु त्यांचें बोलणें रीतीचें आहे कीं गैरवाजवी आहे ह्याचा निकाल लावण्याचें काम एकदां आपण आपल्या शिरावर घेतलें म्हणजे आई-

बापांचा अधिकार संपुष्टांत आलाच. तारुण्यांत प्रबल असणारे विकार आणि मनाचा कल ह्यांच्या योगानें आपली विचारशक्ति अंधुक होऊन जाते. अशा वेळीं आपले मनोविकार आपणास भलत्याच मार्गी नेण्यास चुकणार नाहींत.

यमुना--इतर अल्लड मुलींची आणि तुमची गोष्ट निराळी आहे. तुह्मी आपल्यापुरताच विचार करा.

सुलोचना--माझी स्थिति इतर मुलींच्या सारखी आहे कीं निराळी आहे हें ठरविणार कोण ?

यमुना--मला तुमच्याबरोबर वाद करितां येत नाहीं; परंतु तुह्मी थोडा उद्दामपणा स्वीकारला पाहिजे इतकें मला समजतें. अलीकडे तुमच्या लग्नाशिवाय मला दुसरें कांहीं सुचत नाहीं. मी तिकडेही पुष्कळ सांगून पाहिलें. मोरेश्वराचें आणि दुर्गेचें लग्न व्हावें असेंच तिकडेही वाटतें; परंतु अशा बाबतींत कोण काय करणार ? तुह्मी थोडा निर्भीडपणा पत्करिल्याशिवाय कांहीं होणार नाहीं असें सर्वांनां वाटतें.

सुलोचना--निदान मोरेश्वराला मी माझें मत स्पष्टपणें कळवीन ह्मणजे याचा माझ्या मागचा त्रास चुकेल; पण मग तो आईजवळून माझी पाठ पुरविण्यास चुकणार नाहीं.

यमुना--तो एक शनीच तुमच्या पाठीस लागला आहे. तुमची ग्रहदशा केव्हां संपेल ती संपो.

(जातात.)

अंक २ समाप्त.

अंक ३.

प्रवेश १.

स्थलः—डाक्टर मोरेश्वरचा दवाखाना.

(मोरेश्वर विचार करीत बसला आहे.)

मोरेश्वर—हिंमतराव कांहीं बऱ्या बोलानें ऐकत नाहीं व सुलोचनेचें मनही अजून त्या गोपाळरावावर आहे. तो पाजी मनुष्य तिच्या मनांतून उतरावा ह्मणून मी किती प्रयत्न केले, परंतु सर्व व्यर्थ! बायकांचा स्वभाव हट्टी. त्यांच्या मनानें एखादी गोष्ट घेतली कीं घेतलीच. मग तेथें ब्रह्मदेवाच्या हातूनही कांहीं होणार नाहीं. परंतु हाच त्यांचा हट्ट व हेकेखोरपणा केव्हां केव्हां आमच्या सारख्यांच्या पथ्यावर पडतो. ही अंबाबाईच पहाना, कसेंही करून ह्या गोष्टींत नवऱ्याचें कांहीं चालूं द्यावयाचें नाहीं, हा तिचा निश्चय; आणि हा निश्चय पार पाडण्यासाठीं नवऱ्याबरोबर कपट करण्यासही ती तयार आहे. कांहीं निमित्त काढून सुलोचनेस एखाद्या परक्या गांवीं न्यावें आणि तेथें आमचा विवाह उरकून टाकावा असें तिच्या मनांत आहे. हा बेत मला ह्मणजे पसंत आहे, अशां-तली गोष्ट नाहीं; परंतु गोपाळरावांसारख्या पाजी मनुष्यास शिक्षा दिलीच पाहिजे, मग कांहींही होवो. हें काम आपणांस शेवटास नेलेंच पाहिजे, अर्ध्यां-तूनच टाकतां येत नाहीं; नाहीं तर दिनकर सांगत होता त्याप्रमाणें अंबाबाई-लाही वाटूं लागेल कीं माझ्या अंगांत कांहींच राम नाहीं. तर मग हा बेत नीट जुळवून आणण्याचें काम माझें मीच केलें पाहिजे. सुलोचनेच्या संमतीविरुद्ध ही गोष्ट कशी घडून येईल ह्याची मला धास्ती वाटते. अरे, परंतु हें आमचें मोठें गिऱ्हाईक आलें. (उघड) या, अण्णासाहेब या. (अण्णासाहेब येतात.) ह्या ईझी चेअरवर बसा. आपली प्रकृति कशी काय आहे?

अण्णासाहेब—डाक्टरसाहेब, अजून आराम वाटत नाहीं. तोंडाला रुचि नाहीं. भूक लागत नाहीं. अन्न जात नाहीं. जीवाला सुख वाटत नाहीं.

मोरेश्वर—तुमचा हात इकडे करा. मला नाडी पाहूं द्या. कालची हकीगत कशी काय होती सांगा पाहूं.

अण्णासाहेब—काल सकाळीं पित्तक्षोभ होऊं नये ह्मणून एक शेर जिलेबी खाल्ली, आणि नंतर घशाला कोरडा पडूं नये ह्मणून एक शेर मसाल्याचें दूध प्यालों.

मोरेश्वर—आपली योजकता वाखाणण्यासारखी आहे.

अण्णासाहेब—त्या दुधांत वेलची असल्याकारणानें शैत्याची भावना होऊं लागली, ह्मणून वर चहा प्यालों.

मोरेश्वर—अण्णासाहेब, आपल्या प्रकृतीस चहा मानवणार नाहीं.

अण्णासाहेब—खरें आहे. ह्मणून मीही औषधासाठीं फक्त एकच पेला चहा घेतला.

मोरेश्वर—बरें पुढें.

अण्णासाहेब—चहामुळें जरा उष्णता भासूं लागली ह्मणून जेवणाबरोबर एक शेर श्रीखंड घेतलें; परंतु श्रीखंड पडलें थंड. तेव्हां त्यापासून बाधा होऊं नये ह्यासाठीं जेवणानंतर थोडया वेळानें एक पेलाभर कॉफी घेतली.

मोरेश्वर—मग तुह्माला भूक मुळींच लागत नाहीं, असें कांहीं ह्मणतां येत नाहीं.

अण्णासाहेब—छे हो, डाक्टर साहेब, भूक कशी ती मुळींच लागत नाहीं. अन्न जातच नाहीं. शरीर नीट चालावें ह्मणून कसें तरी करून दोन घांस खातों इतकेंच.

मोरेश्वर—बरें दुपारीं कॉफी घेतल्यावर पुढें ?

अण्णासाहेब—गरम गरम कॉफी घेतल्यावर थोडा घाम आला तेव्हां उष्णतेचा प्रतिकार करण्यासाठीं वाडगाभर ऊंसाचा रस प्यालों; परंतु तो पडला थंड. तेव्हां त्यावर थोडा आल्याचा पाक घेतला.

मोरेश्वर—आणि त्यामुळें पुनः उष्णतेची बाधा झाली असेल ?

अण्णासाहेब—डाक्टरसाहेब, आपण बरोबर ताडलेंत. उष्णतेची बाधा होऊं लागल्याबरोबर एक कलिंगड खाल्लें. त्यानें पुनः सरदी होईल असें वाटलें ह्मणून एक अननस खाल्लें. त्यानें पोटांत किंचित् आग होऊं लागली, तेव्हां वर पांच सहा केळीं खाल्लीं. रात्रीं नानासाहेबांच्या येथें जेवणास गेलों होतों. त्यांनीं फारच आग्रह केला. परंतु मिताहार करावा असें आपलें सांगणें असल्याकारणानें तेथें फक्त दहाच लाडू खाल्ले. अहो, उगाच अधिक खा आणि प्रकृतीस अपाय करून घ्या इतकें कोणी सांगितलें आहे ?

मोरेश्वर—आपलें ह्मणणें बरोबर आहे.

अण्णासाहेब—आतां तोंडाला रुचि येईल, थोडीशी तरी भूक लागेल असें कांहीं औषध द्या.

मोरेश्वर—कांहीं चिंता नाहीं. मी आज तुह्मांस ह्या गोळ्या देतों. ह्या जेवणानंतर दोन दोन घेत जा. ह्यांच्या योगानें जठराग्नि प्रदीप्त होईल, अन्न पचन होईल व तुह्मांस हुशारी वाटेल.

अण्णासाहेब--तुमच्या हातास यश येवो हीच माझी इच्छा आहे. आणखी एक बरी आठवण झाली. डाक्टरसाहेब, सत्यभामा काल दुर्गेच्या लग्नासंबंधानें बोलत होती. तिनें मला तुमच्याजवळ गोष्ट काढण्यास सांगितलें आहे. तेव्हां पहा, जर मनावर घ्याल तर--

मोरेश्वर--अण्णासाहेब, आपला स्वभाव फारच परोपकारी आणि ममताळू. आपल्या बहिणीची तुह्मी इतकी काळजी घेतां हें पाहून मला फार समाधान होतें.

अण्णासाहेब--परोपकार करण्यास मी फार उत्सुक असतों. कालच सत्यभामेनें मजजवळ गोष्ट काढिली, आणि मी आठवण ठेवून ताबडतोब आज तुह्मांस विनंति केली.

मोरेश्वर--(स्वगत) गृहस्थानें आपल्या बहिणीवर केवढा तरी मोठा उपकार केला हा. (उघड) आपल्यासारख्या थोरांची गोष्टच अशी. अण्णासाहेब सध्यां तुह्मांस विश्रांति पाहिजे. तुह्मी लोकांसाठीं इतके श्रम घेऊं लागलां तर कदाचित् तुमच्या जीवास त्रास होईल.

अण्णासाहेब—खरी गोष्ट डाक्टरसाहेब. सोयरीं असलीं ह्मणजे त्यांच्यासाठीं श्रम घ्यावे लागतात, आणि खस्त खावी लागते. तेथें कोणाचा कांहीं उपाय चालत नाहीं आणि त्यांत मनुष्य स्वभावानें परोपकारी आणि दयाळु असला ह्मणजे तर कांहीं पुसूंच नका. आतां मी स्वतःच्या दुखण्यानें इतका व्यापिलेला परंतु माझ्या बहिणीसाठीं मला श्रम घ्यावे लागले. असें केल्याशिवाय इलाज नाहीं.

मोरेश्वर--पण आपल्या प्रकृतीसही जपलें पाहिजे. माझा इतक्यांतच लग्न करण्याचा विचार नाहीं. आणि सत्यभामाबाईच्या मुलीला नवऱ्यांची कांहीं कमताई पडेल असेंही नाहीं. तर तुह्मी ह्या बाबतींत फारशी दगदग घेऊं नका. कारण तुमची प्रकृति पडली अशक्त.

अण्णासाहेब—खरें ह्मटलेंत, डाक्टरसाहेब. मला देखील अन्न जात नाहीं. बरें मी येतों आतां.

मोरेश्वर—मलाही **नवाब काशीमखाना**कडून बोलावणें आलें आहे, तिकडे गेलें पाहिजे.

(जातात.)

प्रवेश २.

स्थलः—सत्यभामाबाईचें घर.

(तात्यासाहेब आणि सत्यभामाबाई.)

तात्यासाहेब—(स्वगत) मला येथें आधींच येतां आलें असतें तर फार बरें झालें असतें. परंतु घरची गरीबी असल्यामुळें माझा नाइलाज झाला. दुर्गेचे वडील भाऊसाहेब यांचें मजवर सख्या भावाप्रमाणें प्रेम असे. मला त्यांनीं अनेक संकटसमयीं मदत केली व माझ्यासाठीं पुष्कळ झीज सोसली. इतकें असतांही माझ्यानें आजपर्यंत त्यांची इच्छा पार पाडवली नाहीं. मरणाच्या पूर्वीं पत्र लिहून त्यांनीं दुर्गेस माझ्या स्वाधीन केलें व सत्पात्र पाहून तिचें लग्न उरकून घेण्यास सांगितलें; परंतु अजून माझ्या हातून कांहींच घडलें नाहीं. वहिनीची आणि दुर्गेची ही स्थिति पाहून मला किती वाईट वाटतें ! त्यांचें पूर्वींचें ऐश्वर्य ह्याच डोळ्यांनीं पाहिलें होतें. कालगति विचित्र आहे. (उघड) वहिनी, मी येथें फार वर्षें नव्हतों, तेव्हां येथली आणि इकडल्या मंडळीची मला फारशी माहिती नाहीं. माझे मित्र सदाशिवराव ह्यांनां सांगून मोरेश्वरसंबंधानें मी बारीक रीतीनें चौकशी केली. त्यावरून त्याच्या अंगांत कांहीं चांगले गुण आहेत व पुढें तो निवळेल असें मला वाटतें. सदाशिवरावांचें ह्मणणें असेंच आहे कीं, दिनकरमुळें मोरेश्वरसंबंधानें लोकांचा गैरसमज झाला आहे. दुर्गेसाठीं तें स्थल कांहीं वाईट नाहीं.

सत्यभामा—स्थल चांगलें आहे. परंतु सध्यां तिला दिवस आले आहेत वाईट. तिच्या कपाळीं आतां सर्वांकडून झिडकारून घेणेंच आलें आहे. मी अण्णासाहेबांची पायधरणी करून त्यांस दुर्गेसाठीं मध्यस्थी करण्यास सांगितलें होतें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां तुह्मी स्वतः मोरेश्वराला भेटून दोन गोष्टी सांगाल तर कांहीं झालें तर होईल.

तात्यासाहेब—अण्णासाहेबांची मध्यस्थी काय कामाची ? त्या बिचाऱ्यास खाण्यापिण्याशिवाय दुसरें काय सुचणार आहे ? आणि खरें ह्मणशील तर ह्या

गोष्टींत माझ्या किंवा कोणाच्याही रदबदलीचा उपयोग होणार नाहीं. कांहीं होण्यासारखें असेल तर दुर्गेच्या हातूनच होईल.

सत्यभामा—त्या पोरीच्या हातून काय होणार ?

तात्यासाहेब—मी तिलाही अजमावून पाहिलें आहे. मोरेश्वर जरी द्रव्य-लोभानें व महत्वाकांक्षेनें आंधळा झाला आहे, तरी तिचें त्याजवर प्रेम आहे व संधि सांपडल्यास आपण त्यास ताळ्यावर आणूं अशी तिला उमेद आहे.

सत्यभामा—तिच्या उमेदीस घेऊन काय रडावयाचें आहे ? दरिद्र्यांचे मनोरथ आणि मुलींच्या उमेदी यांची सारखीच स्थिति.

तात्यासाहेब—वहिनी, प्रत्येक गोष्टीस वेळ लागत असते. वेळ आली नाहीं तोंपर्यंत आपण केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होतात. परंतु एकदां वेळ आली ह्मणजे क्षुल्लक दिसणाऱ्या उपायांनीं सर्व कांहीं सुसंगत होऊन जातें. सध्यां तूं ईश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ बस, व मीही इतक्यांतच मोरेश्वराला भेटण्याच्या भरीस पडत नाहीं; कारण त्यापासून उपयोग होणार नाहीं हें मला माहीत आहे. देव गरिबांचा कनवाळू आहे. तो तुझे मनोरथ लवकरच पुरे करील.

सत्यभामा—तसें होईल तो सुदिन; परंतु भावोजी, गोरेश्वर सध्यां सुलोचनेच्या पाठीमागें लागले आहेत ह्मणून बोलवा आहे.

तात्यासाहेब—खरें आहे, परंतु सध्यां आपण त्याच्या वाटेस जाऊं नये. सुलोचना त्याच्याशीं लग्न लावण्यास तयार नाहीं आणि हिंमतरावांचें मतही त्यास प्रतिकूल आहे. सुलोचनेचें गोपाळरावाशींच लग्न होईल; आणि तिचें लग्न झालें ह्मणजे ही स्वारी आपोआप पूर्व ठिकाणावर येईल. निदान त्या दिशेनें प्रयत्न करण्यास आपणास मार्ग खुला होईल. आतां सुलोचनेचें लग्न इतक्यांत होईल असा रंग दिसत नाहीं; व मलाही ह्या गोष्टींत घाई करणें आवडत नाहीं. घाई केल्यानें आपल्या मार्गांत अडथळे मात्र अधिक येण्याचा संभव आहे. थोडा धीर धर ह्मणजे सर्व कांहीं मनाजोगें होईल.

(जातात.)

प्रवेश ३.

स्थलः—शंकरचें घर.

(सुलोचना आणि यमुना.)

सुलोचना—भाऊ केव्हां येईल ? त्यानें आज मला इतक्या अगत्यानें कां बरें बोलावणें पाठविलें ?

यमुना—बोलावणें कां पाठविलें तें मला कांहीं माहित नाहीं. ते आपल्या मनांतली गोष्ट कोणास सांगणार आहेत ? तुझांला इतकें अगत्यानें बोलावलें ह्मणून तरी आज आमच्या गरीबाच्या घराला तुमचे पाय लागले. नाहीं तर आह्मी मात्र तुमच्या येथें नेहमीं यावें, परंतु तुह्मी केव्हां आमच्या घराकडे ढुंकून देखील पाहत नाहीं.

सुलोचना—जसें कोणी ह्मणेल खरेंच. पण कायगे यमुने, त्या दिवशीं तूं मोरेश्वरासंबंधानें सांगेन सांगेन ह्मणत होतीस तें काय ?

यमुना—मी कीं नाहीं दुर्गेस भेटण्यास जात होतें. दुर्गा त्या वेळीं घरांत आपल्या खोलींत–ती रस्त्याच्या बाजूला खोली आहे तींत बसून गाणें गात होती. कर्मधर्मसंयोगानें मी घराजवळ येण्याला आणि मोरेश्वराला त्या रस्त्यावरून जाण्याला एकच गांठ पडली. गाणें संपेपर्यंत भिंतीवर लावलेलें सर्कशीचें चित्र पाहण्याचें मिष करून तो तसाच उभा राहिला. तें गाणें ऐकून वन्सें त्याचा चेहरा लालभडक झाला, आणि दांत ओंठ खात तो तेथून चालता झाला.

सुलोचना—असें काय गाणें होतें तें ! तुला येतें का ?

यमुना—गाणें आपलें साधेंच आहे; पण ह्मणताना खाई त्याला खवखवे. त्याला वाटलें तें त्यालाच लागून रचलेलें आहे.

सुलोचना—पण तुला येत असेल तर मला ह्मणून तर दाखविशील ? तुझा गळा चांगला कोकिळेसारखा आहे.

यमुना—कोकिळेसारखा वर्ण असेल पण गळा नाहीं. आणि आज मला जरा सर्दी झाली आहे.

सुलोचना--एक एक सोहळे तुझे. एवढा आग्रह कशाला पाहिजे ? गायचें असेल तर गा कशी.

यमुना—मला जसें येईल तसें ह्मणून दाखवितें

पद.

चाल—(अजि अकुर हा नेतो श्रीकृष्णाला.)

हा कृष्ण पहा मथुराधिपति झाला
धनमोहें मोहुनी गेला ॥ धृ० ॥
जुन्या प्रेमकथा सकलहि तो विसरला
वित्तमदें कृष्ण हा झुकला
सखे त्या चंचल कपट्या जाऊं दे
ऐश्वर्य राज्यसुख भोगूं दे
प्रेमींचें सौख्य भाग्य म्यां अनुभविलें
माझ्या प्रेमाचा मज नलगे मोबदला
जा जा भुलुनि ऐश्वर्याला ॥ १ ॥
भ्रमरासम नूतन सुंदर पुष्पाला
जाई हा शोधायाला
यासाठीं सखे गृह धन सुख म्यां त्याजिलें
आत्मसमर्पणही केलें
कृष्णध्यानें तन्मय मीही झालें
माझेंपण सारें विसरुनि गेलें
प्रेमसागरीं निमज्जन जणुं केलें
परि राज्यमदें खोटा हा भुलला
सौख्यांतुनि केवळ उठला ॥ २ ॥

सुलोचना—गाणें जरी असावें तितकें उदात्त नाहीं तरी बरें आहे. आत्मसमर्पण करण्यांत जें श्रेय आहे तें दुसऱ्या कशांतही नाहीं. यमुने, तूं स्त्रियांच्या हक्कासंबंधानें कांहींही ह्मण, पण आत्मसमर्पणासारखें सुख नाहीं. आत्मसमर्पण करणें हा आर्यस्त्रियांचा सनातन हक्क आहे. आपल्या देशांत बहिण भावासाठीं, पत्नी पतीसाठीं, आई मुलासाठीं आत्मसमर्पण करण्यांत मोठें भूषण मानते. यांतच त्यांना सुख आहे.

यमुना--आणि पुरुषांनां आपलपोटेपणा करण्यांत सुख आहे! पुरुषांनां वाटत असतें कीं त्यांना सुख देण्यासाठींच ब्रह्मदेवानें बायकांनां निर्माण केलें

आहे. बायकांनीं कष्ट सोसून पुरुषांनां सुख देण्यास झटावें व त्यांनीं मात्र बायकांच्या सुखाची कांहीं पर्वा न करितां आपल्या सोईकडेच पहावें असें ते समजतात.

सुलोचना--असें जर कोणी समजत असतील तर ते मोठे दुर्दैवी आहेत असें मी समजेन. ह्या संसारांत दोघांनींही एकमेकांच्या सुखार्थ झटलें पाहिजे. पुरुष जर बायकांच्या सुखासाठीं झटत नसतील तर तें पुरुषांचें दुर्दैव, बायकांचें नव्हे. बायकांनां कष्ट अधिक पडोत, परंतु तेवढ्यानें त्या कमी सुखी आहेत असें समजूं नकोस. जोंपर्यंत आत्मसमर्पण करण्याचा महामंत्र आपण विसरणार नाहीं, दुसऱ्याच्या सुखासाठीं आपल्या सुखावर लाथ मारून घेण्यास आपण मागें घेणार नाहीं तोंपर्यंत आपल्या सुखास ओहटी लागणार नाहीं. जी स्त्री स्वतःच्या सुखासाठीं धडपड करील तिला खरें सुख कधींही मिळणार नाहीं.

यमुना—तर मग स्त्रियांच्या हक्कासाठीं खटपट करणारे लोक काय वेडे आहेत ?

सुलोचना—त्यांचे उद्योग केवळ स्त्रियांच्या कल्याणासाठीं नाहींत, तर एकंदर मनुष्य जातीच्या सामाजिक उन्नतीसाठीं आहेत. त्यापासून स्त्रियांचें हित होईल तसेंच पुरुषांचेंही होईल. त्यांचे विचार अर्धवट रीतीनें घेतल्यानें घरांत कलह मात्र माजेल. यमुने, ह्या स्त्रियांच्या हक्कांनीं तुझ्या भाषणांत प्रवेश केला आहे तसाच तुझ्या आचरणांत प्रवेश केला नाहीं ह्मणूनच तुझें वर्तन तुझ्या बोलण्यापेक्षां अधिक उदात्त व थोर असतें.

यमुना—वन्सें बोलणें सोपें आणि करणें कठिण अशी साधारण लोकांची स्थिति असते. माझी स्थिति ह्याच्या उलट असली तर मी एक अलौकिक स्त्री आहे असेंच ह्मणावें लागेल. (गोपाळराव आणि शंकर येतात.)

शंकर—गोपाळराव, आपणास येण्यास थोडा उशीर झाला. ही सुलोचनाताई माझी वाट पहात आहे. (यमुना आंत जाते.)

गोपाळराव—सुलोचने आज तुझ्या भेटीचा योग आला; हें माझें मोठें भाग्य असें मी समजतों.

सुलोचना—आपला दैवयोग कांहीं चमत्कारिक आहे. त्याला कोणाचा इलाज नाहीं.

गोपाळराव—सुलोचने, माझ्या ह्मणण्यास रुकार देणें तुझ्या स्वाधीनची गोष्ट असतांना तूं दैवास कां दोष देतेस ? तूं कबूल असलीस तर आपल्या लग्नाचा योग जुळवून आणतां येईल. तुझी आई कबूल नसली ह्मणून काय झालें ? हिंमतराव तर तुझ्या इच्छेविरुद्ध जात नाहींत ना ? त्यांच्या मनांत असूनही तूं आपण होऊन मला आणि आपणा स्वतःला दुःखांत लोटण्यास कां तयार होतेस ?

सुलोचना—तुमचें काय ह्मणणें असेल तें बाबांना सांगा. अशा गोष्टी मज-जवळ करणें वाजवी नाहीं. मला उगीच मोहांत घालूं नका.

गोपाळराव—सुलोचने, माझें बोलणें एकदा नीट ऐकून तरी घे. इतक्यां-तच माझा विरस करूं नको. आपलें आजपर्यंतचें एकंदर नातें लक्षांत आण व अंबाबाईच्या हेकेखोरपणाचा परिणाम काय होईल त्याचा विचार कर. आपल्या दृढ प्रेमाचा शेवट असाच होणार काय ? तुझ्यावांचून माझे दिवस सुखांत जातील काय ? तुझ्या विरहानें माझे प्राण दग्ध होत आहेत. सर्व जग मला शून्यवत् भासूं लागलें आहे. तुझ्या प्रेमसागरास पुनः भरती आणून तूं मला सुखविणार नाहींस काय ? मीं आजपर्यंत धीर धरला; परंतु ह्या उचंबळणाऱ्या हृदयांतील भाव बाहेर ओतल्याशिवाय मला आतां चैन पडत नाहीं.

सुलोचना—(शंकरकडे वळून) भाऊ ह्या भेटीचा योग जुळवून आणून तूं मजवर हा प्रसंग आणिलास.

गोपाळराव—सुलोचने, त्यांना दोष देऊं नको. तुझ्या प्रेमास ओहटी लागली आहे इतकेंच मला दिसतें.

सुलोचना—असें भलतेंच बोलून मला कां दुखवितां ? माझें तुह्मांवर किती प्रेम आहे हें तुह्मांस माहीत नाहीं काय ? माझ्या जीवाची आधींच ओढा-ताण होत आहे. कसेंही करा; परंतु भलतीच गोष्ट करण्याविषयीं मला आग्रह करूं नका. माझ्या हृदयांत कितीही गाढ प्रेम वास करीत असलें तरी माझें शील मी सोडणार नाहीं. आईचें मन वळविल्याशिवाय आपलें लग्न होत नाहीं. आणि तिचें मन वळविणें सध्यां कठिण दिसतें. तुह्मीं आणखी कांहीं दिवस धीर धराल तर सर्व कांहीं आपल्या मनासारखें होईल. धीर धरून आपलें काम साधण्याचा यत्न केला पाहिजे.

शंकर—नुसता धीर धरून स्वस्थ राहिल्यानें काय होणार आहे ? तुझी आई, तुझें आणि हिंमतरावांचेंही ह्या बाबतींत कांहीं चालूं देत नाहीं, तें ती बरें करिते काय ?

सुलोचना—तें माझें पाहणें नाहीं. मजवर तुमचा कांहीं लोभ असेल तर ह्या गोष्टींत मला अधिक आग्रह करूं नका.

शंकर—सुलोचने, तुला हट्टी किंवा वेडगळ असें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. माझ्यानें तुला जरी दोष देतां येत नाहीं तथापि तुझें हें वर्तन मला पसंत नाहीं. तुझ्या बऱ्यासाठीं मी प्रयत्न करीत आहें आणि तूं ह्या प्रयत्नांच्या आड येतेस. हिंमतराव तर कबूल आहेतच. तूं कबूल असतीस तर तुझ्या लग्नाचा योग सहज जुळवून आणतां आला असता. आणखी कांहीं दिवस वाट पाहिल्यानें काय होईल तें कोणी सांगावें ?

सुलोचना—जें कांहीं होतें तें आपल्या बऱ्यासाठींच होतें ही माझी पुरी खात्री आहे. सध्यां सर्व गोष्टी आपणास विपरीत भासतात, परंतु त्यांचा परिणाम हितावहच होईल असा मला पूर्ण भरंवसा आहे.

गोपाळराव—तुझी इच्छाच तशी असली तर आणखी थोडे दिवस वाट पाहिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

शंकर—वाट पाहतां पाहतां आपली काय वाट होईल तें कोणी सांगावें ? अशा कामीं दिरंगाई करणें मला बरोबर वाटत नाहीं. कारण, तुझें बलात्कारानें मोरेश्वरबरोबर लग्न लावण्याचा कांहीं बेत घाटत आहे असाही मला संशय येतो. तर उगीच आतां भलताच हट्ट घेऊं नको. आपल्या शत्रूंचे हेतु सफल होण्याच्या आधीं तूं आमचें ह्मणणें कबूल करावेंस हें मला ठीक दिसतें.

सुलोचना—भाऊ कोणाचेही दुष्ट हेतु सफल होणार नाहींत हें तूं पक्कें लक्षांत ठेव. तुझ्या संशयास कल्पनेशिवाय कांहीं आधार नाहीं; परंतु कोणी असें दुष्ट कारस्थान रचिलेंच तर तें रचणाराच्याच गळ्यांत येईल. शेवटीं सत्याचा जय झालाच पाहिजे.

(जातात.)

प्रवेश ४.

स्थलः—डॉक्टर मोरेश्वराचा दवाखाना.

मोरेश्वर—(स्वगत) गोपाळराव, तूं आजपर्यंत माझी निंदा केलीस, माझ्या मार्गांत हजारों विघ्नें आणिलींस, व शेवटीं मर्मी आघात करावयासही चुकला नाहींस; परंतु शेवटीं तुझ्या कृतकर्मांचें फळ–अल्पांशानें कां होईना–भोगण्याची वेळ आतां लौकरच येणार. तूं मला अगदीं बुळा समजतोस काय? माझ्या अंगांत पाणी नाहीं ना? आतां ह्मणावें कोणाच्या अंगांत पाणी आहे तें पाहूं. ही युक्ति तर चांगली मिळाली आहे. अंबाबाईनें सुलोचनेस घेऊन पैठणास जावें व मीही तेथें नेमलेल्या दिवशीं जाऊन लग्नविधि उरकून टाकावा अशी योजना केली आहे. अंबाबाईनें काय करावयाचें व बेत कसा काय तडीस न्यावयाचा ह्यासंबंधाचें हें पत्र आतां अंबाबाईस पोंहचतें केलें पाहिजे. (मोठ्यानें) धोंडया, अरे धोंडया.

धोंड्या--(प्रवेश करून) जी धनीसाहेब, काय हुकूम?

मोरेश्वर--हें पत्र घे. नीट तुझ्या खिशांत ठेव, आणि आतां हिंमतरावाच्या घरीं जाऊन अंबाबाईस दे.

धोंड्या--जी हुकूम.

मोरेश्वर--हें पहा पत्र फार जरूरीचें आहे. तें दुसऱ्या कोणास दाखवूं नकोस किंवा त्याच्यासंबंधानें कोणाजवळ गोष्टही काढूं नकोस. अंबाबाई भेटल्या तर त्यांच्याच हातांत पत्र दे. त्या घरीं नसल्या तर पत्र परत आण. अंबाबाईशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातांत पत्र द्यावयाचें नाहीं, हें नीट लक्ष्यांत असूं दे. कोणी विचारिलें कां आलास तर सहज शोध समाचार विचारण्यास डाक्टरांनीं पाठविलें होतें असें सांग. पत्रासंबंधानें कोणाला कांहीं सांगूं नकोस. असा बावळटासारखा वागूं नको. नीट हुशारीनें काम कर; नाहीं तर अजागळासारखें कांहीं तरी करून येशील. काय आलें का लक्ष्यांत?

धोंड्या--व्हय जी, अक्षी बेमालूम काम करतोया. आज माझी हुशारी तर पघा.

मोरेश्वर—पहातों आतां कसें काय करतोस तें. नीट अंबाबाईच्याच हातांत दे, समजलास? (जाऊं लागतो.)

धोंड्या--(डोकें खाजवीत) पन दास्तरसायब, कागुद त्येंच्या डाव्या हातामंदी द्यायचा का उजव्या?

मोरेश्वर--मूर्खा, कोणत्याही हातांत दिलास तरी चालेल. पण दुसऱ्या कोणाच्या हातीं मात्र लागूं देऊं नको. लक्षांत ठेवः (जातो.)

दिनकर--(प्रवेश करून) कोठें अंबाबाईच्या घरीं-हिंमतरावांच्या घरीं चाललास काय रे?

धोंड्या--व्हय व्हय, हा पळत जातुया. मला काय तुमी अजागळ समजतां व्हय? माझी आज हुशारी तर पघा.

दिनकर--अरे तुझी हुशारी मला आहे माहीत. घे, जातां जातां हें पत्र अण्णासाहेबांच्या येथें नेऊन दे.

धोंड्या--तुमचें पण काम अक्षी बेमालूम करतोया. (पत्र खिशांत घालतो.)

(जातात.)

प्रवेश ५.

स्थलः—अण्णासाहेबांचें घर.

दुर्गा—(स्वगत) मनुष्याच्या हृदयांतील द्रव्यलोभ उपटून टाकून त्याच्या जागीं प्रेमाची स्थापना करितां येईल तर किती चांगलें होईल? प्रेमाच्या अंगीं एक प्रकारचें अजब सामर्थ्य आहे. त्याच्या योगानें एखाद्या दुर्बल स्त्रीच्या हातून देखील मोठमोठीं कार्यें घडून येतात, असें ह्मणतात तें खरें असेल तर माझ्या हातूनही असें एखादें कार्य कां होऊं नये? (पडद्याकडे पाहून) हा कोण बरें आला? धोंड्या वाटतें.

धोंड्या—(प्रवेश करून) दुर्गावैनीबाय, हें इतकें पत्तुर अन्नासायबास्नी द्या. (खिशांतून पत्र काढूं जातो तों दोन्ही पत्रें बाहेर येतात. धोंड्या लगबगीनें एक पत्र आंत लपवितो आणि दुसरें दुर्गाबाईच्या हातांत देतो.)

दुर्गा—(पत्र घेऊन) तें दुसरें पत्र कोणाचें?

धोंड्या—नाय वैनीबाय, तें पत्तुर नाय. मी तेविशीं तुमास्नी कायबी सांगनार नाय. तें तुमचे हातांतबी देनार नाय.

दुर्गा—अरे, मला नको तुझें पत्र. मी सहज विचारलें कोणाचें पत्र ह्मणून.

धोंड्या—वैनीबाय मी असा गचाळ नाय. दास्तरसायब झंगाले पत्तुर अंबाबाईच्या हातांत दे, आन् कोनाजवळ देऊं नको, आन् कोनाला दाऊं बी नको. मी तें तुमास्नी दावनार नाय पघा.

दुर्गा—अरे, नसेल दाखविण्याचें तर नको दाखवूं.

धोंड्या—तुह्मास्नी वाटत असल धोंड्या हाय बावळट. पन आज धनी-सायब झंगाले हुश्यारीनें वाग. तवांपासून मी लई हुश्यार झालोंया. दास्तर-सायब झंगाले लई जरूरीचें पत्तुर हाय. खुद अंबाबाईंचे हातांत दे, नाहीं तर परत आन. मी तेविषीं तुमास्नी एक अक्शर बी बोलनार नाय. मी असा तसा अजागळ नाय.

दुर्गा—(हंसत) तूं तर आज फारच हुशार दिसतोस.

धोंड्या—हुशार झंजी असा तसा नाय. मी पत्तुर नेया नाय जात. सोद समाचार इच्याराया जातो. दास्तरसायब झंगाले कोन इच्यारील तर झन सोध इचाराया आलो या. पत्तुराची ग्वाष्ट नको काडुं. मी ते विषीं एक शबुद बी तुमास्नी बोलनार नाय. मी आज लई लई हुश्यार झालोंया.

दुर्गा—धन्याचें काम असेंच हुशारीनें करावें. हें बघ धोंड्या जरा बाहेर बस. मी ह्या पत्राचें कांहीं उत्तर वगैरे द्यावयाचें आहे कीं काय त्याची विचार-पूस करितें. (धोंड्या बाहेर जातो.) (आत्मगत) ह्या गाढवानें अंबाबाईला द्यावयाचें पत्र मला दिलें. मी हें पत्र फोडूं काय ? एवढें जरूरीचें पत्र, खुद्द अंबाबाईच्याच हातांत द्यावयाचें, दुसऱ्या कोणास दाखवावयाचें नाहीं, कोणास त्यासंबंधानें सांगावयाचें नाहीं, त्याचा मागमूसही कोणाला लागूं द्यावयाचा नाहीं—खरोखरच ह्यांत कांहीं तरी कारस्थान असलें पाहिजे. ही विचार कर-ण्याची वेळ नाहीं. (पत्र फोडून वाचते) वाहवा, कोण हें कपट ! अशा रीतीनें सुलो-चनेला पैठणास नेऊन तिच्याशीं जबरदस्तीनें लग्न लावावयाचें ! छे, हा यांचा व्यूह ढांसळून पाडलाच पाहिजे. ह्या संधीला तात्यासाहेब इकडे आहेत हें बरें आहे. त्यांचा आणि बाबांचा फार स्नेह होता, आणि माझ्यावरही त्यांचा अति-शय लोभ आहे. ते मला मुलीप्रमाणें वागवितात. मुंबईंत त्यांचें येणें जाणें नसल्यामुळें त्यांनां अजून हे ओळखीत नाहींत. त्यांच्या मदतीनें ह्यांचे दांत ह्यांच्याच घशांत घालतें. आधीं हें पत्र माझ्या हातीं आलें हें समजूं देतां कामा नये. मी सुलोचनेस पत्र लिहून तिला कच्ची हकीगत कळवितें, व धोंड्याची व

अंबाबाईची भेट होऊं न देतां त्याच्याजवळ असलेलें पत्र घेऊन येथें पाठविण्यास तिला सांगतें. (कागद व लेखणी घेऊन पत्र खरडते.) बाळू, अरे बाळू.

बाळु—(प्रवेश करून.) जी.

दुर्गा—हें पत्र घे, आणि आधीं धांवत जाऊन तें सुलोचनेस दे. कसा पण पळत जाशील ?

बाळु—हा गेलोंच, वैनीबाय. (जातो.)

दुर्गा—हें एक काम झालें. आतां पुढल्या तजविजीस लागलें पाहिजे.

धोंड्या—(प्रवेश करून) वैनीबाय मास्नी वखत होतो.

दुर्गा—खरेंच धोंड्या, तुला जरूरीच्या कामासाठीं गेलें पाहिजे. परंतु तूं फार दमलेला दिसतोस. अगदीं पळतच आलास वाटतें पत्र घेऊन ?

धोंड्या—वैनीबाय कामाला हा धोंड्या कध्धीं आलस करनार नाय.

दुर्गा—खरेंच तूं मोठा इमानी माणूस आहेस. किती पण धापा टाकीत टाकीत आलास ? पत्र देण्याला थोडा उशीर झाला म्हणून कांहीं हरकत नाहीं; परंतु थोडा दम तर खा. हें पहा आतां असें कर, हे चार पैसे घे, जरा चिलिमबिलिम ओढ, आणि मग जा आपल्या धन्याच्या कामाला.

धोंड्या—वैनीबायचा स्वभाव लई गोड. देव तुमचं भलं करू. (जातो.)

प्रवेश ६.

स्थलः—हिंमतरावाचें घर.

(शंकर बसला आहे आणि सुलोचना पत्र वाचीत आहे.)

सुलोचना—(आपणाशीं वाचते)

"प्रिय मैत्रिण सुलोचना हीस साष्टांग नमस्कार. लिहावयास कारण कीं, तुला पैठणास नेऊन तेथें तुझ्या मर्जीविरुद्ध तुझें लग्न लावण्याचा गुप्त बेत घाटत आहे. धोंड्याच्या चुकीमुळें ह्या कटाची बातमी मला आतांच कळली. तो एक पत्र घेऊन लवकरच तुझ्याकडे येईल व तें पत्र कोणास न दाखवितां तुझ्या आईस देण्याचा प्रयत्न करील. हें पत्र वास्तविक अंबाबाईचें नसून माझ्या मामाचें आहे. मी कारस्थान पालथें पाडण्याच्या उद्योगांत आहें, परंतु मला ह्या कामीं

तुझी मदत पाहिजे. धोंड्याची व तुझ्या आईची भेट होऊं देऊं नको व त्याजवळ असलेलें पत्र युक्तीनें घेऊन मजकडे पाठवून दे. नाहीं तर त्यांचें कारस्थान उघडकीस आल्याचें डाक्टरांस व तुझ्या आईस कळून येईल. पुढील व्यवस्था मी पहातें. विशेष माहिती भेटी अंतीं कळेल.

तुझी प्रिय मैत्रिण,

दुर्गा."

(पत्र वाचून झाल्यावर मोठ्यानें) भाऊ, एका नाजूक कामांत मला तुझी सल्ला पाहिजे. दुर्गा काय ह्मणते त्याचा मला बरोबर उमज पडत नाहीं. तिचा कांहीं तरी गैरसमज झाला असेल. हा गुप्त कट कोणीं केला ? ती मला आईबरोबर कपट करावयास सांगते. तिचें ह्मणणें मला कसेंसेंच वाटतें. हें पत्र वाचून पहा. त्याच्या हातांत देते.

शंकर—(पत्र वाचून) वः, फार चांगलें कारस्थान! तरी मला आधीं-पासूनच संशय येत होता कीं, यांचा असा कांहीं बेत घाटत असावा ह्मणून. ह्याची बातमी आधींच लागली ह्मणून बरें झालें. हा धोंड्या येत आहे वाटतें. ताई, तुला ह्यांत कांहीं समजत नाहीं. तूं आंत जा पाहूं. मी ह्याचा समाचार घेतों.

सुलोचना—कोणत्याही बाबतींत सरळ मार्गानें जावें हें मला बरें दिसतें.

शंकर—तूं कांहीं काळजी करूं नको. मी अगदीं सरळ मार्गानें जाऊन आड मार्गानें जाणाऱ्या सापास पकडतों. तूं आधीं आंत जा कशी ? (सुलोचना जाते व धोंड्या येतो.)

शंकर--कायरे धोंड्या, एवढा दमून कोठून आलास ? तुझ्यावर काम फार पडतें बुवा. तुझ्यासारखा इमानी मनुष्य विरळा.

धोंड्या—आपली गरिबावर लई मेरबानी हाय रावसायब.

शंकर—पण तुझ्या धन्याचा स्वभाव फारच वाईट आणि कंजूष.

धोंड्या—तुमास्नी रावसायब मानसाची पारख लई हाये. धनीसाहेबाचा सभाव लई वंगाळ. अगदीं बोलन्याची सोय नाय.

शंकर--आणि ते रागावतात फार; आणि शिव्याही फार देतात.

धोंड्या--तें काय इच्यारूं नका. परवां त्येंचं मुंडासं चुकून चिखलामंदी पडलं, तर मला गधडा आणि गाढव ह्मंगाले.

शंकर--तुला गाढव ह्मणाले? खरोखर डाक्टरांनां सारासार विचार नाहीं. गाढव किती सहनशील, कष्टाळू, गरीब आणि उपयोगी प्राणी आहे, आणि डाक्टर तुला गाढव ह्मणाले ? त्यांनां अक्कलच नाहीं.

धोंड्या--काल पघा, दवाखान्यांमंदी एक शिरीमंताची आवा आली हती. माझे हातून त्येंच्या डोस्कीवर घासलेट तेल पडलं. तवां दास्तर जे काय रागावले हायती, आणि माझे मुस्कुटांत जी काय एक अश्शी लगावलीन्. (तोंडांत मारून घेतो.)

शंकर--मूर्ख, अगदींच मूर्ख. केंसावर डाक्टरांचीं घाणेरडीं तेलें ओतण्याऐवजीं एक दिवस केरोसिन तेल ओतलें ह्मणून त्यांत नुकसान तें काय झालें? शिवाय तुझ्या मुस्कटांत देणें ह्मणजे विनाकारण हाताला इजा करून घेणें आहे, हें देखील त्यांस समजूं नये, अं? माणसांस कसें वागवावें हें त्यांनां समजतच नाहीं. माणसाची त्यांनां किंमतच नाहीं. तुझ्यासारखा इमानी मनुष्य मिळाला पाहिजे!

धोंड्या--रावसाहेब, धनीसायबापास्नी. भलेपनाला किंमत नाय.

शंकर--खरोखर, तूं किती मेहनत घेतोस आणि श्रम करतोस, पण त्याचें त्यांना काय? हो, बरी आठवण झाली. अरे तें अंबाबाईचें पत्र अजून डाक्टरांनीं पाठविलें नाहीं काय?

धोंड्या—(आश्चर्यानें) तुमास्नी कशी बरं खबर?

शंकर--अरे तें पत्र जरूरीचें होतें, आणि कोणाच्या नकळत खुद्द अंबाबाईच्या हातीं द्यावयाचें होतें.

धोंड्या--तुमास्नी समदं खबर हाय तर मग. (पत्र काढून) हें पघा पत्तुर. अंबाबाई कोठें हायती?

शंकर--अरे हें इतक्या उशीरानें आणलेंस काय? आण, इकडे आण. (पत्र घेतो.) अंबाबाई मघाच बाहेर गेल्या, आणि इतक्यांत परत यावयाच्या नाहींत. त्या आल्या ह्मणजे मी त्यांस देईन.

धोंड्या--पण अक्षी अंबाबाईच्याच हातामंदी द्या बरं का? आन् कुनाजवळ देऊं नका.

शंकर--होय, होय, तें काय सांगायला पाहिजे?

धोंड्या--पण दास्तर बोलत्याती--

शंकर--अरे समजलों. पत्र मजजवळ दिलें असें त्यांनां सांगूं नको ह्मणजे झालें. अंबाबाईनांच दिलें असें डाक्टरांनां सांग. नाहीं तर ते तुला उगीच

शिव्या देतील. करतां, काय अशा वाईट धन्याशीं गांठ पडली ह्मणजे ? तुझ्या-सारख्या इमानी मनुष्याचें पाप. तूं असेंच कर. पत्र अंबाबाईंच्याच हातांत दिलें असें सांग. अंबाबाई आल्या ह्मणजे मी आठवणीनें त्यांच्याच हातांत पत्र देईन बरें.

धोंड्या--बरें आहे रावसायब. (जातो.)

अंक ३ समाप्त.

अंक ४.

प्रवेश १.

स्थलः—डाक्टर मोरेश्वराचा दवाखाना.

(मोरेश्वर आपल्याशींच विचार करीत बसला आहे.)

मोरेश्वर—परमेश्वराच्या घरची योजना किती चमत्कारिक आहे ! दुर्गेच्या ह्यातून असें कृत्य होईल हें कोणाच्या स्वप्नीं तरी होतें ? मला ती केवळ सद्गुणाची आणि एकनिष्ठतेची पुतळी वाटत असे. तिच्या ह्या दुष्कृत्यानें माझ्या मनाला एक प्रकारचा घोर लागला आहे. मी बाहेरून मोठ्या ऐटींत असतों व तिच्या संबंधानें विचार मनांत न येऊं देण्याविषयीं खबरदारी घेतों, परंतु माझे सर्व प्रयत्न व्यर्थ होत आहेत. एका स्त्रीसाठीं—जी माझ्याशीं बेइमानपणानें वागली तिच्यासाठीं मला हें जग नकोसें झालें आहे. बाह्यतः मात्र मी मोठ्या रंगेलपणाचा आव घालीत आहें व एखाद्या नटाप्रमाणें माझें एकंदर वर्तन ठेवीत आहें. दिनकर मला मधून मधून प्रोत्साहन देत नसता तर कदाचित् मी उद्विग्नतेच्या आधीन होऊन गेलों असतों. माझें मन खरोखरच इतकें दुर्बल आहे काय ? हें हृदयदौर्बल्य माझ्यासारख्यास उपयोगाचें नाहीं. ह्याचा त्याग करून माझ्या अंगांत कांहीं तरी कर्तृत्व आहे असें दाखविलें पाहिजे. आतां पुनः ह्या दुर्बल विचारांस मी माझ्या मनांत थारा देणार नाहीं. एखाद्या चंचल मनाच्या स्त्रीसाठीं झुरून मरण्याकरितां मी जन्म घेतला नाहीं. तर आपलें नांव गाजविण्यासाठीं, संपत्ति, लौकिक, व बहुजनसमाजांत मानमान्यता मिळविण्यासाठीं मी जन्म घेतला आहे. त्या अस्थिरबुद्धीच्या व सद्गुणपराङ्मुख स्त्रीच्या मोहजालांतून मी सुटलों हेंच माझें महद्भाग्य असें ह्मटलें पाहिजे. जिला सद्गुणाच्या कवचाचा आश्रय नाहीं ती कुळास कलंक लाविल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. गोपाळराव, सुलोचनेबरोबर लग्न लावून तुझी खोड मोडून माझ्या अंगांत कांहीं पाणी आहे, हें तुझ्या प्रत्ययास आणून देणें हें माझें पहिलें काम. तुझा सूड उगवावयाचा ह्मणजे असाच उगवला पाहिजे. ही गाडी कोणाची बरें आली ? कोणी गिऱ्हाईक आलें असावें. हा शंकर आज येथें कशाला आला ? (शंकर व तात्यासाहेब येतात.) या, शंकरराव या. आज इकडे कोठें रस्ता चुकलां ?

शंकर--डाक्टरसाहेब, तुह्मांला आज एक गिऱ्हाईक घेऊन आलों आहें. (तात्यासाहेबांकडे बोट दाखवून) हे तात्यासाहेब आमच्या अंबाकाकूचे जवळचे नातलग आहेत. बरींच वर्षे झालीं ते मुंबईस आले नव्हते, ह्यामुळें इकडची त्यांनां माहिती नाहीं. आज कांहीं कामानिमित्त ते मुंबईस आले आहेत. येथें चांगले भिषग्वर्य कोण आहेत अशी त्यांनीं काकूंजवळ चौकशी केल्यावरून तुमची आणि त्यांची मुलाखत करून देण्यास काकूंनीं आज मला पाठविलें आहे.

मोरेश्वर—अंबाबाईचा आपला मजवर लोभ आहे झालें. बाकी डाक्टर-गिरीची मला थोडीशी आवड आहे इतकेंच. पण एवढें खरें, एखाद्याच्या हाताला यश हें असतें, तें सर्वांच्याच हाताला नसतें.

शंकर—(स्वगत) काय मोठा धन्वंतरी, नाहीं तर अश्विनीकुमारच लागून राहिला आहे कीं नाहीं. काय ह्मणे एखाद्याच्या हाताला यश असतें. कितीकांनां एवढ्यांतच स्मशानांत पोंहचविलें असेल कोण जाणे.

धोंड्या--(मोठ्या तांतडीनें आंत येऊन) दास्तरसायब, दास्तरसायब, त्या फाकेटी सायबास्नी लई जुलाब व्हतात, आतांच एक थोरला जुलाब झालाया. अगुदर त्येंच्या घरी धांवा.

शंकर--(स्वगत) साहेबाला जुलाब झाले तर हा लेकाचा त्याच्या भंग्याला सांगावयाच्या ऐवजीं डाक्टरांना कशाला सांगायला आला ? साहेबाचा भंगी भेटला नाहीं ह्मणून येथें डाक्टराला बोलवायला आला वाटतें.

मोरेश्वर--(स्वगत) शंकराच्या समक्ष हा गाढव कशाला आला ? (उघड) अरे मी सध्यां कामांत आहें. आणखी एक तासानें येईन ह्मणून साहेबांच्या मनुष्याला सांग; आणि इतक्यांत पुनः कोणीही आलें तरी मला येथें त्रास देण्यास येऊं नको, समजलास काय ?

धोंड्या--व्हय समजलों, समजलों. नबाब बेजार हाये ह्मनून सांगाया नको येऊं हाच कीं नाय तुमचा अरुथ ?

मोरेश्वर--(रागानें) मरो तुझा नबाब. जा निघून. गाढव कोठला ?

शंकर--(स्वगत) नबाब डाक्टरसाहेबांच्या मदतीवांचून मरेल. त्याची इतकी पंचाईत कशाला पाहिजे ?

मोरेश्वर--असा मूर्ख नोकर असला--

शंकर--ह्मणजे धन्याला त्याच्या अकलेचा लाभ मिळत नाहीं.

तात्यासाहेब--डाक्टरसाहेब, रोगी डाक्टराकडे आला ह्मणजे डाक्टरांनीं त्याची एकीकडे तपासणी करावी अशी नवीन रीत आहे, ती आपणास पसंत असेलच.

मोरेश्वर--खरें आहे. आपण आंत कन्सल्टिंग रूममध्यें जाऊन तेथें बोलत बसूं.

तात्या०--जशी आपली मर्जी. (दोघे आंत जातात.)

शंकर--येथपर्यंत तर घाट नीट जुळला. पुढलें काम तात्यासाहेब नीट पार पाडतीलच. ते मोरेश्वराच्या बारशास जेवलेले आहेत. (टेबलावरचें एक वर्तमानपत्र घेऊन वाचीत बसतो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश २.

स्थलः--दवाखान्यांतील कन्सल्टिंग रूम.

(मोरेश्वर आणि तात्यासाहेब.)

मोरेश्वर--तुमची काय हकीगत असेल ती आतां स्वस्थपणें मला सांगा.

तात्या०--डाक्टरसाहेब, खरोखरी पुसाल तर मी औषधासाठीं कांहीं आलों नाहीं. मला एका नाजूक कामासाठीं अंबाबाईनें आपल्याकडे पाठविलें आहे. तें नाजूक काम कोणतें हें आपण ताडलेंच असेल--आपला व सुलोचनेचा भावी संबंध--अंबाबाईचा मी अगदीं जवळचा नातलग आहें, व प्रत्येक गोष्टींत ती माझी सल्ला मसलत विचारते. आतां ही एक घरगुती गोष्ट आहे; परंतु तुह्मांस सांगण्यास हरकत नाहीं व ती तुह्मी कदाचित् जाणतही असाल, कीं हिंमतरावांचा स्वभाव थोडा एककल्ली असल्याकारणानें ते घरांत अंबाबाईचें कांहीं चालूं देत नाहींत.

मोरेश्वर--हिंमतराव अंबाबाईच्या धोरणानें चालते तर फार बरें झालें असतें.

तात्या०--बरोबर ह्मटलेंत. अंबाबाई फार हुशार व व्यवहारनिपुण बायको आहे, परंतु जांवई निवडण्याच्या कामांत देखील हिंमतराव तिचें कांहीं

चालूं देत नाहींत. तेव्हां ह्या कामीं तिनें माझी सल्ला विचारली व मदत मागितली. (खिशांतून एक पत्र काढतो.) ह्यासंबंधानें आधीं तिचा आणि तुमचा कांहीं बेत झाला होता असें दिसतें. हें तुमचें पत्र अंबाबाईनें मजजवळ दिलें आहे. (पत्र डाक्टरच्या हातांत देतो.)

मोरेश्वर--अंबाबाईच्या आग्रहावरून मी ही युक्ति सुचविली होती.

तात्या०--तुमचा एकंदर बेत चांगला आहे; परंतु अशा कामीं आमच्या-सारख्या वृद्ध मनुष्याचा विचार जास्त उपयोगी पडण्यासारखा असतो; कारण तुमच्यासारखी तरुण मंडळी कितीही हुशार असली, शिकलेली असली, तथापि त्यांस व्यवहाराचा अनुभव कमी असतो.

मोरेश्वर--खरें आहे. अनुभवाची गोष्ट निराळी असते.

तात्या०--तुमच्या बेतानें आधीं हिंमतराव आणि अंबाबाई ह्या दोघांत कलह माजेल.

मोरेश्वर--(स्वगत) त्यांच्यांत कलह माजला नव्हता केव्हां ?

तात्या०--आणि दुसरें, आपल्या इच्छेविरुद्ध आपल्या मुलीस पळवून तिच्याशीं विवाह लावला ह्मणून हिंमतराव तुमच्यावर कदाचित् फौजदारी करितील.

मोरेश्वर--पण तात्यासाहेब, मी एकदा त्यांचा जांवई झालों ह्मणजे मग ते मला तुरुंगांत टाकण्यास तयार होतील काय ?

तात्या०--मनुष्य रागाच्या भरांत काय करील आणि काय नाहीं तें सांग-वत नाहीं. ह्यासाठीं अंबाबाईच्या आग्रहावरून आपण असें जोखीम अंगावर घ्यावें हें मला प्रशस्त दिसत नाहीं. ह्या कामीं दुसरी एखादी युक्ति योजिली पाहिजे.

मोरेश्वर--एका अर्थीं तुमचें ह्मणणें मला बरोबर दिसतें. ह्या बाबतींत अंबाबाईनीं तुमची सल्ला विचारली हें फार चांगलें केलें.

तात्या०--आतां मी काढलेली युक्ति अंबाबाईप्रमाणें तुमच्याही पसं-तीस पडली तर आपला कार्यभाग सहज होऊन जाईल.

मोरेश्वर--तात्यासाहेब, आपणांस खरोखरच व्यवहाराचें फार चांगलें ज्ञान आहे. अंबाबाईचा तुमच्यावर विश्वास आहे, तो उगीच नाहीं. तुमची युक्ति चांगलीच असली पाहिजे. ती जाणण्याविषयीं मी फार उत्सुक आहें.

तात्या०—अंबाबाईकडून मला असें कळलें आहे कीं सत्यभामाबाईची मुलगी दुर्गा हिच्याबरोबर तुमच्या लग्नाचें पूर्वी घाटत होतें.

मोरेश्वर--(तोंड वांकडें करून) असें होतें खरें.

तात्या०--आतां माझी युक्ति ऐका. तुह्मीं हिंमतरावांजवळ असा बहाणा करावा, कीं तुमच्या मनांतून सुलोचने बरोबर लग्न लावण्याचें नाहीं. दुर्गेस दिलेलें वचनच पाळण्याचा तुमचा निश्चय आहे. दुर्गेशीं लग्न लावण्यास ह्मणून तुह्मी पैठणास जावें. मी सुलोचनेस घेऊन तेथें येईन, आणि तुमचा व तिचा विवाह लावून देईन. तुह्मी शेवटपर्यंत आपणास दुर्गेबरोबरच लग्न लावावयाचें असा बहाणा कराल व शेवटीं दुर्गेच्या ऐवजीं सुलोचनेशीं आपलें लग्न लागलें असें समजल्यावर तुह्मी मजवर फार रागावाल व नंतर जेमतेम तुमची समजूत करण्यांत येईल.

मोरेश्वर--सत्यभामाबाईच्या मुलीबरोबर लग्नाची गोष्ट काढल्याशिवाय जर आपलें कार्य होत असेल तर पहा.

तात्या०--डाक्टरसाहेब, तो फक्त बहाणा आहे. हिंमतरावांनां फसविण्या-पुरतेंच तें सोंग आणावयाचें. शेवटील परिणामाकडे लक्ष देऊन तुह्मीं भलताच आग्रह धरणार नाहीं अशी मला आशा आहे.

मोरेश्वर--पण ह्यांत तुमच्यावर जोखीम येतें व हिंमतरावांस माझाही संशय आल्यावांचून राहाणार नाहीं.

तात्या०--माझ्यावरच्या जोखमाची तुह्मी कांहीं चिंता करूं नका. मी वयानें पोक्त व जवळचा नातलग असल्याकारणानें हिंमतराव मला वचकतात. आतां तुमच्यावरच्या संशयासंबंधानें मी असा बेत जुळविला आहे कीं, तुमच्या-वर संशय घेण्यास जागा देखील रहाणार नाहीं. माझ्या सांगण्याप्रमाणें तुह्मी करा ह्मणजे झालें.

मोरेश्वर--तुमचा बेत मला सविस्तर रीतीनें कळूं द्या.

तात्या०—आधीं तुह्मी अंबाबाईस पत्र लिहून कळवा कीं, विशेष विचार केल्यावरून दुर्गेस दिलेलें वचन पाळणें तुह्मांस प्रशस्त दिसतें, व ह्यासाठीं सुलो-चनेशीं तुमच्यानें लग्न लावतां येत नाहीं. हें पत्र अंबाबाईकडून मी हिंमतरावास दाखविणार आहें. तर त्यांत असेंही लिहा कीं, सुलोचनेस वर योजण्याच्या

कामीं अंबाबाईनें हिंमतरावाच्या इच्छेविरुद्ध वागावें हें तुह्मांस अगदीं गैरशिस्त दिसतें.

मोरेश्वर—हें पत्र मी कशासाठीं लिहिणार तें अंबाबाईस माहित असेलच. नाहींतर त्या मजवर रागावतील.

तात्या०—छे छे, त्या तर आपल्या कटांत सामील आहेतच, परंतु बाहेरून त्या मोठा रागाचा आविर्भाव आणतील व तुह्मीही आपला निश्चय कायमच आहे असें दाखवाल. हें एका पत्राविषयीं झालें. दुसरें पत्र सत्यभामाबाईस लिहावयाचें. हें पत्र खरोखर सत्यभामाबाईस द्यावयाचें नाहीं. तें मी मजजवळ ठेवीन व प्रसंग पडलाच तर तुमच्या संरक्षणासाठीं त्याचा उपयोग करीन.

मोरेश्वर—ह्या पत्रांत काय लिहावयाचें ?

तात्या०—ह्या पत्रांत गत गोष्टीबद्दल तुह्मी दिलगिरी प्रदर्शित कराल व दुर्गेबरोबर लग्न लावण्याचा आपला मनोदय कळवाल. त्याचप्रमाणें लग्नासाठीं दुर्गेस बरोबर घेऊन पैठणास येण्याची सत्यभामाबाईस विनंति कराल.

मोरेश्वर—(स्वगत) इतकें झाल्यावर मजविषयीं कोणी संशय घेणार नाहीं, ही गोष्ट खरी, परंतु दुर्गेबरोबर लग्न करण्याचा बहाणा करणें मला कसेंसेंच वाटतें. बायको मिळविण्यासाठीं सर्व प्रकारचे लपंडाव करावे लागतात—निदान केले तरी हरकत नाहीं. आजपर्यंत मोठमोठ्या लोकांनीं जो धडा आपणास घालून दिला आहे तो गिरविण्यांत आपलें काय कमी होतें ? तर आपण असेंच करावें. आपला बेत जुळण्यासारखा आहे. (उघड) तुह्मीं सांगितल्याप्रमाणें मी दोन पत्रें लिहून देतों. सत्यभामाबाईंनां पत्र लिहिण्याच्या ऐवजीं अण्णासाहेब ह्मणून तिचे भाऊ आहेत त्यांनांच पत्र लिहितों. तें पत्र तुह्मी आपल्याजवळच ठेवून घ्या.

तात्या०—मात्र तुह्मी आजच्या आज किंवा फारच झालें तर उद्यां पैठणास निघून जा. संशयास जागाच राहूं नये ह्मणून कांहीं दिवस तुह्मीं अंबाबाईबरोबर आपलें वांकडें आहे असें दाखविलें पाहिजे. ह्यासाठीं आपला बेत तडीस जाईपर्यंत अंबाबाईबरोबर कोणत्याही रीतीचा पत्रव्यवहार वगैरे करूं नका. तुह्मांस जें कांहीं सांगणें असेल तें मला कळवित जा. माझा पत्ता मी तुह्मास देतों. तुमचीं सर्व पत्रें माझ्या पत्त्यावरच येऊं द्या.

मोरेश्वर—तुमचें ह्मणणें मला कबूल आहे. मी आधीं तुह्मांस पत्रें लिहून देतों व मग पुढल्या तजविजीस लागतों. (आंत जातो.)

तात्या०—(स्वगत) दुर्गेबरोबर लग्न लावण्याचा विचारच ह्यास इतका नकोसा कां झाला तें समजत नाहीं. ह्याच्या मूळाशीं कांहीं तरी असलें पाहिजे. मला जर हें आधींच कळतें तर ह्या युक्तीची योजना करण्यापूर्वीं मीं ह्याचें कारण शोधून काढण्याचा यत्न केला असता. अजूनही त्याचा शोध लागला तर लावला पाहिजे. कदाचित् त्यांत विशेष कांहीं नसेलही. हीं अलीकडचीं पोरें. कोठें कशीं वाहवत जातील तें सांगतां येत नाहीं. त्यांच्या मनानें जें वेड एकदां घेतलें तें घेतलेंच.

(पडदा पडतो.)

प्रवेश ३.

स्थलः--हिंमतरावांचें घर.

(अंबाबाई व शंकर.)

अंबाबाई—(हातांत असलेलें पत्र वाचून) मी हें काय वाचीत आहें? हें डाक्टरचेंच पत्र, आणि ते असें लिहितात? आतांशा माणसांनीं अगदीं ताळच सोडला. ज्याला आपल्या शब्दाची किंमत नाहीं तो काय मनुष्य?

शंकर—अंबाकाकू काय झालें? असें डाक्टरसाहेब काय लिहितात?

अंबाबाई—(पत्र त्याच्या हातीं देऊन) हें पहा काय ह्मणतात तें. मला अगदीं आयत्या वेळीं तोंडघशीं पाडलें. सांगतो कीं माझ्यानें सुलोचनेशीं लग्न लाववत नाहीं. दुर्गेस दिलेलें वचन मला पाळलें पाहिजे. तसें होतें तर मग कशाला सुलोचनेच्या भोंवतीं इतके दिवस घिरट्या घालीत होता? मग कशाला लग्न लवकर उरकून घेण्यासाठीं माझी पाठ पुरवित होता?

शंकर—अंबाकाकू, आधीं दुर्गेस दिलेलें वचन मोडून सुलोचनेशीं लग्न लावण्यास तयार झाला, आतां तुह्मांस दिलेलें वचन मोडून दुर्गेबरोबर लग्न लावण्याला निघाला. अशा अस्थिर बुद्धीच्या मनुष्याच्या शब्दावर विश्वास ठेवण्यास तुह्मीं तयार झालांत हीच तुमची चूक.

अंबाबाई—एकूण माझ्याच पदरीं मूर्खपणा आला. अशा लोकांबरोबर प्रसंग आला ह्मणजे त्याचा परिणाम असाच व्हावयाचा.

शंकर--मी तुझास पहिल्यापासूनच सांगत होतों, कीं त्याच्या बोलण्यावर जाऊं नका. त्यावेळीं माझें बोलणें तुह्मीं मनावंरच घेतलें नाहीं.

अंबाबाई--तो अशानें थोडाच सुटणार आहे. मी आतां जाऊन त्याला विचारतें कीं, तूं हें काय मांडलें आहेस ? ह्मणावें माझ्याशीं गांठ आहे.

शंकर--अंबाकाकू, तुह्माला वेड तर नाहीं लागलें ? अहो, सुलोचनेला दुसरा वर मिळत नाहीं, की तिला नाक डोळे नाहींत, तर तुह्मीं त्याचे पाय धराण्याला जातां ?

अंबाबाई--पाय धरायला जातें ? त्याचे पाय धरल्यावांचून माझा खेंटर अडला आहे ! त्यानें केलेला अपमान मी निमूटपणें सहन करणार नाहीं. त्याचा चांगला कान धरून उपटल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. माझा एकदा निश्चय झाला तो झाला. जा, जाऊन गाडी जोडावयाला सांग.

शंकर--(स्वगत) ह्या आतां त्याच्या घरीं गेल्याशिवाय रहात नाहींत. मोरेश्वर पूर्वीं ठरल्याप्रमाणें अजून पैठणास गेला नसला तर त्याची आणि ह्यांची भेट होईल आणि कदाचित् आपला बेत उघडकीस येईल. निदान यांना एकट्यांनां त्याच्या घरीं पाठवूं नये. आतां कांहीं तरी युक्ति योजिली पाहिजे. (उघड) अंबाकाकू, सुलोचनेस मोरेश्वराला देऊं नये असें जरी माझें पहिल्यापासून मत आहे तथापि मोरेश्वरानें हा जो तुमचा अपमान केला आहे, तो मला सहन होत नाहीं. चला मीही तुमच्यबरोबर येतों. आपण दोघेंजण जाऊन त्याचा समाचार घेऊं. हा मी जाऊन घोडेवाल्यास गाडी जोडण्यास सांगतों. (जातो.)

प्रवेश ४.

स्थलः--मोरेश्वराच्या दवाखान्यांतील एक खोली.

मोरेश्वर—(स्वगत) अंबाबाई शंकरला घेऊन दवाखान्यांत आली आहे. माझें आणि तिचें भांडण झालें असें लोकांस दाखविण्याचाच तिचा उद्देश असावा. ह्यासाठींच तिनें शंकरला बरोबर आणिलें असावें, ह्मणजे तो ह्या भांडणाची गोष्ट हिंमतरावास जाऊन सांगेल. मी देखील आतां अशा रीतीनें वागतों, कीं सुलोचनेबरोबर लग्न लावण्याचा माझा उद्देश आहे असें कोणासही वाटूं नये.

चला आतां आपण नाटकास आरंभ करावा. (दवाखान्याचा दरवाजा उघडून आंत जातो. अंबाबाई व शंकर तेथें बसलेले आहेत.) कसें काय अंबाबाई ?

अंबाबाई—तुमचें आजचें पत्र पाहून मला फारच विस्मय वाटला. हें पत्र तुमचेंच कीं काय, ह्याबद्दलही आधीं मला संशय आला. तुमच्यासारखा मनुष्य माझ्याशीं असें दगलबाजीचें वर्तन करील व मला फसविण्यास तयार होईल ही गोष्ट कोणास खरीही वाटणार नाहीं. मला आयत्या वेळीं फशीं पाडण्याचा तुमचा बेत आहे हें आधींच कळतें तर मी तुमच्यावर भरंवसाच ठेवला नसता. तुमच्यावर विश्वास ठेवून मला माझ्या माणसांबरोबर विरोध करावयाला लावलें आणि आतां माझ्याशीं हा असा लपंडाव मांडीत आहां ह्याचा अर्थ काय ? मला हा असा मानभावीपणा आणि अशी फसवाफसवी खपावयाची नाहीं. हें मी तुह्मांस बजावून सांगतें. ह्या बाबतींत तुमचें एकंदर वर्तन मला अतिशय निंद्य वाटतें.

मोरेश्वर—(स्वगत) काय पण रागाचा आविर्भाव आणला आहे ! शाबास! कोणाला वाटेल खरेंच ही बाई रागानें अगदीं संतप्त झालेली आहे. (उघड) अंबाबाई, लग्नासंबंधानें माझें वचन आधींच गुंतून गेल्यामुळें नाइलाजानें मला तुमचें ह्मणणें मान्य करवत नाहीं.

अंबाबाई—होय तर, तुह्मांला आपल्या वचनाची मोठीच किंमत वाटते कीं नाहीं ! तसें होतें तर मग माझ्या घरीं कशाला जोडे फाडीत होतां ? माझ्या मुलीच्या मागें मागें इतके दिवस कशाला लागलां होतां ? मला उगीच आशा लावून कां ठेविली होती ?—

मोरे०—अंबाबाई, तुमचा कांहीं गैरसमज झाला असावा. तुह्मीं डाक्टर ह्या नात्यानें मला बोलावित होतां व मी तुमच्या घरीं येत होतों. सुलोचने बरोबर लग्न लावण्याचें माझ्या मनांत कधींच नव्हतें. तुमच्या मनांत तसें कांहीं असलें तर त्याला माझा नाइलाज आहे.

अंबाबाई—हें आपण कोणत्या तोंडानें बोलतां आणि कोणाला बोलतां ? तुह्मी धड शुद्धीवर तरी आहां ? प्रत्यक्ष माझ्याजवळ तुह्मीं काय बोललां तें सर्व इतक्यांत विसरलांत वाटतें ?

शंकर—डाक्टरसाहेब, तुह्मी सुलोचनेशीं विवाह करण्यास तयार नसलां तर दुसरे शेंकडों लोक तिला मागणी घालावयाला आज उत्सुक आहेत. अंबा-

बाईचा गांवांत लौकिकच तसा आहे ! तुमच्यासारखा जांवई त्यांना मिळाला नाहीं ह्याबद्दल त्यांनां वाईट न वाटतां उलट संतोषच होतो; परंतु तुह्मी त्यांचा अपमान केला ह्मणून त्या अपमानाबद्दल जबाब विचारण्यास त्या आज येथें आल्या आहेत.

अंबाबाई--असा अपमान निमूटपणें सोसून घेणारी ही अंबाबाई नाहीं. खूप लक्षांत ठेवा. बऱ्या बोलानें तुह्मी—

शंकर--अंबाबाईची माफी मागा. तुह्मी आतांपर्यंत जें वर्तन केलें त्यावरून अंबाबाई तुह्माला सुलोचना देण्यास तयार होतील हें मुळींच संभवत नाहीं. त्या आपली मुलगी पदरांत घ्या असें तुह्मांस विनविण्यासाठीं आज येथें आल्या आहेत असें तुह्मांस वाटत असेल तर ती तुमची चुक आहे. त्यांच्या सुलोचनेला अनुरूप नवरा मिळत नाहीं असें नाहीं.

मोरेश्वर--माझ्या एकंदर वर्तनानें कोणाचें मन दुखविलें असल्यास अथवा कोणाचा गैरसमज झाला असल्यास मी फार दिलगीर आहें, परंतु सत्यभामा बाईच्या मुलीबरोबर लग्न लावण्याचा माझा निश्चय कायमच आहे. तिची आतां गरिबी असल्यामुळें ह्या स्थितींत तिला अंतर देणें माझ्यासारख्यास शोभणार नाहीं.

अंबाबाई--हा वेदांत तुह्माला आतांच बरा सुचला. आजपर्यंत आपण झोंपेंत बरळत होतां आणि आतां जागे झालां असें दिसतें. आजपर्यंत तुह्मी मजजवळ जें काय बोललां तें शुद्धींत असतांना बोललां नाहीं असें दिसतें.

मोरेश्वर—अंबाबाई तुह्मी माझें एकंदर ह्मणणें काय आहे तें आधीं स्वस्थपणें ऐकून घ्या. माझ्या ह्मणण्याचा पोक्तपणें विचार केला तर त्याची सत्यता तुह्मांस दिसून येईल. सुलोचनेच्या एकंदर स्वभावावरून मी तिच्याशीं लग्न लावणें दोघांसही सुखावह होईल कीं काय, हा प्रश्नच आहे. तुह्मी रागावूं नका. हिंमतरावांच्या मर्जीविरुद्ध सुलोचनेशीं लग्न लावण्यास मी कधींही तयार झालों नसतों. त्यांच्यासारख्या सन्मान्य मनुष्याच्या इच्छेआड येणें माझ्या हातून कधींही झालें नसतें. तुह्मी तर त्यांच्या पत्नीच आहांत. त्यांच्या इच्छेविरुद्ध वागून त्यांचें मन दुखविण्यास तुह्मी कधींही तयार होणार नाहीं हेंही मला माहित आहे. ह्यापुढें हिंमतरावांचा मान राखून त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें तुह्मी चालाल अशी माझी खात्री आहे. स्त्रियांचा धर्म काय—

वर आपल्या बायकोला शिकीव स्त्रियांचा धर्म काय आहे आणि काय नाहीं तो! (स्वगत) मींच आधीं आपला हट्ट पुरा पाडण्याच्या भरीस कां पडावें! आतां झालें तितकें पुरे झालें. ह्यापुढें भलत्या सलत्या नादीं न लागतां तिकडच्या ह्मणण्याप्रमाणेंच वागेन. (उघड) शंकर, आपली गाडी कोठें आहे पहा. येथें रस्त्यांत उभें राहण्यांत कांहीं हांशील नाहीं.

(जातात.)

प्रवेश ५.

स्थलः--हिंमतरावाचें घर.

(अंबाबाई व शंकर.)

शंकर--अंबाकाकू, तुह्मी आतां ही गोष्ट मनावरच घेऊं नका.

अंबाबाई—शंकर, मला अशी शरम झाली आहे कीं तुला काय सांगूं? रागानें आणि लज्जेनें माझें हृदय फाटून जाईल.

शंकर—ते काका आले. त्यांनां दुसऱ्याच्या तोंडून सर्व वृत्तांत समजण्यापेक्षां तुह्मीच सांगाल तर बरें होईल. (हिंमतराव कपडे करून बाहेर जाण्याच्या उद्देशानें येतात.)

अंबाबाई--(शंकररावास) आतां ही गोष्ट तिकडे कोणत्या तोंडानें सांगूं?

शंकर--काकासाहेब, अंबाकाकूंच्या मनांतून आपणांस कांहीं सांगावयाचें आहे.

हिंमतराव--माझी सभेस जाण्याची वेळ झाली. काय असेल तें थोडक्यांत सांग.

अंबाबाई—मी कांहीं तुमची फार वेळ खोटी करीत नाहीं. हें पहा ते डाक्टर मोरेश्वर आहेत कीं नाहीं—शंकर, तूंच सांग ह्यांनां काय आहे तें.

शंकर—डाक्टर मोरश्वर दुर्गेबरोबर लग्न लावण्यासाठीं लवकरच पैठणास जाणार आहेत.

हिंमतराव—दुर्गेला तात्यासाहेब कांहीं हुंडा वगैरे देणार आहेत वाटतें? त्याशिवाय स्वारी लग्नाला तयार होणार नाहीं. परंतु लग्न करायला एवढा पैठणास कशाला जातो? मुंबईस लग्न होत नाहीं कीं काय? बेटा भाग्यवान खरा. त्याशिवाय त्याला दुर्गेसारखी बायको मिळाली नसती.

शंकर—काका, डाक्टरसाहेब मनांत समजत असतील कीं दुर्गेबरोबर लग्न करण्यांत आपण तिच्यावर मोठे उपकारच करीत आहों.

हिंमत०—कोंवळ्याला रत्नाची काय पारख? (अंबाबाईस) मग आतां आपला काय विचार आहे?

अंबाबाई—(ओशाळून) माझा कसला विचार आला आहे? इकडचा जो विचार तो माझा विचार.

हिंमत०—(मनांत) आज पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवला. (उघड) बरें, सध्यां मी जातों. मग आल्यावर पाहूं.

(जातात.)

प्रवेश ५.

स्थल—शंकरचें घर.

(यमुना विचार करीत बसली आहे.)

यमुना—अकरा वाजून गेले. अजून कां बरें येणें होत नाहीं? हीं दोन लग्नें एकदां निर्विघ्नपणें तडीस गेलीं ह्मणजे जीव निर्धास्त होईल. हीं बाहेर कोणाचीं पावलें ऐकूं येतात? स्वारी आली वाटतें. (शंकर बाहेरून दार ठोठावतो.) ह्यांची अशीच मजा केली पाहिजे. (उघड) कोण आहे तें? दार कोण वाजवितें?

शंकर—(बाहेरून) मी.

यमुना—मी? मी कोण? मी नांवाचें कोणी मनुष्य आपल्या बाई ओळखीचें नाहीं. घर चुकलां असाल कदाचित्.

शंकर—मी घर चुकलों नाहीं; तूं तुझें काम चुकतेस. निमूटपणें दार उघडायचें टाकून तीन तेरा गोष्टी सांगत बसूं नको.

यमुना—नांव सांगितल्याशिवाय आपण कांहीं दार उघडणार नाहीं.

शंकर—नाव राहिली समुद्रांत. दार उघड.

यमुना—इतक्या रात्रींच्या प्रहरीं नांव गांव सांगितल्याशिवाय आपण कधीं दार उघडणार नाहीं. (दरवाजाकडे जाते.)

शंकर—माझें नांव शंकर–

यमुना—(दार उघडून हांसत हांसत) महादेव इतक्या रात्रीं कैलास सोडून येथें कोणीकडे आले?

शंकर--(आंत येऊन) पतित जनांचा उद्धार करण्याकरितां रात्रीं अपरात्रीं यावें लागतें.

यमुना—कोणी पतित असेल तिचा जाऊन करावा उद्धार. इकडे दुसऱ्या माणसाची रात्रीं अपरात्रीं झोंपमोड कशाला करावी? इकडे कोणी पतित नाहीं.

शंकर—पतित नसेल तर पावन असेल. युगान्तरीं गंगेस शिरावर धारण करून चित्तास शान्ति न लाधल्यामुळें ह्या कलियुगांत यमुनेस शिरीं धारण करण्याच्या उद्देशानें शंकर पृथ्वीवर अवतरले असतील.

यमुना—(हांसत) महादेवासारखे योगी देखील शान्ति मिळविण्याकरितां स्त्रीला डोकीवर बसवितात ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे; परंतु सध्यां त्यांच्या शिरावर स्थान मिळण्याइतकी यमुनेची पुण्याई नाहीं आणि अपेक्षाही नाहीं. त्यांच्या हृदयांत स्थान मिळालें ह्मणजे तिची मनीषा पूर्ण होईल.

शंकर--तशी खरोखरच डोकीवर बसण्याची तुझी इच्छा नसेल तर तुला हृदयांत स्थान मिळेल.

यमुना-स्थान मिळेल ह्मणजे अजून मिळालें नाहीं, आणि डोकीवर बसण्याची इच्छा असली तर तें मिळणार नाहीं, असेंच कीं नाहीं? माझी डोकीवर बसण्याची इच्छा आपल्या नजरेस केव्हां आली?

शंकर—तूं बोलण्यांत अशी पकडूं लागलीस तर माझ्यानें कांहीं तुला पुरें पडतां येणार नाहीं.

यमुना—आधीं एखाद्याला लावून बोलावें आणि मग--बरें पण तें असो. कैलासाहून धरणीवर आलां तर आतां युगान्तरींच्या गोष्टी टाकून आजकालच्या गोष्टींकडे वळा. आपलें कारस्थान कोठपर्यंत आलें आहे?

शंकर—कशाचें कारस्थान?

यमुना—कशाचें कारस्थान? जणूं काय इकडे अगदीं ठाऊकच नाहीं. तळ्यांत उभें राहून अंग सुकें ह्मणतात, तशांतली स्थिति आहे. तरी आतांशा तात्यासाहेबांचीं आणि इकडचीं नेहमीं खलबतें चाललेलीं असतात ह्मणून बरें.

शंकर—तात्यासाहेबांचा कांहीं राज्य वगैरे घेण्याचा विचार आहे वाटतें ?

यमुना—आपण कोणत्याही गोष्टीचा थांग लागूं देऊं नका. पण मला सर्व कांहीं कळलें आहे. पैठणास दुर्गेचें आणि डाक्टर मोरेश्वराचें लग्न होणार आहे.

शंकर—मग आपला मेजवानीस जाण्याचा बेत आहे वाटतें ? त्यासाठीं एवढ्या कारस्थानाची काय जरूर आहे ?

यमुना—पुन: आपलें तेंच; येरे माझ्या मागल्या. आपण त्या डाक्टरचे दांत पाडावयाचा बेत केला आहे तो मला जसा कांहीं माहीतच नाहीं.

शंकर—खरेंच डाक्टर इतर लोकांचे दांत पाडतात तेव्हां खुद्द त्यांचे दांत पाडायला आह्मांलाच गेलें पाहिजे.

यमुना—आतां थट्टा पुरे करा. मला दुर्गेनें आणि वन्संनीं सगळें कांहीं सांगितलें आहे.

शंकर—तर मग आमचे सर्व बेत बाहेर फुटले ? तरी मी सुलोचनेला बजाविलें होतें कीं ही गोष्ट कोणाला सांगूं नको.

यमुना—पण मला सांगितलें ह्मणून काय झालें ? इकडचा एक माझ्यावर विश्वास नाहीं ह्मणून सर्वांनींच मजवर विश्वास ठेवूं नये वाटतें ?

शंकर—ही विश्वासाची गोष्ट नाहीं. बायकांच्या कानांवर एखादी गोष्ट गेली ह्मणजे ती गुप्त रहात नाहीं. त्यांत एखादी गोष्ट गुप्त आहे असें सांगून त्यांनां कळविली तर ती लवकरच चोंहोंकडे झाल्याशिवाय रहात नाहीं. तारायंत्रें आणि छापखाने निघाले नव्हते, तेव्हां तारायंत्रांचें आणि वर्तमानपत्रांचेंही काम बायका आपल्या तोंडानें करून टाकीत आणि बातम्यांचा जिकडे तिकडे प्रसार करीत.

यमुना—एवढें कांहीं हिणवायला नको. सर्वांच्या आधीं माझें आणि दुर्गेचें ह्यासंबंधानें बोलणें झालें होतें; आणि तिला ह्या कामीं मदत करण्याचें मी कबूलही केलें होतें.

शंकर—अस्सें अस्सें. तर मग आपण आजपर्यंत ह्या कारस्थानासंबंधानें कोणती कामगिरी उरकली आणि काय काय मदत केली ती तर मला समजूं द्या !

यमुना--मदत ह्मणजे अशी तशी नाहीं, चांगलीच मदत केली आहे. ह्या कटांत सामील होण्यासाठीं इकडचें मन वळविलें ही काय लहान सहान कामगिरी वाटते?

शंकर--ही गोष्ट मात्र खरी. एकूण आपलें ह्मणणें असेंच कीं आतांपर्यंत राणीसाहेबांनीं मला एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचविलें. माझें मन तूं वळविल्याचें मला तर आठवत नाहीं.

यमुना--कशाला आठवेल? आजपर्यंत सुलोचनेची आणि विशेषेंकरून दुर्गेची स्थिति आपल्या कानावर घालीत गेलें, ह्मणूनच कीं नाहीं त्यांच्यासाठीं आपलें अंतःकरण इतकें हळहळूं लागलें; आणि इतकें सगळें करून मला बक्षिस काय, तर बायकांच्या कानांवर एकादी गोष्ट गेली कीं ती गुप्त रहात नाहीं, हा महामंत्र!

शंकर--बरें, आतां तुझें पुढें ह्मणणें काय?

यमुना--ह्मणणें इतकेंच कीं दुर्गेच्या लग्नासाठीं आपण पैठणास जावें. दुर्गेनें मला फारच आग्रह केला आहे.

शंकर--इकडे सुलोचनेचें लग्न आहे त्याची वाट काय? तें तर आपल्या घरचें कार्य.

यमुना--तें कसें तरी होईल; परंतु दुर्गेचें लग्न एकदां निर्विघ्नपणें पार पडलें पाहिजे; कारण जर का डाक्टर मोरेश्वरला आधींच या कटाचा कांहीं सुगावा लागला तर सर्व बेत फसेल; ह्मणून तात्यासाहेबांस मदत करण्यास आपणही तेथें असलों तर चांगलें; आणि मला वाटतें कीं वन्संचें आणि गोपाळरावांचें लग्नही पैठणासच करावें. दोन्ही नवऱ्यांचीं घरें जवळ जवळ असलीं ह्मणजे बेत निर्विघ्नपणें पार पाडण्यास सोपें जाईल.

शंकर--पण हिंमतराव तेथें येण्याला कबूल होणार नाहींत. त्यांनां आपला बेत माहित नाहीं. तेव्हां तेथें येण्यासंबंधानें त्याचें मन वळविणें कठिण जाईल.

यमुना--ती गोष्ट इतकी अवघड नाहीं. गोपाळरावांचें आधीं मन वळवावें, व त्यांच्याकडून मामंजीस पैठणास जाण्याचा आग्रह होऊं द्यावा ह्मणजे सर्व कांहीं आपल्या मनासारखें जुळून येईल.

शंकर--तूं युक्ति तर चांगली काढलीस. अफाट वाळवंटांत एखादा सोन्याचा कण सांपडावा त्याप्रमाणें केव्हां केव्हां बायकांच्या बोलण्यांतही थोडासा घेण्यासारखा भाग सांपडतो.

यमुना—बायकांची अकल घ्यावी आणि आपल्या शहाणपणाचा टेंभा मिरवावा ही पुरुषांची चालच आहे.

शंकर—बायकांची अक्कल घेण्याला सगळेजण उत्सुक असतात, परंतु ती मिळेल तेव्हां ना? ती पडली दुर्मिळ वस्तु.

यमुना—तेंही खरेंच. बायकांनां स्वयंपाकघराच्या बाहेर फिरकूं देऊं नये आणि त्यांच्याजवळ अक्कल मागायला जावें. मग त्या ती कोठून आणतील?

(जातात.)

प्रवेश ६.

स्थल—अण्णासाहेबांचें घर.

(अण्णासाहेब, सत्यभामाबाई आणि दुर्गा.)

अण्णासाहेब—हें डाक्टरसाहेबांचें पत्र आलें आहे. तूं सांगितल्याप्रमाणें दुर्गेसंबंधानें मी त्यांस विनंति केली होती. त्यांनीं आधीं पुष्कळ आढेवेढे घेतले; परंतु माझ्या आग्रहामुळें आतां स्वारी कबूल झाली आहे. ते पत्रांत ह्मणतात कीं "तुमच्या विनंतीस मान देऊन मी तुमच्या भाचीबरोबर लग्न लावण्याचें कबूल केलें आहे. मी दुर्गेसाठीं केलेले श्रम सफल झाले हें पाहून मला फार समाधान वाटतें. आतां दुर्गा येथून गेल्यानें माझी थोडी गैरसोय होईल. तुह्मी येथें आल्यापासून तिची स्वयंपाक्यावर देखरेख असल्यामुळें मला वेळच्या वेळीं दोन घांस मिळत असत, व माझ्या पथ्यापाण्याची सोय होत असे; परंतु आतां तिच्या हिताकडे लक्ष देऊन माझें मी कसें तरी चालवून घेईन.

सत्यभामा—दुर्गेचें पुढें कसें काय होईल ह्याची मला अहोरात्र चिंता लागून राहिली होती. डाक्टर मोरेश्वर एकदां कबूल झाले हें फार चांगलें झालें.

अण्णासाहेब—डाक्टरांनां माझी भीडच पडली तेव्हां नाइलाज होऊन ते कबूल झाले.

सत्यभामा—आतां तिचें लग्न एकदांचें निर्विघ्नपणें पार पडो ह्मणजे झालें. मग माझ्या पाठीमागील एक घोर नाहींसा होईल.

अण्णासाहेब—सर्व कांहीं यथास्थित होईल. तूं काळजी करूं नको. दुर्गेसाठीं मी मोठया आनंदानें शब्द खर्च केला व आज त्याचें चीज झालें. प्रकृति

नादुरुस्त असल्याकारणानें मला स्वतःला जरी कांहीं सुखाचा लाभ घडत नाहीं तरी दुसऱ्यांस सुखी करण्यांत मी संतोष मानून घेतों.

दुर्गा—मामा, तुह्मी जर आणखी थोडे श्रम घ्याल तर बरें होईल.

अण्णासाहेब—घेईन बरें दुर्गे. तुझ्यासाठीं मी श्रम घेईन. माझ्यानें लग्नाला जरी पैठणास येतां येणार नाहीं तरी मी येथेंच तुझ्या लग्नाचे लाडू खाईन. तुझ्यासाठीं तेवढी तसदी मला घेतलीच पाहिजे.

दुर्गा—माझें ह्मणणें असें कीं तुह्मी दररोज जर सहल करण्यास जात जाल तर तुमची प्रकृति सुधारेल. तुमच्या सारख्यांस औषधापेक्षां व्यायामापासूनच लवकर गुण येईल. आपणाला मानवेल तितका व्यायाम दररोज करीत गेलें तर प्रकृति निकोप राहून डाक्टरांचें बिल फारसें मोठें होणार नाहीं. आपले एकंदर अवयव हलके, चपळ व आज्ञांकित होण्यास व्यायामासारखें साधन नाहीं. गरीब लोकांनां पोटासाठीं श्रम करावे लागतात व ते श्रम करतां करतांच त्यांनां व्यायाम घडतो; परंतु श्रीमंतांनां शरीर चांगलें राहण्यासाठीं नियमानें व्यायाम केला पाहिजे. सध्यां तुह्मी दररोज उघड्या हवेवर फिरावयाला जाल तर तुह्मांला आराम वाटेल. शहरांत कोंडमारा झालेल्या लोकांनां अशा ठिकाणीं घटकाभर निसर्गाची शोभा पाहून आनंद वाटतो आणि स्वच्छ हवेचाही त्यांनां लाभ मिळतो.

अण्णासाहेब—मग दररोज मी बाहेर जातों तर खरा. दोन दिवस घोडेवाला आजारी असल्यामुळें नाइलाज होऊन मला जातां आलें नाहीं. हे नोकर गुलामाचे भलत्याच वेळीं आजारी पडून धन्याची गैरसोय करितात. तें असो. डाक्टर पैठणास आधींच निघून गेले. तुह्मी केव्हां निघणार तर मग?

सत्यभामा—रविवारचा दिवस चांगला आहे. बहुधा रविवारींच निघूं.

अण्णासाहेब—घोडेवाल्याच्या जिवास बरें वाटलें तर स्टेशनावर जाण्याला माझी गाडी मी मोठ्या खुषीनें देईन. माझ्या दुर्गेसाठीं मी पाहिजे तें करीन. कांहीं काळजी करूं नको. दुर्गे जरा घशाला कोरड पडली. त्या चिंतूला ह्मणावें थोडें दूध घेऊन ये. फार नको, शेर दोन शेर पुरे बरें का ? (दुर्गा जाते.)

(पडदा पडतो.)

अंक ४ समाप्त.

अंक ५.

प्रवेश १.

स्थल:—पैठण येथील हिंमतरावाचें घर.

(सुलोचना आणि यमुना.)

यमुना—तात्यासाहेब नुकतेच मोरेश्वराचे घरीं गेले आहेत. आपल्या कारस्थानासंबंधानें त्यांच्या मनांत कांहीं संशय आला असला तर कांहीं थापाथापी करून तो दूर करितील.

सुलोचना—तूं आपलें कारस्थान ह्मणतेस परंतु त्यांत माझें कांहींही अंग नाहीं, व मला तें पसंतही नाहीं. ह्याचा परिणाम काय होईल तो होवो. ह्या लग्नासाठीं किती तरी यातायात करावी लागत आहे.

यमुना--थोडया श्रमानें प्राप्त होणाऱ्या गोष्टीची आपणांस किंमत नसते. एखादी वस्तु मोठ्या श्रमानें मिळाली ह्मणजे तिचें महत्व कळून येतें; आणि यातायात केल्याशिवाय कोणतीही चांगली गोष्ट घडून येत नाहीं. इतकीं कारस्थानें केलीं ह्मणून तर हें लग्न होण्याच्या बेतांत आलें.

सुलोचना—केव्हां केव्हां आपलीं कारस्थानें जागच्या जागींच राहतात व देवाच्या मनांत जें असेल तें तो निराळ्याच मार्गानें घडवून आणतो. ईश्वराची योजना आपल्या कल्पनेच्याही पलीकडे आहे. कधीं आपल्या ध्यानींमनींही नसतात अशा उपायांनीं त्याला इष्ट असेल ती घडामोड घडून येते. ह्यासाठीं आपल्या कर्तृत्वाचा कोणीही अभिमान वाळगूं नये किंवा वस्तु प्राप्त करून घेण्यासाठीं अयोग्य उपाय योजूं नये.

यमुना--आपण कोणाचें वाईट चिंतूं नये ही गोष्ट खरी. परंतु चांगली गोष्ट घडवून आणण्याला पुष्कळदां आड मार्गानें जावें लागतें.

सुलोचना--आड मार्गानें जावें लागतें असें ह्मणण्यापेक्षां अज्ञानानें किंवा आपणांस धीर निघत नाहीं ह्मणून आपण आड मार्गानें जातों असें ह्मटलें तर शोभेल. धर्माचा मार्ग अरुंद असला तरी सरळ आहे. ह्या मार्गानें जाणें प्रथम अवघड परंतु परिणामीं हितावह आहे. तुमच्या आडमार्गानें होणाऱ्या खटा-

टोपी मला आवडत नाहींत. हीं लग्नें घडवून आणण्यासाठीं आजपर्यंत किती तरी लबाड्या करण्यांत आल्या.

यमुना—ह्या लबाड्या केल्या नसत्या तर लग्नाचा योग आलाच नसता. लग्नाच्या कामीं आलेल्या अडचणींनीं दुर्गेच्या लग्नाचें महत्व वाढलें असें मी समजतें. दुर्गेच्या जागीं तुह्मी असतां तर मला वाटतें तुह्मांस आपल्या प्रियकराचा नाद सोडून द्यावा लागला असता. आपणास मुख्यत्वेंकरून परिणामाकडे दृष्टि दिली पाहिजे. सरळ मार्गानें जाऊन स्वर्ग मिळेल, परंतु सर्वच जण साधु झाले तर मग जग चालावें तरी कसें ? ह्या जगांत यश मिळविण्याला थोडाबहुत तरी आडमार्गाचा स्वीकार करावा लागतो. आपला उद्देश चांगला असला ह्मणजे झालें. मग शेवट गोड तर सर्व गोड असें ह्मणून तो उद्देश कोणत्या रीतीनें पार पडला त्याची फारशी चौकशी करण्याची गरज नाहीं. एकदम साधु होऊन आपलें चालावयाचें नाहीं. व्यवहारांत केव्हां केव्हां लबाडी केल्यावांचून गत्यंतर नसतें.

सुलोचना—तुझें कामचलाऊ तत्वज्ञान वरवर पाहाणारास खरें दिसतें. परंतु तें विचाराच्या कसोटीस उतरणार नाहीं. आतां ह्याच कामांत निरनिराळ्या युक्त्या लढविण्यांत जी बुद्धि खर्च झाली व त्या युक्त्या अमलांत आणण्यासाठीं जे श्रम घेण्यांत आले तितकीच बुद्धि व श्रम खर्च करून कोणती गोष्ट साध्य झाली नसती ? आणि एकवेळ आपल्या मनाप्रमाणें एखादी गोष्ट न घडली ह्मणून तरी काय झालें ? मला तर वाटतें कीं जगांत यश मिळविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां आपला धर्म पालन करण्याचा प्रयत्न करणेंच श्रेयस्कर आहे. ह्या क्षणिक आयुष्यांत जितकें सुख उपभोगतां येईल तेवढें आपणांस मिळावें ह्मणून धडपड करण्याऐवजीं ईश्वराची इच्छा काय आहे ती समजून घेऊन तीप्रमाणें वर्तन करण्यांतच सुख मानण्यास आपणाला शिकलें पाहिजे.

यमुना—(किंचित् हांसून) सध्यां माझ्या ईश्वराची इच्छा अशी आहे कीं, मोरेश्वराला तोंडघशीं पाडून त्याचें आणि दुर्गेचें लग्न लावावें. मी ही इच्छा पार पाडण्यास मदत करितें, व त्यांतच सुख मानितें. आतां उद्यां तुमचें लग्न झालें ह्मणजे तुमच्या ईश्वराची इच्छा पार पाडण्यास तुह्मांस झटावें लागेल.

सुलोचना—यमुने, लग्न ह्मणजे कांहीं थट्टा नाहीं. आतां आपल्या लोकांत बाहुलाबाहुलींचीं लग्नें करण्याची चाल मोडत चालली आहे; परंतु अजून किती नवऱ्या मुलींस लग्नाची जबाबदारी समजत असेल ती असो.

यमुना--लग्नाची जबाबदारी समजल्याशिवाय लग्नच लावूं नये असें तुमचें ह्मणणें असेल तर बहुतेक मुलींनां अविवाहित राहावें लागेल. खरोखर तुमचे विचार फार चमत्कारिक आहेत. उद्यां तुह्मी ह्मणाल कीं, भाजीपाल्याचे किंवा अग्नीचे गुणधर्म समजल्याशिवाय स्वयंपाक करूं नये, अथवा अन्नाचे आणि पक्काशयाचे गुणधर्म समजल्याशिवाय जेवूं नये. असें झालें तर बहुतेकांस उपाशीं राहण्याचीं पाळी येईल. तुमच्या ह्या गुणधर्मांचें आणि जबाबदाऱ्यांचें ज्ञान असल्याशिवाय जगाचें रहाटगाडगें आजपर्यंत तर सुरळीत रीतीनें चाललें आहे. उद्यां काय होईल तें मात्र मला सांगतां येत नाहीं.

सुलोचना--माझ्या ह्मणण्याचा भलताच अर्थ करूं नकोस. माझें ह्मणणें इतकेंच कीं—

यमुना— वन्सें आज तुमचें तत्वज्ञान ऐकण्यास मला फुरसद नाहीं. घरांतल्या कामाची आटपाआटप करून उद्यांच्या तयारीस लागलें पाहिजे. तुमचें ह्मणणें काय असेल तें उद्यां गोपाळराव भावोजींस समजावून सांगा. त्यांनां तें समजलें तर समजेल कदाचित्.

(जातात.)

प्रवेश २.

स्थलः–पैठण येथील गोपाळरावचें घर.

(तात्यासाहेब, गोपाळराव व शंकर.)

तात्या०--मी मोरेश्वराला भेटून आलों. आपल्या धोरणाप्रमाणें सर्व कांहीं मनासारखें होत आहे. अजून त्याला आपल्या कारस्थानांचा सुगावा लागला नाहीं.

शंकर—तो दुसऱ्यांनां फसविण्याच्या उद्योगांत असल्यामुळें स्वतः अगदीं निर्धास्त आहे. लग्न होऊन त्याचे डोळे उघडल्याशिवाय त्याला कांहींच संशय येणार नाहीं.

तात्या०--मी त्याला सर्व बाजूंनीं घेरून टाकिलें आहे. त्याचे शास्त्रीबुवा माझ्या अगदीं मुठींत आहेत. ब्राह्मणांनीं चामड्याचा कारखाना काढण्यासंबंधानें आपल्या शास्त्रांत आधार आहे, अशी त्यांनीं अंबाबाईची तर खात्री केली.

शंकर—त्यांच्या शास्त्राधारावांचून आमचें कांहीं नडलें नव्हतें. व्यावहारिक सुधारणा अमलांत आणण्याच्या कामीं ह्या शास्त्राधारांचा कितपत उपयोग होत असेल तें सांगवत नाहीं. त्यापासून लोकांचें मन मुख्य प्रश्नावरून उडून भलत्याच गोष्टीचा ऊहापोह करण्यांत गुंतून जातें, व सुधारकांची टर करण्याला अजाण लोकांच्या हातांत तें एक हत्यारच होऊन बसतें.

तात्या०—शास्त्राधार आपण होऊन जर आपल्या मदतीस येत असेल तर त्याचा अव्हेर करूं नये असें माझें मत आहे. आपले बेत जरी मनाप्रमाणें जुळून येत आहेत तरी त्यांचा परिणाम सर्वांस सुखावहच होईल कीं काय ह्यासंबंधानें मला आतां संशय वाटत आहे. ह्या लग्नापासून दुर्गा आणि मोरेश्वर ह्यांचें कल्याण होईल कीं काय हा मोठा प्रश्न आहे. त्या दिवशींच्या मोरेश्वराच्या बोलण्यावरून दुर्गेबरोबर लग्नाचा विचार त्याला मुळींच रुचत नाहीं असें दिसतें. ह्याच्या मुळाशीं काय आहे तें समजलें पाहिजे. दिनकरजवळून ह्यासंबंधानें कांहीं माहिती मिळाली तर पाहात होतों, परंतु अजून तेथें माझी कांहीं डाळ शिजली नाहीं.

गोपाळ०—दिनकर हा मोठा पाताळयंत्री मनुष्य आहे. मोरेश्वराला भलत्यासलत्या नादीं लावण्यास तोच कारण आहे; व मला वाटतें ह्यांत कांहीं तरी त्याचेंच कपट असावें.

तात्या०—लग्न लागण्याच्या आधीं ह्या गोष्टीचा उलगडा झाला असता तर बरें होतें. त्या दिवसाच्या एकंदर प्रकारावरून मला असें वाटूं लागलें आहे कीं दुर्गेचें नांव मोरेश्वरानें कां टाकलें हें जर आधीं न समजलें तर तिचें लग्न एव्हांच न झालेलें बरें.

शंकर—मला वाटतें तुमची भीति अस्थानीं आहे. मोरेश्वर मोठा महत्वाकांक्षी आहे. सध्यां पैसा व लौकिक ह्याशिवाय दुसरें कांहीं त्याला दिसत नाहीं. दुर्गेचा बाप वारला नसता, तिची पूर्वीप्रमाणें श्रीमंती असती तर अजून तो तिच्यापुढें लोटांगणें घालीत असता. दुर्गेवर त्याचें प्रेम पूर्वीप्रमाणेंच आहे, अशी माझी समजूत आहे. त्यांची महत्वाकांक्षा मात्र त्याला आडमार्गास नेत आहे.

तात्या०—पूर्वीं मलाही असेंच वाटत होतें; परंतु आतां मात्र त्यासंबंधानें संशय येतो.

प्रवेश ३.

स्थलः—पैठण येथील मोरेश्वरचें घर.

(मोरेश्वर आणि दिनकर.)

दिनकर—डाक्टरसाहेब, मी आपणांस पूर्वीपासूनच सांगत होतों कीं कोणावर फारसा विश्वास ठेवणें चांगलें नाहीं. आपला स्वभाव फारच भोळा. आपणास कोण केव्हां फसवील तें सांगतां येत नाहीं. ह्याकरितां मी डोळ्यांत तेल घालून आपल्या हितासाठीं अहोरात्र सावध असतों.

मोरेश्वर—कां दिनकर, आज काय झालें ? तुझा नेहमीं कोणावर ना कोणावर तरी वहीम हा असतोच.

दिनकर—आणि मीं घेतलेला संशय खोटा ठरला असें केव्हां तरी झालें आहे ? आपणाला वाटतें कीं सर्वजण आपल्यासारखेच साळसूद आहेत.

मोरेश्वर—तें जाऊंदे. पण आतां नवीन घडामोड काय आहे तें तर सांगशील ?

दिनकर—धनीसाहेब घडामोड नवी नाहीं, जुनीच आहे; परंतु आपणाला मात्र अझून तिचा मागमूसही नाहीं. तात्यासाहेब आणि शंकर ह्यांनीं तुह्मांला तोंडघशीं पाडण्याचा बेत केला आहे.

मोरेश्वर—दिनकर, तूं वेडा आहेस. मी तोंडघशीं पडणार नाहीं, तर गोपाळराव तोंडघशीं पडलेला तूं उद्यां पाहाशील.

दिनकर—धनीसाहेब, आपला हा भ्रम केव्हां दूर होईल ? गोपाळराव आणि सुलोचना यांचें उद्यां लग्न होण्याचें ठरलें आहे. त्यासाठीं हिंमतराव, गोपाळराव वगैरे मंडळी इकडे आली आहे.

मोरेश्वर—काय ह्मणतोस ? गोपाळराव आणि हिंमतराव पैठणास आले आहेत ?

दिनकर—होय, पैठणास आले आहेत; आणि तात्यासाहेब अंबाबाईचे सोयरे ह्मणून तुह्मांस सांगण्यांत आलें होतें, ते अंबाबाईचे सोयरे नाहींत, तर दुर्गेच्या बापाचे चुलत भाऊ कीं काय लागतात. आणि उद्यां खरोखरच तुमच्या बरोबर ते दुर्गेचें लग्न लावून देणार आहेत.

मोरेश्वर—तुला हें कोणीं सांगितलें ?

दिनकर—मला आपल्या त्या तात्यासाहेबांचा पहिल्यानेंच संशय आला होता, कारण त्यांचें आणि दुर्गेचें नातें आहे ही गोष्ट मला पूर्वींच माहीत होती. तेव्हां ह्या गोष्टीचा पुरा तलास लावण्याचा मीं निश्चय केला. गोपाळराव व हिंमतराव हे पैठणास आल्याची बातमी मला लागली, तेव्हांपासून तर मी त्यांच्या पाळ-तीवर होतों. आणि शेवटीं मला त्यांचें भाषण आडून ऐकायला मिळालें तेव्हां त्यांचा सर्व बेत मीं ताडला.

मोरेश्वर—तुला जर ह्या गोष्टीचा आधींच सुगावा होता तर तूं मला पूर्वींच सावध कां केलें नाहींस ?

दिनकर—धनीसाहेब, मला आधीं संशय होता; व मी फार संशयी आहें असें जेव्हां तेव्हां आपण मला ह्मणत असतां, तर ह्मटलें आधीं आपली खात्री करून घेतल्याशिवाय धनीसाहेबांच्या कानावर गोष्ट घालण्यांत अर्थ नाहीं. मीं प्रत्यक्ष त्यांचें भाषण आडून ऐकलें तेव्हां माझी खात्री झाली कीं, आपणाला फसवून दुर्गेबरोबर ते आपलें लग्न लावून देणार आहेत. ह्या उद्देशानें आपल्या हातून त्यांनीं अंबाबाईस व अण्णासाहेबांस पत्रें लिहविलीं कीं आपल्या मनांतून दुर्गेबरोबरच लग्न लावावयाचें आहे. आपल्या हातचीं पत्रें त्यांच्याजवळ असल्यावर आपणाला मागें पाय घेण्यास जागा राहिली कोठें ? सत्यभामाबाईही आपल्या मुलीस घेऊन पैठणास आल्या आहेत. हिंमतरावाच्या घराशेजारींच त्यांनीं घर घेतलें आहे; व उद्यां एकाच मुहूर्तावर गोपाळरावांचें सुलोचनाबाई-बरोबर व तुमचें दुर्गाबाईबरोबर लग्न होऊन जाईल.

मोरेश्वर—ह्मणजे ते मला अगदीं लहान बाळच समजत असतील ? एकंदरींत हा त्यांनीं एवढा प्रचंड व्यूह रचला तो याच करितां काय ? किती मी भोळसर मनुष्य कीं, तात्यासाहेबांचें हें कारस्थान मला तेव्हांच उमगून आलें नाहीं. केवढा दुष्ट मनुष्य तो ! आणि तो शंकऱ्या देखील. एकंदरींत हें खरें कीं माझे मित्र ह्मणून ह्मणविणारे माझे खरे मित्र नव्हत, तर उलट ते माझे हितशत्रु असून माझें नुकसान करण्याच्या उद्योगांत आहेत. आतां त्यांचें कारस्थान माझ्या लक्षांत आलें. मी आणि दुर्गेबरोबर लग्न लावणार ? प्राण गेला तरी बेहत्तर पण अशी गोष्ट कधींही होणार नाहीं.

दिनकर—कां होणार नाहीं ? तुह्मी बोलून चालून दुर्गाबाईबरोबर लग्न लावण्यासाठीं येथें आलां. सुलोचनेबरोबर मला लग्न लावावयाचें नाहीं असें अंबा-

बाईस कळविलें. उद्यां प्रसिद्धपणें दुर्गाबाईबरोबर लग्न लावायाला आपण येथून निघणार आणि तात्यासाहेब "सत्यं भवतु ते वचः" असें ह्मणून आपल्या ह्मणण्याप्रमाणें दुर्गाबाईबरोबर आपलें लग्न लावून देणार. सगळें जाळें आपल्या हातून विणून घेऊन त्यांत आपणाला अडकवून टाकणार, ह्मणजे धनीसाहेबांना पुनः वर तोंड काढण्यास देखील जागा राहणार नाहीं.

मोरेश्वर—बरें तर पाहातों आतां मी. आधीं त्या तात्यासाहेबांचा खरपूस समाचार घेतों. दिनकर, तूं आतांच्या आतां गाडी घेऊन जा, आणि मी कांहीं अगत्याच्या कामासाठीं तात्यासाहेबांस येथें बोलावलें आहे असें सांगून इकडे घेऊन ये. मला त्यांचा बेत कळला आहे हें त्यांच्या नजरेस येऊं देऊं नकोस बरें ?

दिनकर—ठीक आहे. मी आतां त्यांना घेऊन येतों. येथें आल्यावर मात्र त्या ह्मातार्‍याची चांगलीच खोड जिरवा.

(जातो.)

प्रवेश ४.

(**स्थलः**—पैठणांतील एक रस्ता.)

दिनकर—गाडी जोडावयाला वेळ आहे, ह्मणून धोंड्याला सांगून गाडी घेऊन येण्याला सांगितलें. तो बहुधा मी तात्यासाहेबांच्या घरीं पोंहचे तोंपर्यंत गाडी आणणार नाहीं. आपल्या बुद्धिकौशल्यानें आज मी सर्वांस चित करून टाकलें आहे. मोरेश्वर माझा धनी, परंतु त्यास एका बाहुल्याप्रमाणें मी आपल्या हातावर नाचवितों. तात्यासाहेब, गोपाळराव, शंकरराव यांचेही बेत मी मोठ्या चातुर्यानें उघडकीस आणले आणि आतां लवकरच त्यांची फजिती करून टाकतों. दैवयोगानें मला एखाद्या राजाची प्रधानकी मिळाली असती तर आपल्या चातुर्यानें मोठमोठीं कारस्थानें पार पाडून चाणक्याप्रमाणें मी जगास चकित करून सोडलें असतें. ह्या जगांत यश येण्यास धूर्तता हें मोठें शस्त्र आहे. त्याशिवाय कोणाचें कांहीं वळत नाहीं. नुसतें पुस्तकी ज्ञान किंवा दुसरे सद्गुण अंगीं असूनही कोणाचें चालणार नाहीं. आमच्यासारख्यांचाच येथें जय होणार. सत्याला धरून आजपर्यंत कोणाचें बरें झालें आहे ? ह्मणूनच व्यवहारांत खोटें बोललें असतां दोष नाहीं असें आमच्यासारखे ज्ञाते ह्मणतात. (शंकर येतो.)

शंकर—कायरे दिनकर, एवढ्या रात्रीं कोठें चाललास ?

दिनकर—जरा कामाला जात होतों.

शंकर—तुझ्यासारखा साळसूद मनुष्य इतक्या रात्रींच्या प्रहरीं मोठ्या लगबगीनें जात आहे तेव्हां तो कांहीं तरी कामासाठींच जात असला पाहिजे. पण असें तांतडीचें काम तें काय आहे ? कोणाच्या घरीं जातोस ?

दिनकर—शंकरराव, मी गरीब मनुष्य. पोटासाठीं दुसऱ्याची नोकरी करणार. त्यांत डाक्टर साहेबांसारख्यांची नोकरी करण्याचें कपाळीं आलें तर धन्याच्या हितासाठीं त्याच्या सांगण्यावरून आह्मांला दिवसास शेंकडों लबाड्या कराव्या लागतात. त्यांत आमचा काय बरें दोष ? आह्मी गरीब झालों ह्मणून आह्मांला काय पापपुण्याची भीतीच नसते असें तुह्मी समजतां ? पण नोकरीपुढें आमचा इलाज चालत नाहीं.

शंकर—तेंही खरें आहे. पोट कोणालाच सुटलें नाहीं. धनी लबाड असला तरी त्याची लबाडी कोणास दिसून येत नाहीं, आणि सगळ्या लबाडीचें खापर चाकराच्या डोक्यावर मात्र फुटतें.

दिनकर—आतां कसें ह्मणालांत ? आह्मी कितीही साळसूद असलों तरी हुकमाचे नोकर. धनी जें सांगतील तें ऐकलें पाहिजे. मग आपणाला तें बरें दिसो अगर वाईट दिसो. बरें असलें तर त्याचा फायदा होईल धन्याला. वाईट असलें तर लोक लबाड ह्मणतील आह्मांला.

शंकर—सेवाधर्म वाईट तर खराच. ह्मणूनच रात्रीं अपरात्रीं तुला बाहेर जावें लागतें. आतां कोठें चाललास ?

दिनकर—तात्यासाहेबांच्या घरीं जातों. डाक्टरांनीं त्यांनां ताबडतोब घेऊन येण्यास सांगितलें आहे. कांहीं अगत्याचें काम आहे.

शंकर—इतक्या रात्रीं बोलावलें आहे तर असें काम तरी काय आहे ?

दिनकर—कांहीं समजत नाहीं. डाक्टरसाहेबांची प्रकृति बरोबर दिसत नाहीं.

शंकर—असें असेल तर चल मीही बरोबर येतों.

दिनकर—इतकें विशेष कांहीं नाहीं. तात्यासाहेब आले ह्मणजे झालें. तुह्मी कशाला आणखी तसदी घेतां ?

शंकर—तसदी कशाची आली आहे त्यांत ? चल, आपण तात्यासाहेबांस घेऊन जाऊं.

दिनकर—तुमची मर्जी असेल तर या; परंतु ह्मटलें तुमच्या कामांत उगीच व्यत्यय कशाला ?

शंकर—मला सध्यां विशेष कांहीं काम नाहीं. (स्वगत) इतक्या रात्रीं तात्यासाहेबांस कां बरें बोलावलें असेल ? हें कांहीं बऱ्यांतलें चिन्ह दिसत नाहीं. कांहीं तरी कमी अधिक झालेलें असलें पाहिजे. आमचा बेत तर फुटला नाहीं ना ? तसें असेल, तर आयत्या वेळीं सर्वच फजिती होईल. असो, काय असेल तें लवकरच कळून येईल.

(जातात.)

प्रवेश ५.

स्थलः—पैठणांतील सत्यभामाबाईचें घर.

(दुर्गा रात्रीं गच्चींत प्रवेश करिते.)

दुर्गा—ही रात्रीची वेळ किती रमणीय आहे ! आकाशांत चांदण्या प्रकाशल्या आहेत; गार वारा गात्रांस आल्हादित करून, जीवास सौख्य देत आहे. दिवसाचें सर्व कामकाज आटोपून लोक विश्रांति घेत आहेत. त्यांची सर्व तळमळ व परस्परांमधील स्पर्धा आतां शांत झाली आहे. अर्धें जग निद्रित झालें आहे, अथवा होण्याच्या बेतांत आहे. इकडे जंगलाच्या बाजूला सर्वत्र अंधकार पसरला आहे. ह्या अंधाराच्या गर्भांत किती निरनिराळ्या प्रकारचे वृक्ष, वनस्पति, किंवा श्वापदें असतील ! आतां अंधारांत अंधुक दिसणाऱ्या किंवा लोपून गेलेल्या गुहा, झाडें, पशु व पक्षी उद्यां सूर्यनारायणाच्या प्रकाशानें दृग्गोचर होतील. ही गोदावरी नदी रात्रीच्या अंधारांतून खळखळ वाहात जाणाऱ्या आपल्या पाण्याच्या प्रवाहानें देशदेशांतर सुपीक करीत, व प्राणिमात्रांस जीवनाचा पुरवठा करीत, रत्नाकराकडे जात आहे. मंजुळ गाणें गात वाहत जाणाऱ्या तिच्या प्रवाहाची दिशा उद्यां सूर्याच्या उज्ज्वल प्रकाशांत स्पष्टपणें गोचर होईल. त्याच प्रमाणें उद्यांचा दिवस माझ्या आयुष्यांतील एक महत्वाचा भाग, एक अपूर्व देखावा प्रेक्षकांस दाखवील. माझ्या पुढील आयुष्याचा प्रवाह कोणत्या दिशेनें वाहणार हें उद्यां समजून येईल. (थोडा वेळ स्वस्थ राहून) ही सृष्टिदेवता

रमणीय व प्रशांत स्वरूप धारण करून माझें मन आक्रमण करीत आहे, परंतु चिंता मला स्वस्थतेचा उपभोग घेऊं देत नाहीं. ह्या वेळीं माझ्या अधीर हृदयाची काय अवस्था झाली आहे! ही रात्र तरी केव्हां संपेल? ह्या एकंदर खटपटींत यश येईल काय? माझ्यासारखें धाडस करणाऱ्या स्त्रिया तरी फार मिळणार नाहींत. उद्यां-उद्यांच एकंदर श्रमांचें चीज होणार आहे. सोक्ष कीं मोक्ष काय तो उद्यां कळून येईल. तोंपर्यंत हृदया, धीर धर. हे आकाशांत संचार करणाऱ्या पवित्र ताऱ्यांनो, ह्या पृथ्वीवर कीटकांप्रमाणें वावरणाऱ्या क्षुद्र मानवांचें सुखदुःख तुह्मी पहात असाल काय? त्यांच्या वर्तनावर, त्यांच्या स्थितीवर तुमचा अंमल चालतो काय? त्यांच्या दुःखानें दुःखी होऊन रात्रीं दंवाच्या रूपानें तुह्मीं अश्रु ढाळतां काय? तसें असेल तर ह्या अनाथ बालिकेवर-तुमच्या गरीब मुलीवर कृपादृष्टि ठेवा. तिच्यावर येणारीं संकटें आपल्या प्रभावानें दूर करा. ह्या संसारांत येणाऱ्या अनेक अडचणींना तोंड देतां येईल व मोहांस दूर सारतां येईल इतकें सामर्थ्य व नीतिधैर्य ह्यांचा तिच्या हृदयांत संचार करवा. बाबा, तुह्मी आजच्या प्रसंगीं आकाशांतून आपल्या उज्ज्वल व उच्च स्थानावरून तुमच्या ह्या लाडक्या दुर्गेकडे पहात असाल काय? तिच्यासाठीं तुमचें कोमल व निर्मल अंतःकरण पूर्वीप्रमाणेंच द्रवत असेल काय? तिला आपल्या दिव्य वाणीनें तुह्मी आतां आशीर्वाद देत असाल काय? अंतःकरणपूर्वक दिलेला तुमचा आशीर्वादच ह्या आणिबाणीच्या प्रसंगीं मला सर्व संकटांतून पार नेईल.

सत्यभामा—(प्रवेश करून) दुर्गे, दुर्गे, तूं येथें काय करतेस? तुला घरांत सर्वजण शोधीत आहेत.

दुर्गा—आई, मी येथें सहज वाऱ्यावर आलें होतें. येतें बरें आंत.

(जातात.)

प्रवेश ६.

स्थलः-पैठणांतील मोरेश्वराचें घर.

(मोरेश्वर आपणाशीं विचार करीत बसलेला आहे.)

मोरेश्वर—तात्यासाहेबांसारखा वयोवृद्ध मनुष्य मला फसवायाला प्रवृत्त होईल हें माझ्या स्वप्नींही नव्हतें. काय हें कारस्थान! त्या दुराचारिणी स्त्रीबरोबर माझें लग्न लावूं पाहतोस काय? असें करण्यास तुला पुनर्जन्म घ्यावा

लागेल. हा दिनकर जर माझ्याजवळ नसता तर केवढा अनर्थ झाला असता. तात्यासाहेबानें मला खरोखरच खाड्यांत उतरविलें असतें. असा विश्वासु व चाणाक्ष मनुष्य मजजवळ आहे ह्मणूनच माझा निभाव लागला. दुर्गेचें दुराचरण तरी त्यानें किती शिताफीनें उघडकीस आणिलें? त्या पत्राचा तुकडा अजून मी जपून ठेविला आहे. (एका पेटींतून पत्र काढतो) ह्या लहानशा कागदाच्या तुकड्यानें माझें मनोराज्य भग्न केलें, माझ्या आशा नाहींशा केल्या, मला सुखस्वप्नांतून जागें केलें. एका अनर्थापासून माझी सोडवणूक केली. कागदाच्या एखाद्या लहानशा तुकडयांत किती तरी करामत असते! (टेबलावरील पेटींतून एक चिरूट घेतो.) काडयांची पेटी काय झाली? धोंडया, रे धोंड्या! हा गाढव हांक मारल्याबरोबर आला आहे असें कधींही झालें नाहीं. ही दिनकरची बंडी येथें खुंटीवर आहे. तिच्या खिशांत असेल काड्यांची पेटी. (खिशांत हात घालून त्यांतून तपकिरीची डबी व एक कागदाचा तुकडा बाहेर काढतो.) अरे ही तपकिरीची डबी आणि हा कसला कागद बाहेर पडला? हें तर दुर्गेचें अक्षर! आणि हा कागद येथें अर्ध्यांतून फाटलेला आहे. (आपल्या हातांत असलेला कागद त्याला लावून पाहातो.) काय चमत्कार! हे दोन्ही तुकडे जुळतात पहा कसे! हा ह्या पत्राचाच तर भाग नाहीं? दिनकर मला ह्मणाला कीं अर्धें पत्र गोपाळरावानें फाडलें ह्मणून. मग हें येथें कसें आलें? आणि हें पत्र गोपाळरावाला लिहिलेलें नाहीं. यमुनेला लिहिलेलें आहे. आश्चर्यच आहे! (पत्र वाचतो.)

"प्रिय मैत्रीण यमुना हीसः—

तुझी तशीच सुलोचनेचीही फार दिवस झाले भेट झाली नाहीं. मी हल्लीं फारशी बाहेर जात येत नसल्यामुळें घरांत मला एकटीला कंटाळा येतो; तरी तुह्मी दोघीही एके दिवशीं दुपारीं माझ्या घरीं येण्याचें अवश्य करा. विसरूं नका. तूं पाठविलेलें पुस्तक वाचून झालें, आणि आतां ह्या पत्रासोबत तें परत करीत आहें. ह्या पुस्तकांत गोपाळरावाचें पात्र खेरीज करून मला विशेष कांहीं आढळलें नाहीं. त्याचे धैर्य, सद्गुणांवरील निष्ठा, लोककल्याण करण्याची इच्छा इत्यादि गुण त्यांत चांगले दाखविले आहेत. बाकीचीं पात्रें साधारणच आहेत; संविधानकही फार मनोवेधक आहे असें दिसत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे विशेष असें एका गोपाळरावाशिवाय मला कांहींच दिसत नाहीं.

मला एकटीला करमत नाहीं. तुमच्या भेटीसाठीं मी फार आतुर झालें असून चातकपक्ष्याप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत आहें. लौकरच आपली भेट होऊन आपणांस एकत्र आनंदानें व सुखसमागमांत वेळ घालविण्यास मिळेल अशी आशा करणारी

दुर्गा."

हें मी काय वाचतों ? (नीट निरखून पाहून) पत्रांचे दोन्ही भाग बरोबर जुळतात ! मजजवळ असलेल्या पत्राचाच हा भाग ह्यांत कांहीं संशय नाहीं. आजपर्यंत माझ्या डोळ्यांवर काय धुंदी आली होती ! ह्या पत्रावरून मी दुर्गेला दुराचारिणी ठरविलें आणि तिचा त्याग केला ! एकूण हा दुष्ट दिनकरच आजपर्यंत मला फसवीत आला ! मी दूध पाजून हा सापच पोसला. खरोखरच मी अगदीं भोळा आणि मूर्ख आहें. काय पण गुलामानें युक्ति योजिली ! पत्र दुर्गेनें यमुनेला लिहिलें, तें अर्थाचा विपर्यास होईल अशा बेतानें अर्धे फाडून गोपाळरावास लिहिलेलें पत्र ह्मणून मला दिलें, आणि म्यां मूर्खानें त्याचें ह्मणणें खरें मानिलें. गोपाळराव ! गोपाळरावासारख्या सच्छील माणसाचा मीं उगाच द्वेष केला. हा चांडाळा, अधमा दिनकरा, तुला चावूं कीं खावूं असें मला झालें आहे. आणि मी तरी किती वेडगळ ! ह्या जगांत तिरस्कार करण्यास योग्य असा जर कोणी मनुष्य असेल तर तो मी आहें. दुर्गेस हें तोंड आतां मी कसें दाखवूं ? तिची क्षमा कशी मागूं ? (विचार करीत बसतो. तात्यासाहेब, शंकर, व दिनकर येतात.)

दिनकर--(मोरेश्वराच्या हातांत पत्र पाहून घाबरून) हें दुसरें पत्र ह्यांना कोठें सांपडलें ?

मोरेश्वर—दुष्टा, तुझें कपट आज उघडकीस आलें. मी तुझ्यावर इतके उपकार केले असून मला फसवायला तुला कांहींच वाटलें नाहीं ? हें यमुनेला लिहिलेलें पत्र गोपाळरावांच्या हातून पडलेलें मिळालें ह्मणून मला आणून दिलेंस आणि व्यर्थ गोपाळराव आणि दुर्गा ह्यांच्यासंबंधानें मनांत संशय उत्पन्न केलास.

शंकर—गोपाळराव आणि दुर्गेसंबंधानें संशय ?

मोरेश्वर—होय. मी ह्या दुष्टाच्या जाळ्यांत सांपडून त्यांच्यावर आणि दुर्गेवर भलताच आरोप ठेविला. हरामखोरा, थांब तुझी खोड मोडतों. (दिनकराच्या अंगावर धांवून त्यास खालीं पाडतो.)

तात्या—डाक्टरसाहेब, हें काय वेड्यासारखें करतां ? (शंकर व तात्यासाहेब मोरेश्वराला आवरून धरतात. दिनकर त्याच्या हातून सुटून पळून जातो.)

मोरेश्वर—(त्यांच्या हातांतून सुटण्याचा प्रयत्न करित) थांबा, त्याची चांगली खोड मोडूं द्या. तो किती नीच आहे तें तुह्मांला अजून माहित नाहीं.)

शंकर—मोरेश्वर, हें असें करणें तुह्मांला शोभत नाहीं.

तात्या—दिनकरासारख्या लबाड मनुष्यावर विश्वास ठेविलात ही आधीं तुमचीच चूक.

मोरेश्वर—तात्यासाहेब, मी मोठा पातकी आहें. मी आजपर्यंत दुर्गेस व्यर्थ छळिलें. माझ्या मूर्खपणाचा मला मोठा पश्चात्ताप झाला आहे. त्या काळसर्पानें दुर्गेबद्दल मला नाहीं नाहीं त्या गोष्टी सांगितल्या, व विशेष विचार न करितां, विशेष चौकशी न करितां, मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेविला आणि एकनिष्ठपणानें मजवर प्रेम करणाऱ्या प्रियेची अवहेलना केली आणि गोपाळरावासारख्या स्नेह्याचा द्वेष केला.

तात्या०—डाक्टरसाहेब, झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. गोपाळरावासंबंधानें व दुर्गेसंबंधानें तुमच्या मनांत जो गैरसमज उत्पन्न झाला होता, तो आज नाहींसा झाला व खरी स्थिति तुमच्या नजरेस आली असें दिसतें. गैरसमजानें आपण जें काय केलें असेल तें आतां विसरलें पाहिजे.

शंकर—संशयरूप राहूपासून तुह्मी आज मुक्त झालां ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आतां पुढें काय करावयाचें तें आपणांस पाहिलें पाहिजे. तुह्मी येथें दुर्गेबरोबर लग्न लावण्यासाठीं आलांच आहां. आतां राजरोसपणें उद्यां लग्न होऊं द्या, ह्मणजे झालें.

मोरेश्वर—तात्यासाहेब, मला जरी ह्या दुष्ट संशयानें ग्रासून टाकिलें व मी मूर्खाप्रमाणें आचरण केलें तरी दुर्गेचें मजवरील प्रेम पूर्वीप्रमाणेंच अचल राहिलें व तिची माझ्या ठायीं निष्ठा दृढतर राहिली ही किती आश्चर्याची गोष्ट! आजपर्यंत ह्या संशयासंबंधानें मी कोणाजवळ गोष्ट काढिली नव्हती, व कृपा करून तुह्मीही ह्या गोष्टीचा कोणाजवळ उच्चार करूं नका. शंकरराव सांगतात त्याप्रमाणें उद्यां आमचें लग्न झालें ह्मणजे मीच मागील एकंदर हकीगत प्रियेस कळवून तिची क्षमा मागेन.

तात्या—लग्नाच्या आधीं परस्परांच्या मनांतील किल्मिष नाहींसें होऊन तीं स्वच्छ झालीं हें पाहून मला फार संतोष होतो. तुमच्या वर्तणुकीसंबंधानें इतके दिवस आह्मांस एक मोठें गूढ होतें तें आज नाहींसें झालें.

मोरेश्वर—मी तुह्मांला दुसऱ्याच उद्देशानें बोलावलें व एका अकल्पित योगानें आपलीं मनें निर्मल स्नेहानें बद्ध झालीं.

शंकर—मोरेश्वर, आतां रात्र थोडी राहिली, तर आपण आपआपल्या उद्योगास लागूं.

तात्या—(स्वगत) सर्व गोष्टींचा अशा रीतीनें उलगडा झाल्यामुळें मला किती तरी समाधान वाटत आहे! भाऊसाहेबांनीं मजवर सोंपविलेलें काम परमेश्वरकृपेनें आज पार पडलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. माझ्या छातीवरील ओझें हलकें झालें असें आतां मला वाटतें.

(जातात.)

प्रवेश ७.

स्थलः—पैठण येथील मोरेश्वराच्या घरांतील एक भाग.

धोंड्या—धनीसाहेबांचें लगीन म्हून ह्या बेटया धोंडयाची कोण धांदल ! रात नय, दिस नय. धोंडया बामनाकडे धांव, धोंडया मसन्याकडे पल, धोंडया ह्यो कर, धोंडया त्यो कर, तुलार बेटया धोंडया कशापायीं इक्तं काम करून करून मराया हवं ? अन् दोन दिवस गोंधळ तर लईं झालया. धनी साब काय शिव्या देत्याती, आन प्वारं काय बकऱ्यावानी रडत्याती, आन् बायका काय चिमन्यावानी च्वालत्याती, आन् बामन काय बेडकावानी आरडत्याती. धोंडया लेका, तूं बामन असतास तर तुझी काय चंगाळ. देवाच्या पुढं बसुनश्यान गुड गुड करावं, आन् पैशे उपटावे. पण तुझी नी लाडवांची लईं चंगळ हाई. धोंडयाचं नशीब लईंम्वाटं की ख्वाटं ? इतके दिन फकत धनीसाहेबांच्या शिव्या व्हत्या. आता वैनीबायची किटकिट बी तुझ्या मागं लागली. धनीसाहेब शिव्या लईं देत्याती पण त्यच्या राज्यांत पैशावर हात मारायची चंगळ व्हती. बायकांची नजर लईं बारीक. त्येच्या राज्यांत हकडचा पैसा तकड व्हता नय कामाचा. धोंडया, तूं बावळट तर खरा, पण इतकी अक्कल तुझ्या ह्या डोस्क्या मंदी हाये. संभाळ आतां, तुझी बरी गत नाय. अर लगीन झाल्यावर धनीसाहेब जरा

थंडावल्यावानी कशापायीं झाले रे ? अर कशापायीं म्हून काय इच्यारतोस ! इतके दिवस ते धनी व्हते आतां त्यंच्या डोचक्यावर बी शेठाणीन बाई येऊन बसलीया. तेच्याच साठीं वैनीबाय त्यंच्या त्वंडाकडे बघुनशान गुलगुल हंसत्याती. कल डाक्तरसाहेबानीं दिनकरवर तर लईच आग पाखडलीन्, आन तेस्नी घालवून शानी बी दिलेंन्. दिनकर गुलामाचा पहिल्या नंबरचा सोद्या. भली लेकाची खोड मोडली. अर पण धोंडया, तुलारे या पंचायती कोणी सांगतलया ? धनी-साहेब थतं तुझी वाट बघत्याती, आन् तूं हथ काय करतोस ? चल कुत्र्यावानी पळ.

(जातो.)

प्रवेश ८.

स्थलः–पैठणांतील मोरेश्वराचें घर.

(मोरेश्वर व दुर्गा.)

दुर्गा—शेवट गोड झाला ह्यांतच मला आनंद आहे. मोठें भयंकर वादळ येऊन गेल्यावर सर्वत्र शांतता व्हावी, आकाश निरभ्र व्हावें, आणि सृष्टीचें स्वरूप पुनः प्रसन्न, रमणीय, व मधुर व्हावें, तशी आतां स्थिति झाली आहे. दुःखानंतर येणारें सुख अधिक सुखकर असतें. आजच्या मंगल प्रसंगीं सकल वस्तुजातीशीं एक जीव होऊन मला आनंद वाटतो. मनाची अशीच वृत्ति नेहमीं राहील तर किती चांगलें होईल !

मोरेश्वर--तुझ्या आचरणासंबंधी संशयरूप राहूनें ग्रासलें असतांना माझ्या हृदयांत एक देखील सात्विक वृत्ति राहिली नव्हती. खरें सुख कशांत आहे तें विसरून ईर्षा, महत्वाकांक्षा, द्रव्यलोभ, इत्यादि क्षुद्र मनोवृत्तींनीं प्रेरित होत्साता मी नाहीं नाहीं ते चाळे केले. द्रव्यलोभ आणि आत्मप्रतिष्ठा यांच्या टेंकडीवरून दिसणारी संसाराची एक बाजू मी पाहिली. मला तिचा अनुभव आला व तींत कांहीं सुख किंवा सार नाहीं हें कळून चुकलें. आतां (तिचा हात धरून हृदयाजवळ नेतो) प्रेममय दुर्गादेवीची हृदयांत स्थापना करावी व ह्या लोकीं आपलें कर्तव्य काय आहे तें समजण्याचा प्रयत्न करून त्याच्या पाठीमागें लागावें असें मला वाटतें. त्या दुष्ट दिनकरानें--

दुर्गा—आज मी कोणाबरोबरही विरोध करूं देणार नाहीं. बिचाऱ्या दिन-

कराची अवस्था सध्यां कठिण आहे. आपण आज मला जी हकीगत सांगितली ती कालच मला त्याच्या तोंडून कळली.

मोरेश्वर--दिनकराच्या तोंडून ?

दुर्गा--होय. काल त्याला घालवून दिल्यावर तो आमच्या घरावरून जात होता. मध्येंच रस्त्यांत एका गाडीचा घोडा उधळून त्यानें दिनकराला पायाखालीं तुडविलें. तो बिचारा रस्त्यांत विव्हळत पडला असतांना आईनें त्यास घरांत आणविलें. त्याला झालेल्या जखमा औषध लावून बांधून टाकिल्या. त्याला त्यावेळीं कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन सर्व हकीगत त्यानें आम्हांस सांगितली आणि आपल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली. आणखी कांहीं दिवस तरी त्या बिचाऱ्याला बिछान्यावर खिळून राहावें लागेल. (शंकर व यमुना येतात.)

शंकर—डाक्टरसाहेब मी तुमचें अभिनंदन करितों.

मोरेश्वर--शंकरराव, खरोखरच अभिनंदन करण्यासारखीच माझी स्थिति आहे. मी आतां जगाकडे निराळ्या दृष्टीनें पहात आहें. माझा पुनर्जन्म झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

यमुना--दुर्गाबाई, सकल देवता तुमच्याकडे कृपादृष्टीनें पाहोत. तुमचें आयुष्य सुखासमाधानांत जावो. परमेश्वराच्या कृपेनें व प्रेमळ पतीच्या समागमामुळें तुमचा संसारक्रम सुखकर होवो, आणि बुद्धिवान सद्गुणी व निरोगी मुलांमुलींनीं केलेल्या मनोहर गोंधळानें लवकरच तुमचें घर गजबजून जावो, असें मी इच्छितें.

शंकर—पूर्वी ठरल्याप्रमाणें तुमचें लग्न लागलें. त्याच मुहूर्तावर गोपाळराव व सुलोचना ह्यांचेंही लग्न लागलें.

मोरेश्वर—हें ऐकून मला फार फार आनंद होत आहे. सुलोचना आणि गोपाळराव हीं वधूवरें एकमेकांस अनुरूप आहेत. हें नवीन जोडपें येथेंच आलें. (सुलोचना आणि गोपाळराव येतात.) आजचा दिवस मोठा आनंदाचा आहे. (गोपाळरावास) संशयग्रस्त होऊन मूर्खपणानें—

गोपाळ०—झालें तें झालें त्याची गोष्ट आतां नको. हा दिवस आपणांस दाखविल्याबद्दल आपण परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत.

सुलोचना—मध्यंतरीं आलेलें वावटळ एका अकल्पित घटनेनें नाहींसें झालें व आजचा आनंदाचा दिवस उगवला ही किती चांगली गोष्ट आहे !

शंकर—मोरेश्वर, आजच्या सारख्या आनंदाच्या प्रसंगीं तुह्मांस एक सूचना करावी असें माझ्या मनांत आहे. तुह्मी आतां डाक्टरची डिग्री घ्यावी अशी तुमच्या स्नेह्यांची फार इच्छा आहे. तर एखादी नाटक कंपनी ज्याप्रमाणें केवळ लोकाग्रहास्तव एखादा नीरस खेळ पुनः करिते, त्याप्रमाणें निदान तुमच्या स्नेह्यांच्या आग्रहासाठीं तुह्मी एकदां परीक्षेस बसा.

मोरेश्वर—शंकरराव, त्यासाठीं मला एवढा आग्रह करण्याची गरज नाहीं. मी पुनः चांगली तयारी करून परीक्षेस बसेन व ईश्वरकृपेनें मला यश मिळेल अशी आशा आहे. ह्याशिवाय माझ्या मनांत वनस्पतिशास्त्राचा विशेष अभ्यास करून वनस्पतींपासून औषधें तयार करण्याचा कारखाना काढण्याचें आहे. आपल्या देशांत अनेक मोलवान अशा वनस्पति आहेत. त्यांचे गुणधर्म समजून घेऊन त्यांचा आपण उपयोग करूं लागलों तर त्यापासून स्वहित व देशाचें हित अशीं दोनही साधण्यासारखीं आहेत. दिनकर हा माझा अनिष्ट ग्रह होता. तो दूर झाल्यापासून माझ्या धंद्यास विशेष उज्ज्वल व शुभ्र असें स्वरूप येईल.

शंकर—खरें आहे. त्याच्या साह्यानें केलेलीं तुमचीं रामबाण औषधें व चूर्णें नाहींशीं झाल्यानें व तीं लोकांवर लादण्याचे अनिष्ट प्रकार बंद पडल्यानें गरिबगुरिबांचे पैसे वांचतील व त्यांचें आरोग्यही सुरक्षित राहील.

मोरेश्वर—शंकरराव, दिनकर असतांनाही माझ्या डाक्टरगिरीपासून गरीबगुरिबांस त्रास पोंहचूं नये अशी मी खबरदारी घेत असें, व आतां तर माझ्या धंद्यापासून देशाचें कल्याणच होईल.

यमुना—वन्सं, गृहिणीच्या जबाबदारीसंबंधानें तुह्मांस कांहीं व्याख्यान द्यावयाचें असेल तर हा समय फार चांगला आहे.

शंकर—सुलोचनाताईचें व्याख्यान ऐकणें पुष्कळ लोकांस आवडतें. त्यांनीं जर आज मनावर घेतलें तर सर्वांवर मोठा अनुग्रह होईल.

सुलोचना—भाऊ, थट्टा पुरे करा. ही वेळ व्याख्यानाची नाहीं. देवानें आपणांस हा मंगल दिवस दाखविला ह्मणून त्याचे आभार मानून पुढें अशीच कृपादृष्टि ठेवण्याविषयीं, अनन्यभावें आपण त्याची प्रार्थना करूं.

भरतवाक्य.

श्लोक.

पर्जन्यें समयीं समृद्ध सुफला ही सौख्यदा भू करो
आरोग्या वितरो प्रभू दुरितही, तें द्वैत सारें हरो
कल्याणा जनतेचिया घडविण्या धांवोत विद्वज्जन
होवो एवि कृतार्थ जीवित सदा धर्मीं जनां मज्जन ॥

पद.

सकलां पदरीं घेईं दीन बंधो दयाघना ।
ने लया मानसींचे क्षुद्र भेद कुवासना ॥
सत्पथीं अमुची मति, नेउनि वाढवी नीति ।
लयासि ने दुष्टरीति परात्परा दयाघना ॥

समाप्त.